# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार २५ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## कर्नाटकात काळाचा घाला!

### नदीपात्रात शिंपले गोळा करायला गेलेल्या

## ८ जणांचा बुडून मृत्यू



**भटकळ (कारवार)/ वृत्तसंस्था-** : कर्नाटक राज्यातील कारवार जिल्ह्यातील भटकळ येथे एक हृदयद्रावक दुर्घटना घडली आहे. थट्टेहक्कल नदीत शिंपले गोळा करण्यासाठी गेलेल्या १४ जणांपैकी ८ जणांचा दुर्दैवी अंत झाला आहे, तर दोन जण अद्याप बेपत्ता आहेत. मृतांमध्ये सात महिलांचा समावेश असल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

भटकळमधील शिराली येथील १४ जणांचा एक गट शिंपले गोळा करण्याच्या उद्देशाने थट्टेहक्कल नदीकाठी गेला होता. हे सर्वजण एकाच कुटुंबातील असल्याचे समजते. नदीपात्रात शिंपले गोळा करण्यात मग्न असतानाच, अचानक पाण्याची पातळी वाढली आणि प्रवाहाचा वेग प्रचंड वाढला. या अनपेक्षित पुरात हे सर्वजण वाहून गेले. ही घटना समोर येताच स्थानिक पातळीवर एकच खळबळ उडाली.

**बचावकार्याला वेग**

घटनेची माहिती मिळताच भटकळ पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक मच्छिमार आणि बचाव पथकाच्या मदतीने युद्धपातळीवर शोधमोहीम राबवण्यात आली. आतापर्यंत ८ जणांचे मृतदेह शोधण्यात यश आले असून, त्यांना उत्तरीय तपासणीसाठी भटकळ तालुका ☞(पान २ वर)

# ममता बॅनर्जींना मोठा धक्का! फल्टामध्ये भाजपचा झेंडा

## जहांगीर खान यांचा 1 लाखांहून अधिक मतांनी पराभव!

**कोलकाता /वृत्तसंस्था-** पश्चिम बंगालमधील राजकीय घडामोडींना आता एक मोठे आणि ऐतिहासिक वळण मिळाले आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेसचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फल्टा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. भाजपचे उमेदवार देवांगशू पांडा यांनी एकतर्फी लढतीत तब्बल १ लाखांहून अधिक मतांच्या फरकाने ऐतिहासिक विजय नोंदवला आहे, तर दुसरीकडे टीएमसीचे उमेदवार जहांगीर खान यांचा दारुण पराभव झाला आहे.

फल्टा मतदारसंघातील ही निवडणूक अत्यंत नाट्यमय ठरली. २९ एप्रिल रोजी झालेल्या मतदानादरम्यान ईव्हीएम छेडछाड आणि इतर अनियमिततेच्या गंभीर आरोपांनंतर निवडणूक आयोगाने संपूर्ण मतदारसंघातील २८५ मतदान केंद्रांवर २१ मे रोजी पुन्हा मतदान घेण्याचे आदेश दिले. मात्र, या फेरमतदानाच्या



अवघे दोन दिवस आधी टीएमसीचे उमेदवार जहांगीर खान यांनी नाट्यमयरीत्या निवडणूक लढवण्यास नकार दिला आणि प्रचारातून माघार घेतली.

**१ लाखांहून अधिक मतांनी पराभव-** आज (२४ मे) झालेल्या मतमोजणीत भाजपच्या देवांगशू पांडा यांनी सुरुवातीपासूनच मोठी आघाडी घेतली होती. त्यांनी तब्बल १,४९,६६६ मते मिळवत प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडवला. या निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (ण्इ्छ-श) शंभू नाथ कुर्मी राहिले, ज्यांना ४०,६४५ मते मिळाली. तर काँग्रेसचे अब्दुर रज्जाक मोल्ला यांना अवघी १०,०८४ मते मिळवता आली. टीएमसीचे जहांगीर खान यांचे नाव ईव्हीएमवर तांत्रिक कारणांमुळे उपलब्ध असले, तरी आधीच माघार घेतल्यामुळे त्यांना केवळ नाममात्र मते मिळाली.

**ममता बॅनर्जींसाठी सर्वात मोठा धक्का**

पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वात सत्ता परिवर्तन झाल्यानंतर, फल्टा मतदारसंघातील हा विजय भाजपसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. दक्षिण २४ परगणा हा संपूर्ण जिल्हा तृणमूल काँग्रेस आणि ममता बॅनर्जी यांचा अभेद्य गड मानला जात होता. मात्र, तिथेच ☞(पान २ वर)

## 'पुढील वर्षभरात सरकार कोसळणार, मोदींची गच्छंती निश्चित'

### राहुल गांधींचं भाकित



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या भवितव्याबाबत मोठं विधान केलं आहे. पुढील एक वर्षाच्या आत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गच्छंती निश्चित आहे. केंद्रातील मोदी सरकार वर्षभरात कोसळणार आहे, आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक परिस्थिती आणि देशात वाढत असलेला आर्थिक असंतोष ही या मागची मोठी कारणं असतील, असं भाकित राहुल गांधी यांनी केलं आहे.

सध्या देशात ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण होत आहे. तसेच लोकांमध्ये ज्या प्रकारे नाराजी वाढत आहे, त्याचा परिणाम भारतीय राजकारणावर दिसून येईल, असे राहुल गांधी म्हणाले, अशी माहिती काँग्रेसमधील सूत्रांनी दिली.

या बैठकी वेळी काँग्रेसच्य काही नेत्यांनी मुस्लिम शब्दाच्या जागी अल्पसंख्याक शब्दाचा वापर करण्याचं आवाहन ☞(पान २ वर)

## मुंगेरीलाल के हसीन सपने',

### फडणवीसांनी का लावला राहुल गांधींना टोला?

**नागपूर/ प्रतिनिधी :** : काँग्रेस अल्पसंख्याक सल्लागार समितीच्या बैठकीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील आर्थिक असंतोषामुळे पुढील वर्षभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार कोसळणार, असा दावा केला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात पलटवार केला. 'मुंगेरीलाल के हसीन सपने' यापेक्षा वेगळे काही नसल्याचा टोला त्यांनी राहुल गांधी यांना लगावला.



नागपूरपासून जवळच असलेल्या गोंडखैरी येथे गोदाम लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटन समारंभानंतर ते प्रसार माध्यमा सोबत बोलत होते. देशातील आर्थिक आव्हाने आणि जनतेतील वाढती नाराजीचा परिणाम आगामी काळात देशाच्या राजकारणावर दिसून येईल. पुढील एका वर्षात मोदी सरकार कोसळेल, असा दावा राहुल गांधी यांनी केला, याकडे प्रसारमाध्यमाने फडणवीस यांचे लक्ष वेधले. त्यावेळी उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी समृद्धीचे अतिरिक्त काम अतिशय वेगाने सुरू असून त्याळे संपूर्ण विदर्भ हा औद्योगिकदृष्ट्या प्रगत होईल. त्यातून मालवाहतूक क्षेत्रातील ☞(पान २ वर)

### लग्न जुळवून न दिल्यानं

## मुलानं जन्मदात्या आईला जिवंत जाळलं

### धुळ्यातील संतापजनक घटना!

**धुळे / वृत्तसंस्था-** नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली असून लग्न जुळवून दिले नाही म्हणून धुळ्यातील एका तरुणाने जन्मदात्या आईची हत्या केली.



नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली असून लग्न जुळवून दिले नाही म्हणून धुळ्यातील एका तरुणाने जन्मदात्या आईची हत्या केली. आईच्या हत्या केल्यानंतर आरोपीने पळून गेला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपी तरुण गेल्या काही दिवसांपासून आपल्या लग्नासाठी घरात तगादा लावत होता. मात्र, काही कौटुंबिक कारणांमुळे वृद्ध आईचा या लग्नाला तूर्तास विरोध होता. याच कारणावरून आई आणि मुलामध्ये कडाक्याचे भांडण झाले. आपल्या लग्नात आई अडथळा ☞(पान २ वर)

### नगर-कल्याण महामार्गावर भीषण अपघात

## बस-मोटारसायकल धडक, चार तरुणांचा मृत्यू



**ओतूर /वृत्तसंस्था-** नगर–कल्याण महामार्गावर डिंगोरे हद्दीत जीवनदीप हॉटेलजवळ रविवारी (दि. २४) सायंकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास बस आणि मोटारसायकल यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात मोटारसायकलवरील चार तरुणांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मृतांमध्ये खंडू नारायण भले, शिवराम नारायण पारधी (रा. भलेवाडी), तसेच दीपक सखाराम भले आणि आशिष ढवळू भले (रा. मराडवाडी, डिंगोरे ता. जुन्नर) यांचा ☞(पान २ वर)

## १२ खासदारांना 'संसदरत्न' सन्मान जाहीर, महाराष्ट्राला सर्वाधिक ५ पुरस्कार

### डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, डॉ. हेमंत सावरा, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी यांना पुरस्कार

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-** संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२ खासदारांसह ४ संसदीय स्थायी समित्यांची 'संसदरत्न पुरस्कार २०२६'साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक ५ खासदारांचा समावेश आहे. लोकसभा आणि राज्यसभेतील खासदारांच्या संसदीय कामगिरीच्या आधारे यंदा १० लोकसभा खासदार आणि २ राज्यसभा खासदारांची निवड करण्यात आली आहे.




महाराष्ट्रातून शिवसेना शिंदे गटाचे डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, भाजपच्या डॉ. मेधा कुलकर्णी, स्मिता वाघ, हेमंत सावरा यांची निवड करण्यात आली. तसेच अन्य खासदारांमध्ये जगदंबिका पाल, पी. पी. चौधरी, निशिकांत दुबे, प्रवीण पटेल, विद्युत महतो, लुबाराम चौधरी, नरहरी अमीन यांचाही पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. संसद सदस्यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ पर्यंतच्या संसदीय कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आल्याचे प्रियदर्शनी राहुल यांनी स्पष्ट केले.

**चार संसदीय समित्यांनाही गौरव**

यंदा उत्कृष्ट कामगिरीबद्दल ४ संसदीय स्थायी समित्यांनाही संसदरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये चरणजीत सिंह चन्नी यांच्या अध्यक्षतेखालील कृषी समिती, भर्तृहरी☞(पान २ वर)






## शासकीय धान्य गोदामातील १० हजार माथाडींवर कोसळणार बेकारीची कुऱ्हाड!

**विजयदुर्ग /वृत्तसंस्था-**: विविध जिल्हयातील शासकीय धान्य पुरवठ्याचे काम खासगी ठेकेदारांमार्फत करून घेण्याच्या दिशेने राज्य सरकारची पावले पडत असून यामुळे दहा हजार माथाडी कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर या निर्णयाच्या विरोधात संबंधित माथाडी कामगारांच्या वतीने २५ व २६ मी रोज राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे धरण्यात येणार आहे.

शासकीय धान्य गोदामातील धान्याची चढ - उतार करणे, पोत्याची थप्पी लावणे ही कामे जिल्हा माथाडी मंडळातील नोंदीत



कामगार करीत असतात. राज्यभरातील या कामगारांची संख्या दहा हजाराहून अधिक आहे. मात्र आता खासगी ठेकेदारांमार्फत रेशन दुकानांना थेट धान्य पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाची पावले पडत आहेत. ठेकेदाराच्या माध्यमातून धान्याच्या पोत्यांची थेट वाहतुक करुन ती परस्पर शिधावाटप दुकानांमध्ये पोहोचती करणे, पोत्यांचे वजन करून ती उतरवून देणे, दुकांनामध्ये त्यांची थप्पी लावून देणे ही कामे वाहतूक कंत्राटदारांच्या अनोंदित कामगारांकडुन करुन घेण्याबाबत शासनाने २१ व २४ एप्रिल, २०२६ रोजी आदेशच जारी केले आहेत.

यामुळे भविष्यात शासकीय गोदामांमध्ये धान्यच येणार नाही व परिणामी गेली कित्येक वर्षे हे काम करणारे जिल्हा माथाडी मंडळातील नोंदीत कामगार बेरोजगार होण्याचा धोका आहे. राज्यभरातील या कामगारांची संख्या ☞(पान २ वर)

### मनसे-ठाकरे सेनेतील संवादाचा सेतू कायम

## वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आदित्य ठाकरे शिवतीर्थावर



**मुंबई/ प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी रविवारी शिवाजी पार्क येथील शिवतीर्थ निवासस्थान गाठले. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याच्या निमित्ताने मनसे आणि ठाकरे गटातील संवाद सेतू कायम असल्याचे यानिमित्ताने समोर आले. मनसे नेते अमित ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने झालेल्या या भेटीप्रसंगी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासोबत पक्षातील इतर सदस्यही उपस्थित होते. यावेळी दोन्ही युवा नेत्यांमध्ये काही काळ संवादही झाला. ठाकरे कुटुंबातील दोन्ही युवा नेत्यांची ही भेट चर्चेचा विषय ठरली.






## 'तुम्ही एम्समध्ये लागणार, कित्येक वर्षांनंतर योग आलाय'

### बाकावर चढून पाणी शिंपडणाऱ्या मोटेगावकरचा व्हिडिओ व्हायरल



**मुंबई/ प्रतिनिधी** : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट परीक्षा घोटाळ्याचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांपैकी एक आणि रेणुकाई करिअर सेंटरचा संचालक शिवराज मोटेगावकर याला सीबीआयने पुण्यातून बेड्या ठोकल्य. सीबीआय कोठडीत असलेल्या मोटेगावकरची सध्या कसून चौकशी सुरू असतानाच, त्याचा एक खळबळजनक व्हिडिओ व्हायरल झाला असून यामुळे संताप व्यक्त होत आहे.

**बाकावर चढून मंतरलेले पाणी शिंपडले-** व्हिडिओमध्ये, स्वतःला विज्ञानाचा प्राध्यापक म्हणवून घेणारा शिवराज मोटेगावकर चक्क वर्गातील बाकावर उभा असल्याचे दिसत आहे. त्याच्या एका हातात पाण्याचा तांब्या आणि दुसऱ्या हातात पाने आहेत. तो तांब्यातील पाणी समोर बसलेल्या विद्यार्थ्यांवर शिंपडताना दिसत आहे. मोटेगावकर पाणी शिंपडण्यावरच थांबला नाही, तर तुम्ही सर्वजण एम्समध्ये प्रवेश मिळवणार आहात, असा योग कित्येक वर्षांनंतर आला आहे,' असा दावाही करतो.

**'फ्रोटॉन' बॅच आणि कोट्यवधींची उलाढाल-** मिळालेल्या माहितीनुसार, हजारो कोटी रुपयांचे साम्राज्य उभा ☞(पान २ वर)

# चार महिलांचा बळी घेणारी वाघीण अखेर जेरबंद

## -चार बछड्यांचा वनविभाग घेत आहे शोध

**चंद्रपूर :** सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात तेंदूपत्ता वेचण्यासाठी गेलेल्या चार महिलांचा बळी घेणाऱ्या टी-२ वाघिणीला अखेर वनविभागाने शनिवारी सायंकाळी पवनपार तलाव परिसरात बेशुद्ध करून पिंजऱ्यात जेरबंद केले आहे. आता तिच्या चार बछड्यांचा वनविभाग शोध घेत आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला असून, गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या भीतीच्या वातावरण निवळायला सुरूवात झाली आहे. दोन दिवसांपूर्वी सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघिणीने अचानक हल्ला केला होता. या भीषण घटनेत चार महिलांचा जागीच मृत्यू झाला होता. एकाच दिवशी एकाच ठिकाणी चार महिला मृत्यूमुखी पडल्याने चंद्रपूर जिल्हा हादरला होता. संतप्त ग्रामस्थांनी वनविभागाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करीत, तातडीने वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती.

घटनेनंतर वनविभागाने संपूर्ण परिसरात मोठी शोधमोहीम सुरू केली. हल्ला करणारा वाघ नेमका कोणता आहे, हे निश्चित करण्यासाठी गुंजेवाही जंगल परिसरात तब्बल २० ट्रॅप कॅमेरे आणि ३ मोशन सेन्सर लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. तसेच विशेष पथकाद्वारे दिवस-रात्र गस्त वाढविण्यात आली होती. वनाधिकाऱ्यांसह तज्ज्ञ डॉक्टर, ट्रँक्विलायझर चमू आणि बचाव पथक सतत जंगल परिसरात तैनात होते.

कॅमेरा ट्रॅप आणि पगमार्कच्या आधारे संबंधित वाघिणीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आल होते. अखेर पवनपार तलावाजवळील जंगल भागात वाघीण दिसल्यानंतर वनविभागाच्या पथकाने नियोजनबद्ध कारवाई करीत तिला डार्ट मारला. काही वेळातच वाघीण बेशुद्ध झाल्यानंतर तिला सुरक्षितरीत्या ताब्यात घेण्यात आले. वनविभागाच्या या कारवाईनंतर गुंजेवाही आणि परिसरातील गावांमध्ये दिलासा व्यक्त केला असला, तरी तिचे ४ बछडे मोकाटच असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरणायम आहे. जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलन, शेतीची कामे आणि जनावरे चारण्यासाठी जाणाऱ्या ग्रामस्थांनी कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी केली आहे. दरम्यान, पकडण्यात आलेली वाघीण हीच हल्लेखोर असल्याची प्राथमिक खात्री वनविभागाने व्यक्त केली असून, पुढील वैद्यकीय तपासणी, डीएनए नमुने आणि कॅमेरा ट्रॅपच्या आधारे अंतिम पडताळणी करण्यात येणार आहे.



चारही महिलांची एकाच वेळी निघाली अंत्ययात्रा-

तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी जंगलात गेलेल्या हल्ल्यात कवडाबाई मोहुर्ले, अनुबाई मोहुर्ले या दोन अविवाहित जुळ्या बहिनींसह सुनिता मोहुर्ले, संगीता चौधरी अशा चार महिलांचा जागीच मृत्यू झाला. गुंजेवाही गावात शुक्रवारी सायंकाळी या चारही महिलांचे मृतदेह एकाच वेळी आणण्यात आले. नंतर चारही अंत्ययात्रा एकाच वेळी निघाल्या. स्मशानभूमीतही एकाच वेळी देण्यात आलेला भडाग्नी पाहून गावकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली.

## कंटेनरमध्ये घुसली दुचाकी; दोघांचे पाय चिरडले

### कलोडे चौकातील भीषण अपघातः दोघांवर सेवाग्राममध्ये उपचार

**हिंगणघाट :** शहरातील गजबजलेल्या कलोडे चौकात भरधाव दुचाकी थेट कंटेनरमध्ये घुसल्याने दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी घडली. या भीषण अपघातामुळे चौकात काही काळ एकच गोंधळ उडाला होता.

विजय उत्तम साधा (२६) व लल्लन सिहारन यादव (४०) अशी जखमींची नावे आहेत. विजय साधा हा हिंगणघाट एमआयडीसी परिसरातील साईकृपा जिनिंगमध्ये मजूर म्हणून काम करतो, तर लल्लन यादव हा त्याच जिनिंगमध्ये हमाली ठेकेदार म्हणून कार्यरत आहे. दोघेही दुचाकीने जात असताना कलोडे चौकात अचानक कंटेनरसमोर आल्याने दुचाकी थेट वाहनाखाली शिरली.



या भीषण धडकेत दोघांच्याही पायांना गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांच्या ११२ पथकातील प्रमोद डडमल यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात रेफर करण्यात आले. या घटनेचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस ठाण्याचे प्रभारी अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## ढगा, गारपीट परिसरात वाघिणींचा सहा पिलांसह संचार | पर्यटकांना दर्शन

**वर्धा :** बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात येणाऱ्या आणि बांगडापूर वनपरिक्षेत्राचा भाग असलेल्या ढगा व गारपीट भागात सध्या प्रत्येकी ३ पिलांसह बीटीआर-१३ आणि बीटीआर-१६ या दोन वाघिणींचे दर्शन जंगल सफारीदरम्यान पर्यटकांना होत आहे. या दोन वाघिणींशिवाय बीटीआर-१९ हा वाघोबाचेही दर्शन होत आहे.

बोर व्याघ प्रकल्पाच्या ढगा गेटने प्रवेश करून बफर जंगल सफारीचा आनंद लुटताना काही पर्यटकांना मध्यंतरी एका कृत्रिम पानवठ्यावर जलक्रीडा करताना वाघिणीचे तीन पिलांसह दर्शन झाले होते.



काही दिवसानंतर बीटीआर-१३ वाघिणीचे तीन पिलांसह नीलगायची शिकार करताना दर्शन झाले होते. जंगलातील विविध भागात असलेले ट्रॅप कॅमेरे व या दोन्ही घटनेचे फोटो आणि व्हिडीओचे वन्यजीव विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी निरीक्षण केले असता बीटीआर-१३ व बीटीआर-१६ या वाघिणींचा प्रत्येकी ३ बछड्यांसह ढगा व गारपीट भागात अधिवास असुन बीटीआर-१९ हा वाघाचा वावरही असल्याचे पुढे आले आहे. बोरच्या कोअर क्षेत्राप्रमाणेच आता बफर क्षेत्रातही वाघीण ३-३ पिलांना जन्म देत असल्याने बोरचे बफर क्षेत्रही वाघांच्या संवर्धनासाठी उपयुत ठरत आहे.

## रेशनच्या चोरट्या तांदूळासह वाहतूक करणारे वाहन पकडले

### -चार लाख ४३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** स्थानिक पोलीसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, दिनांक २२ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सापळा रचून एका पिक अप व्हॅन वाहनास संशयावरून जेरबंद केले. या वाहनांची तपासणी केली असता,वाहनात रेशन मध्ये दिला जाणारा शासकीय तांदूळ आढळून आला. चांदूरबाजार पोलीसांनी क्षणाचाही विलंब न करता,तांदळा सह वाहन जप्त करून पोलीस स्टेशनमध्ये आणले. ही कारवाई पोलीसांनी शहराच्या हृदयस्थानी असलेल्या, जयस्तंभ चौकात भर रहदारीचे वेळेस केली. सदर वाहनाच्या तपासणी दरम्यान,वाहनात ३७ पोते रेशनचा तांदूळ आढळून आला. वाहन चालका जवळ या रेशनच्या तांदूळ वाहतुकीचा कोणताही परवाना नसतांना, अवैधरित्या रेशनच्या तांदळाची वाहतूक करीत असल्याचे दिसून आले. हा तांदूळ रेशनच्या तस्करीचा तांदूळ असल्याचा पोलिसांना संशय आला.त्यावरून पोलीसांनी पुरवठा विभागाच्या, पुरवठा अधिकाऱ्यांस तपासणीसाठी पाचारण केले.पुरवठा अधिकारी यांनी सदर तांदूळ हा रेशनचा असून, तो तस्करी व्दारे अवैध रित्या वाहतूक केल्या जात आहे.असा लेखी अहवाल दिला.

त्यानंतर पोलिसांनी ३७ पोते तांदूळ अंदाजे किंमत,९३ हजार ७०० रूपये तसेच एम.एच.२७ एक्स ५४७२ क्रमांकाचे वाहन,अंदाजे किंमत ३ लाख ५०,००० हजार असा एकूण ४ लाख ४३ हजार ७०० रुपये चा मुद्देमाल, पंचनामा करून पंचासमक्ष जप्त केला. याप्रकरणी प्रवीण वामनराव वाट , वय ३५ वर्षे , राहणार चांदूरबाजार यास आरोपी म्हणून अटक करण्यात आली.



आरोपी विरूध्द अ.क्र.२३१/२०२६ नुसार , कलम ३ व ७ अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीसांच्या या कारवाई मुळे ,रेशनच्या तांदळाची तस्करी व अवैध वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. ही कारवाई ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक तोडेवाड , उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे यांचे मार्गदर्शनात, परिविक्षाधीन सहायक पोलिस अधीक्षक सागर भामरे यांचे नेतृत्वाखाली, पो.उप. निरीक्षक प्रदिप कांबळे व पो.हे.का.मंगेश साव यांनी केली.

## १ व १० वरील उर्वरित

### कर्नाटकात काळाचा घाला!

शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सुदैवाने, ४ जणांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे, मात्र आणखी दोघे बेपत्ता असल्याने त्यांच्या शोधासाठी बचावकार्य अद्याप सुरू आहे.

एकाच कुटुंबातील ८ जणांचा मृत्यू झाल्याने शिराली गाव शोकाकुल झाले आहे. नदीच्या पाण्याची पातळी अचानक कशी वाढली, याची अधिकृत चौकशी प्रशासनाकडून केली जात आहे. पोलीस आणि स्थानिक प्रशासन बेपत्ता असलेल्या दोघांचा कसून शोध घेत आहेत.

### ममता बॅनर्जींना मोठा

१ लाखांपेक्षा जास्त मतांनी मिळवलेला हा विजय म्हणजे ममता बॅनर्जींच्या बालेकिल्ल्याला पडलेले सर्वात मोठे खिंडार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. या विजयानंतर भाजप कार्यकर्त्यांनी संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये मोठा जल्लोष सुरू केला आहे.

### पुढील वर्षभरात सरकार

केलं. त्यावर राहुल गांधी यांनी असहमती व्यक्त करत कुणाला घाबरण्याचं कारण नाही. ज्या वर्गावर अन्याय होईल, त्याच्यासोबत उघडपणे उभं राहिलं पाहिजे. मग तो हिंदू असो, दलित असो, सवर्ण असो, मुस्लिम असो, शीख असो, ख्रिश्चन असो किंवा बौद्ध वा जैन असो, काँग्रेसने सर्वांच्या अधिकारांबाबत आवाज उठवला पाहिजे, असेही राहुल गांधी यांनी सांगितले.

### मुंगेरीलाल के हसीन सपने'

किंमती कमी होईल तसेच मालवाहतूक क्षेत्रात रोजगाराची निर्मिती मोठ्या प्रमाणात होईल, असेही त्यांनी सांगितले.

तत्पूर्वी लॉजिस्टिक पार्कच्या उद्घाटन समारंभात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, पालघर जिल्ह्यातील डहाणूसमीप उभारले जात असलेले देशातील सर्वात मोठे वाढवण बंदरातील पहिले टर्मिनल २०२९ च्या सुरुवातीला सुरू होणार आहे. जगातील पहिल्या दहा बंदरामध्ये याचा समावेश होईल. या बंदरामुळे गुंतवणूक व पुरवठा क्षेत्रात संधी मिळणार असून मालवाहतूक क्षेत्रात देश ३० वर्षे पुढे जाईल. वाढवण बंदरापर्यंत पोहोचण्यासाठी समृद्धी महामार्गावरील इगतपुरीवरून मार्ग तयार करण्यात येत आहे. नागपूरवरून थेट बंदरापर्यंत पोहोचता येणार आहे. आज जगातील राजकीय स्थितीमुळे उत्पादन, मालवाहतूक (लॉजिस्टिक) क्षेत्रात संधी तयार होत असताना आव्हानेही आहेत. उत्पादन क्षेत्रापुढे मालवाहतुकीच्या किमतीचे मोठे आव्हान आहे.

### लग्न जुळवून न दिल्यानं

ठरत असल्याचा राग डोक्यात ठेऊन आरोपी मुलाने आईच्या अंगावर रॉकेट ओतले आणि तिला जिवंत पेटवून दिले. वृद्ध महिलेचा ओरडण्याचा आणि किंचाळण्याचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी तात्काळ घराकडे धाव घेतली. गंभीर अवस्थेत भाजलेल्या महिलेला तात्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, ती मोठ्या प्रमाणात भाजली असल्याने तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक बनली होती. डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही अखेर वेदनेने विव्हळत या वृद्ध माऊलीने रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. पोटच्या आईची निर्घृण हत्या करून पळून गेलेल्या आरोपी मुलावर हत्येचा (कलम ३०२ अंतर्गत) गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.

### बस-मोटारसायकल धडक

समावेश असून चौघेही डिंगोरे येथील आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चारही युवक मोटारसायकलवरून महामार्गाने जात असताना समोरून येणाऱ्या बसशी त्यांची जोरदार धडक झाली. अपघाताचा आवाज मोठा असल्याने परिसरातील ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने जखमींना अंबुलन्सद्वारे ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती चौघांनाही मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांत अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

### १२ खासदारांना 'संसदरत्न'

महताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्त समिती, सप्तगिरी शंकर उल्का यांच्या अध्यक्षतेखालील ग्रामीण विकास आणि पंचायती राज समिती तसेच अनुराग ठाकूर यांच्या अध्यक्षतेखालील कोळसा आणि खाण समितीचा समावेश आहे.

काय आहे संसदरत्न पुरस्कार?

संसदरत्न पुरस्काराची स्थापना २०१० मध्ये चेन्नईस्थित 'प्राइम पॉइंट फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या सूचनेनुसार केली होती. २०१० मध्ये झालेल्या पहिल्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटनही डॉ. कलाम यांनी केले होते. मागील १५ पुरस्कार सोहळ्यांमध्ये खासदार आणि समित्यांना एकूण १४३ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. १६ वा संसदरत्न पुरस्कार सोहळा जुलै २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे होणार आहे.

### शासकीय धान्य गोदामातील

दहा हजाराहून अधिक असल्याचे ही माहिती देताना अखिल भारतीय माथाडी सुरक्षारक्षक आणि जनरल कामगार युनियन सरचिटणीस अरुण रांजणे यांनी सांगितले.

एका बाजूला संपूर्ण देशातच रोजगाराचा मोठा प्रश्न असताना तसेच देशासमोर आर्थिक संकटाचे वादळ घोंगावत असताना राज्य सरकारच्या निर्णयामुळे रोजगार असलेले हजारो कामगार बेरोजगार होणार आहेत. शासनाच्या निर्णयाबाबत संबंधित ठेकेदार व वाहतुकदार यांची असोसिएशन व माथाडी संघटना यांच्या शासकीय प्रतिनिधींच्या उपस्थितीत अनेक बैठका झाल्या. या बैठकांमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांनी गोदामातील कामासह पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील माथाडी स्वरुप सर्व कामे नोंदीत माथाडी कामगारांकडून करुन घेण्याबाबत शासन निर्णयामध्ये तरतुद करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु त्याची पूर्तता झालेली नाही. या पार्श्वभूमीवर नोंदीत कामगार करीत असलेले काम टप्प्याटप्प्याने त्यांच्याकडून हिरावून घेतले जाऊन ते बेरोजगार होण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत मालक माथाडी कायद्याचे डावलून कामगार अनुचित प्रथेचा अवलंब करीत असल्याच्या तक्रारी येत. परंतु आता कायदा करणारे मायबाप सरकारच या कामगारांचे कायद्याचे संरक्षण काढून घ्यायला निघाले असल्याचे याबाबत बोलताना रांजणे म्हणाले. त्यामुळे २५ व २६ मी रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे धरण्याचा निर्णय घेण्यात आला असून या आंदोलनात या माथाडी कामगारांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी मंडळ, अखिल भारतीय माथाडी सुरक्षारक्षक आणि जनरल कामगार युनियन, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियन आदी संघटना सहभागी होणार असल्याचे अरुण रांजणे यांनी सांगितले.

### तुम्ही एम्समध्ये लागणार

करणाऱ्या मोटेगावकरची लातूरमध्ये मोठी दहशत होती. तो नामांकित डॉक्टरांच्या मुलांसाठी फोटॉन नावाची एक विशेष बॅच चालवत असे. पालकांनुसार आणि ते किती मोठे डॉक्टर आहेत, यावरून या बॅचचे शुल्क ठरवले जात होते. केमिस्ट्री उत्तम शिकवणारा हा शिक्षक स्वतः मात्र अंधश्रद्धाळू होता, हेच या व्हिडिओवरून स्पष्ट होत आहे.

तपासातील मनीषा कनेक्शनची जोरदार चर्चा

नीट घोटाळ्याचा तपास करताना सीबीआयने पुण्यातून मुख्याध्यापिका मनीषा संजय हवालदार यांना अटक केली. या प्रकरणात पुण्यात झालेली ही पाचवी अटक आहे. महत्त्वाचे म्हणजे, आतापर्यंत या घोटाळ्यात अटक करण्यात आलेल्या तीन महिला आरोपींचे नाव मनीषाच आहे. त्यामुळे हा केवळ एक योगायोग आहे की या नावामागे काही मोठे रॅकेट आहे, यादृष्टीनेही सीबीआय तपास करत आहे.

देशभरात छापेमारी; ११ जण गजाआड

यसीबीआयने पुणे, नाशिक, लातूर, अहिल्यानगर, जयपूर, गुरुग्राम आणि दिल्लीसह अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये छापे टाकण्यात आले आहेत. आतापर्यंत या प्रकरणी ११ जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर लॅपटॉप, मोबाईल, हार्ड डिस्क आणि संशयास्पद बँक व्यवहारांची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

### अधिकारी असल्याचे सांगत

आल्यानंतर अभिजीत आबदेव यांनी तत्काळ बडनेरा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली. पोलिसांनी चार अज्ञात आरोपींविरोधात खंडणी व जबरदस्तीने वसुली केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, कार क्रमांक आणि आरोपींच्या वर्णनाच्या आधारे त्यांचा शोध सुरू आहे.

### एसटी प्रवासात महिलेचे साडेपाच

एसटी बसमध्ये बसल्या. सर्व सोन्याचे दागिने त्यांनी एका छोट्या पर्समध्ये ठेवून ती पर्स हँडबॅगमध्ये चेन लावून सुरक्षित ठेवली होती. प्रवासादरम्यान त्यांच्या शेजारील सीटवर एक अनोळखी व्यक्ती येऊन बसली होती. दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास महिला अमरावतीतील नवाथे स्टॉप येथे उतरल्या. तेथून त्या थेट एकवीरा नगर येथील नातेवाईक विलास शंकरराव अनासाने यांच्या घरी गेल्या. काही वेळाने दागिने विकण्यासाठी बाजारात जाण्यापूर्वी त्यांनी हँडबॅग तपासली असता त्यामधील छोटी पर्स आणि सर्व दागिने गायब असल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्यांना मोठा धक्का बसला. यानंतर नातेवाईकांसह त्यांनी नवाथे स्टॉप परिसर तसेच अकोला येथे घरी जाऊन सर्वत्र शोध घेतला. मात्र दागिन्यांचा कोणताही मागमूस लागला नाही. त्यामुळे अकोला-अमरावती प्रवासादरम्यान बसमध्येच अज्ञात चोरट्याने हँडबॅगमधून दागिने चोरल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये ३८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत २ लाख ६६ हजार रुपये), १४ ग्रॅमचे दुसरे मंगळसूत्र (९८ हजार रुपये), २१ ग्रॅमची सोन्याची चैन (१ लाख ४७ हजार रुपये), ३.५ ग्रॅमची अंगठी (२४ हजार ५०० रुपये) तसेच ३.५ ग्रॅमचे झुमके (२४ हजार ५०० रुपये) यांचा समावेश आहे. एकूण ५ लाख ६० हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे. महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### डॉक्टरच्या निष्काळजीपणाने प्रसूत

शरीरातील रक्ताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर डॉक्टरांनी नातेवाईकांना संसर्ग झाल्याचे सांगत पोटातील दूषित रक्त काढावे लागेल, असे सांगितले. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी पुन्हा शस्त्रक्रिया करून महिलेचे टाके उघडण्यात आले. यावेळी तिचे गर्भाशय तसेच सुमारे तीन लिटर दूषित रक्त बाहेर काढण्यात आले. मात्र प्रकृतीत कोणतीही सुधारणा न झाल्याने त्याच रात्री तिचा मृत्यू झाला. २३ फेब्रुवारी रोजी शवविच्छेदनानंतर ब्रह्मणवाडा थडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत महिलेच्या भावाने तक्रारीत नमूद केले की, संबंधित महिला डॉक्टरांनी शस्त्रक्रिया योग्य पद्धतीने केली नाही. वारंवार वेदनांची तक्रार करूनही डॉक्टर व रुग्णालय कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केले. या निष्काळजीपणामुळेच आपल्या बहिणीचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात तज्ज्ञांची वैद्यकीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. जिल्हा शल्यचिकित्सकांनी सादर केलेल्या अहवालात, सिझेरियननंतर रुग्णाला पोटदुखीचा त्रास होत असतानाही संबंधित महिला डॉक्टरांनी उपचारात गंभीर हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या अहवालाच्या आधारे मोहम्मद इरफान यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी २३ मे रोजी परतवाडा येथील संबंधित महिला डॉक्टरविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### प्रेमसंबंधासाठी दबाव; तरुणीचा

यामुळे संतप्त झालेल्या आरोपीने महिलेला वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. तो तिचा पाठलाग करत रस्त्यात अडवून पुन्हा पूर्वीसारखे संबंध ठेवण्याचा दबाव टाकत होता. दरम्यान, आरोपीने महिलेला एकटी पाहून तिच्याशी गैरवर्तन करत विनयभंग केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने शिरखेड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी प्रमोद उमक याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### ३१ मे पूर्वी वीज यंत्रणेतील

लागत आहे. अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही.

तेव्हा दि. ३१ मे पूर्वी संपूर्ण उपकेंद्र, अंतर्गत येणाऱ्या गावातील ११ केव्ही व LT लाईन, सर्व रोहित्र व AB स्विचची तपासणी करून दुरुस्ती करावी, धोकादायक पोल व तारा तात्काळ बदलण्यात याव्यात, पावसाळ्यात बिघाड झाल्यास ३० मिनिटांच्या आत वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी विशेष पथक तैनात करावे व नियोजित शटडाऊनची माहिती २४ तास आधी ग्रामपंचायतींना लेखी द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या .

'शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पेरणीच्या महत्त्वाच्या काळात त्याला अखंडित वीज मिळणे हा त्याचा अधिकार आहे. दि. ३१ मे पर्यंत ठोस कार्यवाही न झाल्यास, परिसरातील शेतकरी बांधवांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशारा सुशील थोरात यांनी यावेळी दिला.

### शहर पोलिसांचे 'कॉम्बिंग ऑपरेशन'

पंचवटीसह विविध महत्त्वाच्या चौकांवर नाकाबंदी करून वाहनांची सखोल तपासणी करण्यात आली. मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या २ चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्या ५९ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. तसेच दुचाकींना मोठा आवाज करणारे अवैध सायलेंसर बसविणाऱ्या १४ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. फॅन्सी नंबर प्लेट अथवा नंबर प्लेट नसलेल्या ४ वाहनांवर कारवाई झाली. नो-पार्किंगमध्ये किंवा रस्त्यावर वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या ११ जणांविरोधातही पोलिसांनी कठोर पावले उचलली. शहरात शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### महायुती-महाविकास आघाडीच्या

अपक्ष इच्छुकांची भूमिका महत्त्वाची ठरण्याची चिन्हे आहेत. पोटे यांच्या विरोधकांकडून काही इच्छुकांना निवडणूक रिंगणात उतरविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. मतविभाजन घडवून आणणे, नाराज गटांना एकत्र आणणे आणि अंतिम क्षणी दबावतंत्र वापरणे, या रणनीतीवर काही राजकीय गट काम करत असल्याचे सांगितले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर आमदार रवी राणा यांचे बंधू सुनील राणा यांनीही निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे अकोल्याचे माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांनी मागील काही महिन्यांत अमरावती जिल्ह्यात वाढविलेला संपर्क, बैठका आणि दौरे यामुळे त्यांच्या नावाचीही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शिंदे गटाकडून त्यांना संधी मिळू शकते, अशी शक्यता स्थानिक राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

एकूणच, अमरावती विधान परिषद निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता कायम असली तरी अपक्षांची वाढती हालचाल, मित्रपक्षांचे दावे आणि ऐनवेळी बदलणारी राजकीय समीकरणे यामुळे ही निवडणूक अपेक्षेपेक्षा अधिक चुरशीची ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, २५ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# अवैध सावकारांवर सहकार विभागाचा 'सर्जिकल स्ट्राईक'

## एकाचवेळी १० ठिकाणी धाडी ; कोरे चेक, गहाणखत, सातबारे, करारनाम्यांसह संशयास्पद कागदपत्रांचा खजिना जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

*शहरात आणि परिसरात बेकायदेशीर सावकारीच्या माध्यमातून नागरिक व शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्यांविरोधात सहकार विभागाने शनिवारी मोठी धडक मोहीम राबवत अवैध सावकारांच्या जाळ्यावर थेट सर्जिकल स्ट्राईक केला. जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि सहकार खात्याच्या संयुक्त पथकांनी शहरातील विविध भागांत एकाचवेळी तब्बल दहा ठिकाणी धाडी टाकून मोठ्या प्रमाणावर आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त केली. या कारवाईनंतर शहरातील तथाकथित सावकारांमध्ये एकच खळबळ उडाली असून, अनेकांनी आपले व्यवहार लपविण्याची धावपळ सुरू केल्याची चर्चा आहे.*





अकोला शहरासह जिल्ह्यात काही व्यक्ती परवाना नसताना अवैधरीत्या सावकारी व्यवसाय चालवत असल्याच्या आणि नागरिकांना जादा व्याजदराने पैसे देऊन त्यांच्या जमिनी, मालमत्ता तसेच आर्थिक कागदपत्रांवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी सहकार विभागाकडे सातत्याने येत होत्या. विशेषतः शेतकरी, लहान व्यापारी आणि आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना लक्ष्य केले जात असल्याच्या गंभीर तक्रारींनी प्रशासन सतर्क झाले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन आणि जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष संयुक्त मोहीम आखण्यात आली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अन्वये ही धाड कार्यवाही करण्यात आली. सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या नऊ अधिकृत तक्रारींच्या आधारे संबंधित संशयितांवर कारवाईचा फास आवळण्यात आला. शनिवारी सकाळपासूनच विविध पथकांनी शहरातील वेगवेगळ्या भागांमध्ये एकाचवेळी धाडी सुरू केल्या. संशयित सावकारांच्या घरांसह कार्यालयांची कसून तपासणी करण्यात आली. काही ठिकाणी पथक पोहोचताच संबंधितांमध्ये घबराट पसरल्याचे सांगण्यात येत आहे.

या शोधमोहीमेत जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांमुळे प्रशासनाचेही डोळे विस्फारले. कोरे धनादेश, कोरे बाँड, इसार पावत्या, गहाणखत, करारनामे, सातबारा उतारे, मूळ व झेरॉक्स खरेदीखत, व्यवहारांच्या डायऱ्या तसेच आर्थिक देवाणघेवाणीशी संबंधित अनेक संशयास्पद कागदपत्रे पथकाच्या हाती लागली. काही कागदपत्रांमधून मोठ्या प्रमाणावर अनधिकृत आर्थिक व्यवहार होत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, काही ठिकाणी कर्जदारांकडून आधीच स्वाक्षरी घेतलेले कोरे चेक व बाँड सापडल्याने सावकारीच्या माध्यमातून दबाव तंत्र वापरले जात असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. सदर कागदपत्रांची आता बारकाईने चौकशी आणि कायदेशीर पडताळणी करण्यात येणार आहे. तक्रारींमध्ये तथ्य आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सहकार विभागाने स्पष्ट केले आहे.

ही कारवाई अत्यंत गुप्त पद्धतीने नियोजनबद्ध करण्यात आली होती. सहकार विभागातील अधिकारी आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तरीत्या रणनीती आखत वेगवेगळ्या पथकांची निर्मिती केली होती. पथकप्रमुख म्हणून कु. ए. एम. भाकरे, कु. आर. आर. विटणकर, पी. टी. सरकटे, एस. डी. नरवाडे, एस. एस. खान, व्ही. व्ही. सपकाळ, जे. एस. सहारे, आर. आर. घोडके, अनिल शास्त्री आणि एम. वाय. परतेकी यांनी जबाबदारी सांभाळली. त्याशिवाय उपनिबंधक ज्योती मलिये आणि कनिष्ठ लिपिक आशिष घाटोळे हे फिरत्या पथकात सहभागी होते. या मोहिमेत अकोला व वाशिम जिल्ह्यातील सहकार विभागाचे जवळपास ५० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. पोलीस विभागातील ४० अधिकारी-कर्मचारी, विविध बँकांचे अधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी, जिल्हा व तालुका खरेदी-विक्री संघांचे प्रतिनिधी आणि गटसचिव यांचाही या मोहिमेत सहभाग होता. एकूण शंभरहून अधिक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली.

### धाड टाकण्यात आलेल्या संशयितांची नावे

सौ. विद्या विवेक गिरी (घर व कार्यालय), सौ. रंजना मुंदे, संगीता भारती, मो. जाकीर मो. खलील, भूषण व्याघ्रांबरे, सहदेवराव शिंदे, सौ. सपना कडू, सौ. शिला नाईक (घर व दुकान) या संशयितांच्या घरी व प्रतिष्ठानांवर धाड पडली असल्याची माहिती देण्यात आली.

### सावकारग्रस्तांनी पुढे यावे – गितेशचंद्र साबळे

अवैध सावकारीच्या जाचाला कंटाळलेल्या नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी भीती न बाळगता पुढे येऊन तक्रारी दाखल कराव्यात. तक्रारदारांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेत संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक तथा सावकार निबंधक गितेशचंद्र साबळे यांनी केले आहे.

## ईमरजन्सी इंधन साठ्यात शेतकऱ्यांचा समावेश करा - पप्पु कुटे



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

देश कृषिप्रधान असताना शेतीच्या हंगामातच डिझेलचा तुटवडा निर्माण होणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करत कास्तकार पप्पु कुटे यांनी शेतकऱ्यांसाठी प्रत्येक पेट्रोल पंपावर ईमरजन्सी डिझेल स्टॉक राखीव ठेवण्याची मागणी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे.

सध्या मे महिन्याच्या अखेरीस शेती मशागतीची कामे वेगाने सुरू असून नांगरणी व वखरणीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. अशा वेळी अचानक डिझेलची टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेतीची बहुतांश कामे केली जात असताना डिझेलसाठी पेट्रोल पंपांवर रांगांच्या रांगा लागत असून शेतकऱ्यांचा वेळ व आर्थिक नुकसान होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रत्यक्षात पेट्रोल पंपांवर डिझेल मिळण्यासाठी नागरिकांना ताटकळत उभे राहावे लागत असल्याचेही कुटे यांनी नमूद केले. आमदार खासदार महसूल विभाग पोलीस विभाग तसेच रुग्णवाहिकांसाठी जसा राखीव इंधन साठा ठेवला जातो त्याच धर्तीवर शेतकऱ्यांसाठीही स्वतंत्र डिझेल स्टॉक राखीव ठेवण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली.

## एम.आर.पी. संदर्भात कायदा करण्यासाठी ग्राहक पंचायतचे निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विविध वस्तूवर जास्तीत जास्त कमाल किरकोळ किंमत (एम.आर.पी.) मुद्रणावर मर्यादा घालण्यासाठी केंद्र शासनाने स्वतंत्र कायदा करावा आणि ग्राहकांचे सद्या सुरू असलेले आर्थिक शोषण थांबविण्याची मागणी वाशीम जिल्हा ग्राहक पंचायतच्यावतीने देशाच्या पंतप्रधानांना येथील जिल्हाधिका— या मार्फत दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पंतप्रधानांना जिल्हाधिका-यां मार्फत पाठविलेल्या निवेदनात अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशीम जिल्ह्याच्या वतीने ग्राहक संरक्षणासाठी सुरू करण्यात आलेली कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) प्रणाली आता ग्राहकांची फसवणूक करण्याचे माध्यम बनली आहे. सद्या कोणत्याही उत्पादनावर कितीही एमआरपी छापण्यास स्पष्ट मर्यादा नसल्याने उत्पादक, वितरक आणि विक्रेते मनमानी दर छापत आहेत. त्यामुळे ग्राहकांना विविध कंपन्यांकडून अवाजवी दर आकारल्या जात असल्याने ग्राहकांची फसवणूक आणि मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण सुरु असल्याची बाब या निवेदनात नमूद केली आहे.



तसेच उत्पादन खर्चाच्या तुलनेमध्ये अनेक पटीने एमआरपी छापुन नंतर ग्राहकांना मोठ्या सवलती दाखविल्या जातात. त्यामुळे ग्राहकांना प्रत्यक्षात किती किंमत योग्य आहे याची माहिती मिळत नाही. प्रामुख्याने औषधे, वैद्यकिय उपकरणे, सौंदर्य प्रसाधने, किटकनाशके आणि नामांकित कंपनीच्या वस्तुंमध्ये ही समस्या गंभीर स्वरूपात असल्याचेही या निवेदनात स्पष्ट केलेले आहे. महानगरासह जिल्हास्तरावरील व्यावसायिक संकुलामध्ये जास्त एमआरपी असलेली उत्पादने ऑनलाईन खरेदीमध्ये कमी दरात उपलब्ध होत असल्याने ग्राहक संभ्रमात पडत आहेत. देशातील सर्व ग्राहकांना आर्थिक शोषणापासून व फसवणूकीपासून मुक्त करण्यासाठी केंद्रशासनाने एमआरपी संदर्भात स्वतंत्र कायदा करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. २२ मे रोजी वाशीम जिल्हा ग्राहक पंचायतचे अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी, कार्यालय प्रमुख प्रांजल जैन, प्रचार प्रमुख आतीश देशमुख यांनी निवासी उपजिल्हाधिकारी रविंद्र काळे यांना देण्यात आले. या निवेदनाच्या प्रती देशाच्या अर्थमंत्री, वाणिज्य व उद्योग मंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांना पाठविल्या आहेत. मे महिन्यात राष्ट्रीय स्तरापासून ग्रामिण भागात अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्यावतीने जनजागृती अभियान कार्यक्रम राबवून ग्राहकांची फसवणूक आणि आर्थिक शोषण बंद करण्यासाठी ग्राहक पंचायत पुढाकार घेत आहे.

## अडोळी येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथून जवळच असलेल्या अडोळी येथे दि.२२ मे रोजी सायंकाळी ७:३० वाजता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा वकील संघ यांचे संयुक्त विद्यमाने कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे जिल्हा सचिव तथा न्यायाधिश व्ही.जी चौखंडे यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने, ग्रामपंचायत प्रशासक सविताताई इढोळे, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, वकील संघाचे सचिव ॲड.डी.डी.गुडदे, वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.वैभव तिफने, पं.स.चे प्रशासन अधिकारी दीपक देशमुख, उपसरपंच भगवान इढोळे, माजी सरपंच नारायण इढोळे यांची उपस्थिती होती.

सुरुवातीला माजी जि प सदस्य केशव डाखोरे यांनी सहकार्यासोबत बहारदार योजना गीत सादर केले .त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुड पुतळ्याला मान्यवराच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून कार्यक्रमांचे अध्यक्ष तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही.जी चौखंडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वातंत्र्य मिळाल्याच्या अगोदर राजा हा राजे घराण्यातील असायचा.परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे संविधान हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व जाती धर्माच्या जनतेला समान हक्क व अधिकार मिळावे म्हणून कायदा केला व समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय यांवर आधारित संविधान देऊन कायदा बनवला.तेव्हापासून देश हा संविधानाच्या माध्यमातून चालतो.तर पुढे बोलताना सांगितले की, महीला सुरक्षीत असली पाहिजे, त्यांना समान हक्क व न्याय मिळाला पाहिजे, शिवाय वन्य प्राण्यांच्या बाबतीत देखील कायदेविषयक मार्गदर्शन केले.

नंतर ॲड.वैभव तिफने, गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने, ॲड. डी.डी.गुडदे यांनी देखील विविध कायदे उपस्थितांना सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. डी.डी.गुडदे यांनी केले तर आभार प्रदर्शन विधी स्वयंसेवक राजकुमार पडघान यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत अडोळी वतीने पंढरी इढोळे, रवि इढोळे, सुमेध खंडारे, सागर इढोळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश इढोळे, उपाध्यक्ष अमोल खंडारे, आदिशक्ती अभियान समितीचे अध्यक्ष केसरबाई बबन खिल्लारे, परमेश्वर इढोळे, गजानन बद्री इढोळे, अन्नपूर्णाबाई तायडे आदींची उपस्थिती होती.

## वाशिममध्ये अवैध इंधन साठेबाजीवर जिल्हा प्रशासनाची कारवाई

### तोंडगाव फाट्यावरून १४० लिटर डिझेल जप्त

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात अवैध आणि असुरक्षित इंधन साठवणुकीविरुद्ध प्रशासनाने अत्यंत कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या धडक मोहिमेचा भाग म्हणून वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने एक मोठी कारवाई केली.

तोंडगाव फाटा येथील 'हॉटेल गावकरी' या ठिकाणी धाड टाकून बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेला डिझेलचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी हॉटेल चालकाविरुद्ध अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील कायदेशीर प्रक्रियेला गती देण्यात आली आहे.



**गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई**

ही कारवाई २२ मे २०२६ रोजी संध्याकाळी ६.४५ ते ८ वाजेच्या सुमारास करण्यात आली. तहसील कार्यालयातील प्रभारी निरीक्षण अधिकारी गजानन दत्तात्रय सोनार यांना ग्राम महसूल अधिकारी रवींद्र वैनुले यांच्याकडून तोंडगाव फाटा जवळील 'हॉटेल गावकरी' येथे अवैध डिझेल साठा असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुरवठा निरीक्षक अनिता सुभाष देशमुख, पोलीस अंमलदार बन्सी चव्हाण आणि महसूल विभागाच्या पंचांसह पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन तपासणी केली. हॉटेलची कसून झडती घेतली असता, तेथे एका निळ्या रंगाच्या ड्रममध्ये डिझेल साठवून ठेवल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

**अवैध साठा आणि कागदपत्रांची कमतरता :** पथकाने तेथे हजर असलेल्या हॉटेल चालकाला त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव विलास राजाराम धाडवे (वय ४०, रा. तोंडगाव) असल्याचे सांगितले. या अवैध साठ्याबाबत पथकाने त्याच्याकडे खरेदी-विक्रीचा अधिकृत परवाना, साठवणूक नोंदवही, अधिकृत खरेदी बिल किंवा वाहतूक पास यांसारख्या कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांची मागणी केली. मात्र, त्याच्याकडे एकही वैध कागदपत्र आढळून आले नाही. हा पेट्रोलियम साठा बेकायदेशीर रित्या, अत्यंत असुरक्षित आणि अनधिकृतपणे साठवून ठेवल्याचे सिद्ध झाल्याने पंचांसमक्ष त्याची मोजणी करण्यात आली. या ड्रममध्ये एकूण १४० लिटर डिझेल मिळून आले, ज्याचे बाजारमूल्य प्रति लिटर ९५.४६ रुपये दराने एकूण १३,३६४ रुपये ४ पैसे इतके आहे.

**तपासणी आणि गुन्हा दाखल**

नियमानुसार, रासायनिक तपासणीसाठी (Chemical Analysis) या अवैध साठ्यामधून ७५० मिलीलीटरचे प्रत्येकी तीन नमुने काचेच्या स्वच्छ बाटल्यांमध्ये वेगळे काढण्यात आले. या नमुन्यांच्या बाटल्यांवर अधिकारी, पंच आणि आरोपीच्या स्वाक्षऱ्यांचे कागदी लेबल लावून ते जागच्या जागी लाखेने सीलबंद करण्यात आले. जप्त केलेला हा सर्व मुद्देमाल सुरक्षिततेच्या दृष्टीने वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आला आहे. या गंभीर बेकायदेशीर कृत्याची दखल घेत, तहसीलदार यांच्या अधिकृत आदेशानुसार प्रभारी निरीक्षण अधिकारी गजानन सोनार यांनी दिलेल्या लेखी फिर्यादीवरून विलास राजाराम धाडवे याच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ७ अन्वये वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर उपस्थित होते.

## समृद्ध साहित्य, इतिहास आणि कवितांचा सुरेल संगम



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वासंतिक व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार व कवी बाबाराव मुसळे तसेच प्रसिद्ध कवी प्रा. प्रशांत मोरे यांच्या प्रभावी उपस्थितीत रंगले. दि.२३ मे रोजी वाशिम शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र (आत्मा) येथील भव्य सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला साहित्यप्रेमींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

आपल्या व्याख्यानात बाबाराव मुसळे यांनी वाशिम जिल्ह्याच्या समृद्ध साहित्यिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा सखोल वेध घेतला. त्यांनी प्राचीन 'वत्सगुल्म' या नावाचा संदर्भ देत इतिहासाची मांडणी केली. वाकाटक राजघराण्याच्या एका शाखेची राजधानी म्हणून वत्सगुल्मचे असलेले महत्त्व अधोरेखित करत आजचे वाशिम हेच प्राचीन वत्सगुल्म असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी बालाजी मंदिर परिसरातील शिलालेख, तत्कालीन सामाजिक सलोखा आणि धार्मिक सहिष्णुतेच्या परंपरांचा उल्लेख केला.

## प्रत्येक गावात काँग्रेसची विचारधारा पोहोचविणार

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे यांनी शुक्रवारी अकोट शहराचा दौरा करत पक्ष संघटनात्मक बांधणीचा निर्धार व्यक्त केला. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करून अभिनंदनाचा वर्षाव केला. शहरातील विविध भागांत स्वागत समारंभांचे आयोजन करण्यात आले होते.

### जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे यांचा अकोट दौरा; जल्लोषात स्वागत



प्रकाश तायडे यांच्या स्वागतावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. फटाक्यांची आतषबाजी, पुष्पहार अर्पण आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. शहरातील वातावरण काँग्रेसमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे यांनी काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी गावपातळीवर सक्रिय होण्याचे आवाहन केले. 'काँग्रेसची विचारधारा प्रत्येक गावागावात पोहोचवून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे,' असे ते म्हणाले. तसेच शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर काँग्रेस पक्ष सातत्याने आवाज उठवत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. जनतेच्या न्यायहक्कांसाठी संघर्ष करण्याची पक्षाची भूमिका कायम राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी अकोट नगर परिषद काँग्रेसचे गटनेते अजहर शेख, माजी जिल्हा परिषद सदस्य हाजी अब्दुल रशीद, अकोट शहराध्यक्ष तथा नगरसेवक सारंग मलानी, नगरसेवक शेख ख्वाजा, खवले पाटील, बादल अहिर, आचल बेलसरे, सरफराज परवेज, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष निनाद मानकर, बाळासाहेब काळे, आमदार साजिद खान पठाण यांचे पी.ए. सैय्यद अहमद, प्रतीक गोरे, अब्दुल मुबारक, शाहरुख पठाण यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीत 'इनसाईड गेम'? बाजोरिया पिता-पुत्रांची राजकीय कोंडी चर्चेत

## हिंगोली-परभणीवर अजित पवार गटाचा जोरदार दावा; अमरावतीतही गोपीकिशन बाजोरियांसमोर पेच

**अकोला/समीर ठाकूर**

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच महायुतीतील अंतर्गत संघर्ष उघडपणे समोर येऊ लागला आहे. बाहेरून एकजूट दाखवणाऱ्या महायुतीत आतून मात्र 'कोण कुणाचा गेम करतोय?' याची जोरदार चर्चा रंगली असून, शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार विप्लव बाजोरिया आणि त्यांचे वडील माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांची राजकीय कोंडी करण्याचे डावपेच सुरू असल्याचे बोलले जात आहे.

हिंगोली-परभणी विधान परिषद मतदारसंघात गतवेळी दणदणीत विजय मिळवून चर्चेत आलेले विप्लव बाजोरिया पुन्हा मैदानात उतरण्यासाठी सज्ज झाले असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने या जागेवर थेट दावा ठोकल्याने राजकीय समीकरणे अचानक बदलली आहेत. विशेष म्हणजे, भाजपमधील काही प्रभावी नेतेही या दाव्याला अनुकूल असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरू आहे.यामुळे शिवसेनेच्या वाट्याची मानली जाणारी जागाच धोक्यात आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यातच बाजोरिया यांच्या वाढत्या प्रभावामुळे पक्षातील काही नेते नाराज असल्याचे सांगितले जाते. या नाराज गटानेच पडद्यामागून हालचाली सुरू केल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार, शिंदे गटातील काही नेत्यांनीच विप्लव बाजोरिया यांची उमेदवारी रोखण्यासाठी मित्रपक्षातील नेत्यांशी 'सेटिंग' केल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, मुंबईतील वरिष्ठ पातळीवरूनही या जागेसाठी अपेक्षित ताकद लावली जात नसल्याने बाजोरिया समर्थकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. 'स्वतःच्याच पक्षातून काटा काढण्याचा प्रयत्न सुरू आहे का?' असा सवाल आता उपस्थित



होऊ लागला आहे. दुसरीकडे, अकोल्याचे माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया यांनी अमरावती विभागात राजकीय हालचाली वाढविल्या आहेत. अमरावती मतदारसंघातून विधान परिषद निवडणूक लढविण्याच्या तयारीत त्यांनी जिल्हाभर संपर्क वाढविला असून, विविध नेते, कार्यकर्ते आणि मतदारांशी बैठका सुरू केल्या आहेत. त्यांच्या वाढत्या दौऱ्यांमुळे अमरावतीच्या राजकीय वर्तुळातही चर्चांना उधाण आले आहे.

मात्र, अमरावतीचे राजकीय गणितही तितकेच गुंतागुंतीचे मानले जात आहे. हा मतदारसंघ भाजपच्या वाट्याला जाण्याची शक्यता अधिक असल्याचे बोलले जात असल्याने, शिंदे गटाचे गोपीकिशन बाजोरिया यांना उमेदवारी मिळणार कशी? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. महायुतीत सध्या भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यातील वाटाघाटी अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे सांगितले जात आहे. शिवसेना शिंदे गटाने सात जागांवर दावा कायम ठेवला असला तरी मित्रपक्षांचा वाढता दबाव पाहता अंतिम यादीत मोठे फेरबदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या सर्व घडामोडींमुळे बाजोरिया पिता-पुत्र सध्या राजकीयदृष्ट्या 'डिफेन्सिव्ह मोड'मध्ये गेल्याचे चित्र आहे. महायुतीतील मित्रपक्षांचे दबावतंत्र, पक्षांतर्गत विरोधकांचे राजकारण आणि बदलती समीकरणे यामुळे आगामी काळात शिंदे सेनेतील अंतर्गत संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.

# केंद्र सरकारची असंवेदनशीलता म्हणजे

## 'रोम जळत असताना बासरी वाजवत बसलेल्या निरो'सारखी - रोहित पवार

**पुणे**-राज्यात सध्या पेट्रोल आणि डिझेलच्या तीव्र टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी हवालदिल झाले आहेत. एकीकडे इंधनाचे दर गगनाला भिडत असताना, दुसरीकडे राज्यातील बहुतांश पेट्रोल पंप पूर्णपणे कोरडे पडल्याचे चित्र आहे. ऐन पेरणीच्या हंगामात डिझेल उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची मशागतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. इंधनासाठी नागरिकांना पेट्रोल पंपांवर तासन्तास आणि काही ठिकाणी तर रात्रभर मुक्काम ठोकून ताटकळत राहावे लागत आहे. जळगाव जिल्ह्यासह संपूर्ण राज्यभरात हीच भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येवरून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सत्ताधाऱ्यांची असंवेदनशीलता पाहता 'रोम



जळता असताना बासरी वाजवत बसलेल्या निरो' सारखी असल्याची घणाघाती टीका रोहित पवार यांनी केली.

डिझेल-पेट्रोलचा वरूनच पुरवठा होत नसल्याने पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांना डिझेल मिळत नाही, परिणामी ऐन पेरणीच्या तोंडावर मशागतीची कामं खोळंबली आहेत. जळगाव जिल्ह्यात पूर्णतः इंधन साठा संपल्याने पंपांवर रात्रीपासून मोठ्या रांगा लागल्या आहेत.रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वरून केंद्र व राज्य सरकारवर टीका केली आहे. रोहित पवार यांनी सरकारवर निशाणा साधताना म्हटले आहे की, वरूनच डिझेल आणि पेट्रोलचा पुरवठा होत नसल्याने पंपांवर इंधन मिळेनासे झाले आहे. पेरणीच्या तोंडावर शेतकरी अडचणीत सापडला असून राज्य सरकारला अद्यापही या परिस्थितीचे गांभीर्य समजलेले नाही. सध्या राज्यातील वातावरण अत्यंत चिंताजनक आहे. पेपरफुटी, इंधन तुटवडा, महागाई आणि महिलांवरील अत्याचार यांसारख्या गंभीर समस्यांनी राज्य पोखरले गेले असून कुठेही आलबेल परिस्थिती नाही. मात्र केंद्र आणि राज्य सरकारची या सर्व बाबींकडे असणारी असंवेदनशीलता पाहता, 'रोम जळत असताना बासरी वाजवत बसलेल्या निरो'ची आठवण आल्याशिवाय राहत नाही अशी टीका केली आहे.

# गुलाबराव पाटलांच्या मुलास विधान परिषदेसाठी समर्थन

**जळगाव**-विधान परिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच कोणाला उमेदवारी मिळणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे पुत्र प्रताप पाटील यांचे नाव




सुरुवातीपासूनच आघाडीवर मानले जात आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाकडून प्रताप पाटील यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असतानाच पाचोऱ्याचे आमदार किशोर पाटील यांनी त्यांना पक्षातून आव्हान देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, आता अचानक आमदार पाटील यांनी 'यू टर्न' घेत पालकमंत्री पाटील यांचे पुत्र प्रताप पाटील यांना समर्थन जाहीर केले आहे. पालकमंत्री पाटील यांनी मुलासाठी हालचाली वाढविल्याच्या पार्श्वभूमीवर पाचोरा मतदारसंघाचे आमदार किशोर पाटील यांच्या गटाकडूनही विधान परिषदेसाठी त्यांचे पुत्र सुमित पाटील यांना पुढे करत स्थानिक पातळीवर मोर्चेबांधणी सुरू करण्यात आली होती. सुमित पाटील यांची दावेदारी मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या बैठका, स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांशी संपर्क तसेच राजकीय वातावरण निर्मितीचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा होती. स्वतः आमदार किशोर पाटील यांनीही माध्यमांशी बोलताना आपल्या मुलाच्या नावाबाबत सकारात्मक संकेत दिले होते. त्यामुळे शिवसेना शिंदे गटात अंतर्गत स्पर्धा वाढल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, या सर्व घडामोडींना आता अनपेक्षित वळण मिळाले आहे.

# सावधान! 'या' देशांचा प्रवास करू नका

# इबोलाच्या उद्रेकानंतर केंद्र सरकारची ॲडव्हायझरी जारी

**नवी दिल्ली**-आफ्रिकेतील तीन देशांमध्ये इबोला विषाणूचा प्रादुर्भाव अत्यंत वेगाने आणि गंभीररित्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आपल्या नागरिकांना काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदान या देशांमध्ये गरज नसल्यास प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. तसेच जे हिंदुस्थानी नागरिक सध्या या तिन्ही देशांमध्ये वास्तव्यास आहेत त्यांना आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याचे आणि स्थानिक प्रशासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. 'इंडिया टूडे'ने याबाबत वृत्त दिले आहे.

काँगो आणि इतर प्रभावित देशांमधील बदलती परिस्थिती लक्षात घेता तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या शिफारशींनुसार केंद्र सरकार आपल्या सर्व नागरिकांना लोकशाही प्रजासत्ताक काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानचा गरज नसेल तर प्रवास टाळण्याचा सल्ला देत आहे, असे केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.



जागतिक आरोग्य संघटना आणि आफ्रिका सेंटर्स फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेंशन यांनी या आफ्रिकन देशांमधील इबोलाच्या उद्रेकाला जागतिक आणीबाणी घोषित केल्यानंतर हिंदुस्थानने हे पाऊल उचलले आहे. आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांनुसार १७ मे २०२६ रोजी काँगो आणि युगांडामधील इबोलाच्या परिस्थितीला आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

२२ मे २०२६ रोजी जारी केलेल्या नवीन निर्देशानुसार, बाधित देशांमधील आरोग्य यंत्रणांना आंतरराष्ट्रीय सीमांवर आणि विमानतळांवर देखरेख वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विषाणूबाधित भागातून येणाऱ्या आणि ताप असलेल्या प्रवाशांची तपासणी करणे, त्यांची नोंद करणे आणि त्यांना विलगीकरणात ठेवणे या उपाययोजनांवर भर दिला जात आहे.

हा इबोला उद्रेक प्रामुख्याने बुन्दिबुग्यो विषाणू या स्ट्रेनमुळे होत आहे. हा एक अत्यंत घातक व्हायरल हेमोरेजिक फिव्हर आहे. या आजारामध्ये मृत्यूचा दर अत्यंत जास्त असतो आणि मानवी शरीरावर याचा गंभीर परिणाम होतो. चिंतेची बाब म्हणजे सध्या बुन्दिबुग्यो स्ट्रेनला रोखण्यासाठी किंवा त्यावर उपचार करण्यासाठी कोणतीही मान्यताप्राप्त लस किंवा विशिष्ट थेरपी उपलब्ध नाही. त्यामुळे सुरुवातीच्या काळातच लक्षणे शोधणे आणि रुग्णाला इतरांपासून वेगळे करणे हाच एकमेव उपाय आहे.

## स्टाफ सिलेक्शन कमिशनची 'मेगाभरती'

## देशभरात १२ हजार २५६ जागा भरणार

**मुंबई**-स्टाफ सिलेक्शन कमिशन (एसएससी) मार्फत देशभरात मेगाभरती केली जाणार आहे. एसएससीमार्फत सीजीएलच्या १२ हजार २५६ जागांची भरती केली जाणार आहे. या भरती अंतर्गत विविध पदांची भरती केली जाणार असून ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. पात्र उमेदवार २२ जून २०२६पर्यंत ऑनलाईन अर्ज भरू शकतील.

टियर-१ची परीक्षा ऑगस्ट २०२६ रोजी तर टियर-२ची परीक्षा डिसेंबर २०२६ रोजी घेतली जाईल. भरती संबंधी सविस्तर माहिती https://ssc.gov.in या अधिकृत वेबसाईटवर देण्यात आली आहे.

असिस्टंट ऑडिट ऑफिसर पदासाठी पदवीधर, राज्याच्या प्रादेशिक/अधिकृत भाषेतील ज्ञान असणे आवश्यक आहे. ज्युनियर स्टॅटिस्टिकल ऑफिसर पदासाठी कोणत्याही शाखेतील पदवी आणि १२वीत गणितामध्ये किमान ६० गुण आवश्यक. स्टॅटिस्टिकल इन्व्हेस्टिगेटर ग्रेड-२ पदासाठी सांख्यिकी, गणित, अर्थशास्त्र, लोकसंख्याशास्त्र, लोकसंख्या अभ्यास, संक्रिया संशोधन, माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, संगणक अभियांत्रिकी, संगणक तंत्रज्ञान, संगणक उपयोजन, डेटा विज्ञान किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता यांपैकी कोणत्याही विषयातील पदवी. तर बाकीच्या पदासाठी कोणत्याही शाखेतील पदवी असणे आवश्यक आहे.

असिस्टंट ऑडिट ऑफिसर, असिस्टंट अकाउंट्स ऑफिसर, असिस्टंट सेक्शन ऑफिसर, असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर, इंस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स, इंस्पेक्टर (सेंट्रल एक्साईज), इंस्पेक्टर (एक्झामिनर), असिस्टंट एन्फोर्समेंट ऑफिसर, सब इंस्पेक्टर, एक्झिक्युटिव असिस्टंट, रिसर्च असिस्टंट, डिविजनल अकाउंटेंट, सब इंस्पेक्टर/ज्युनियर इंटेलिजेंस ऑफिसर, ज्युनियर स्टॅटिस्टिकल ऑफिसर, स्टॅटिस्टिकल इन्व्हेस्टीगेटर ग्रेड-२, ऑफिस सुपरिंटेंडेंट, सेक्शन हेड, ऑडिटर, अकाउंटेंट, अकाउंटेंट/ज्युनियर अकाउंटेंट, पोस्टल असिस्टंट/सॉर्टिंग असिस्टंट, वरिष्ठ सचिवालय सहाय्यक/उच्च श्रेणी लिपिक, सिनियर अ?डमिन असिस्टंट, टॅक्स असिस्टंट, सब-इंस्पेक्टर.

# वीजनिर्मितीचे सहा संच बंद, वाढत्या उष्णतेत राज्यावर वीज संकट

**नागपूर**-राज्यात तापमान वाढत असल्याने विजेची मागणीही वाढत आहे. त्यातच महानिर्मितीचे नाशिक, कोराडी, खापरखेडा, पारस आणि चंद्रपूर येथील एकूण सहा वीजनिर्मिती संच तांत्रिक बिघाड व दुरुस्तीच्या कामांमुळे बंद पडल्याने वीज व्यवस्थेवरील ताण वाढला आहे. मात्र, यापैकी चार संच पुढील १२ तासांत सुरू होतील, त्यामुळे चिंतेचे कारण नसल्याचा दावा महानिर्मितीने केला आहे.

महानिर्मितीतील सूत्रांच्या माहितीनुसार, २३ मे रोजी दुपारी १२.४० वाजता नाशिक औष्णिक वीज केंद्रातील संच क्रमांक ४ (२१० मेगावॅट),




कोराडी प्रकल्पातील संच क्रमांक ९ (६६० मेगावॅट), खापरखेडा येथील संच क्रमांक ३ (२१० मेगावॅट) व संच क्रमांक ५ (५०० मेगावॅट), पारस वीज निर्मिती केंद्रातील संच क्रमांक ४ (२५० मेगावॅट) तसेच चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रातील संच क्रमांक ६ (२१० मेगावॅट) बंद होते. या सर्व संचांची एकत्रित वीज निर्मिती क्षमता २,०४० मेगावॅट आहे.

उष्णतेच्या लाटेमुळे वातानुकूलन यंत्रणा, पंखे, शेतीपंप तसेच औद्योगिक वापर वाढल्याने राज्यातील विजेची मागणी वाढत आहे. त्यामुळे महावितरण आणि ऊर्जा विभागासमोर अखंडित वीजपुरवठा राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.दरम्यान, राज्यातील काही भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे विजेच्या मागणीत शनिवारी किंचित घट झाली. त्यामुळे शनिवारी दुपारी १२.४० वाजता राज्यातील विजेची मागणी २६ हजार ५७७ मेगावॅट होती. त्यात मुंबईतील ३ हजार ८९८ मेगावॅट मागणीचा समावेश होता. त्याचवेळी राज्यात एकूण १६ हजार ५७८ मेगावॅट वीज निर्मिती होत होती. केंद्राच्या वाट्यातून राज्याला ९,७६६ मेगावॅट वीज उपलब्ध झाली होती, तर उर्वरित वीज खासगी कंपन्यांकडून मिळत होती.

वीज क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, बंद असलेल्या संचांची दुरुस्ती वेळेत पूर्ण न झाल्यास पुढील काही दिवसांत वीजपुरवठ्यावर परिणामाचा धोका आहे.यंदाच्या उन्हाळ्यात महानिर्मितीचे वीज उत्पादन दररोज साधारण ७ हजार ते ७,५०० मेगावॅटदरम्यान होते. मात्र, सहा संच बंद झाल्यानंतर शनिवारी दुपारी १२.४० वाजता उत्पादन घटून ५,६८२ मेगावॅटवर आले.

> महानिर्मितीचे अधिकारी आणि कर्मचारी बंद पडलेल्या संचांच्या दुरुस्तीसाठी युद्धपातळीवर काम करत आहेत. त्यापैकी चार संचांची दुरुस्ती पूर्ण होऊन ते टप्प्याटप्प्याने रविवारी सकाळपर्यंत कार्यान्वित होतील. त्यामुळे सध्या चिंतेचे कारण नाही. राज्याला गुणवत्तापूर्ण वीजनिर्मितीसाठी महानिर्मिती कटिबद्ध आहे.
>
> **अभय हरणे,**
> संचालक (संचलन),
> महानिर्मिती, मुंबई.

# आठ दिवसांत ७ खून; नागपूर बनले मर्डर कॅपिटल

**नागपूर**-गृहमंत्री पद हे देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असूनही राज्याची उपराजधानी नागपूर हे मर्डर कॅपिटल बनले आहे. अवघ्या आठ दिवसांत नागपुरात ७ खून झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नागपुरात चुलत आजीची हत्या केल्याची घटना ताजी असतानाच हिंगणा परिसरात कौटुंबिक वादातून मोठ्या भावाने लहान भावाची निर्घृण हत्या केली. नागपुरातील लश्करीबागेत एका ज्येष्ठ महिलेचा गळा चिरून तिचा दिवसाढवळ्या खून करण्यात आला. नंदनवनमध्ये जुन्या वादातून एका तरुणाची हत्या करण्यात आली आहे. यासारख्या एकूण आठ दिवसांत ७ खून झाले आहेत.

## संक्षिप्त

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अचानक दिल्ली दौरा

**मुंबइ**-राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज म्हणजेच रविवार २४ मे रोजी अचानक दिल्ली दौऱ्यावर रवाना झाल्याने राज्याच्या



राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. दिल्लीमध्ये ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असून, या बैठकीत महायुतीतील विधान परिषद निवडणुकीच्या जागावाटपासह अनेक महत्त्वाच्या राजकीय घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागावाटपाचा प्राथमिक फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानुसार भाजप १२ जागांवर उमेदवार उभे करणार असून, शिवसेनेला ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा मिळण्याची शक्यता आहे. मात्र काही जागांवरून मित्रपक्षांमध्ये अद्याप मतभेद कायम असल्याचे बोलले जात आहे.

### मराठवाड्यात मॉन्सूनपूर्व पावसाचा कहर!

**छत्रपती संभाजीनगर**-मराठवाड्यात रविवारी मॉन्सूनपूर्व पावसाने



जोरदार हजेरी लावत अनेक जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढले. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेली, तर काही भागांत हरभऱ्याएवढ्या गारांचा वर्षाव झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.वादळी वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक गावांमध्ये झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. काही ठिकाणी वीजपुरवठाही खंडित झाला. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. मात्र या पावसामुळे गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या प्रचंड उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. जालना जिल्ह्यातील घनसावंगी आणि अंबड तालुक्यात बेमोसमी पावसाने जोरदार हजेरी लावली. घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. अनेक ठिकाणी गारपीटही झाली. केळी, पपई आणि आंब्याच्या फळबागांचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. वाऱ्यामुळे काही घरांवरील पत्रे उडून गेली असून मोठा फटका बसला.

# वन्यजीवतज्ज्ञ म्हणतात, अतिउष्णतेमुळे वाघ आक्रमक

## पशुवैद्यकीय डॉक्टरांनी दिले वैज्ञानिक स्पष्टीकरण

**चंद्रपूर**-वाघ-मानव संघर्षामागे केवळ 'नरभक्षक' प्रवृत्ती नसून तीव्र उष्णतेमुळे वाघांच्या शरीर आणि वर्तनावर होणारे परिणाम कारणीभूत असल्याचे मत वन्यजीवतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. उन्हाळ्यात विदर्भाचे तापमान हे ४५ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असल्याने वाघांमध्ये 'हायपरथर्मिया' अर्थात अतिउष्णतेमुळे निर्माण होणारा ताण वाढत असून त्यातून आक्रमक वर्तनाच्या घटना घडत असल्याचे सांगितले जात आहे.

सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाहीच्या जंगलात वाघिणीने



चार महिलांना ठार केल्याच्या घटनेनंतर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे यांनी यासंदर्भात वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, वाघ हे 'होमियोथर्मिक' प्राणी असल्याने शरीराचे अंतर्गत तापमान स्थिर ठेवणे त्यांच्यासाठी अत्यावश्यक असते. तापमान हे अतिशय वाढल्यास वाघांच्या शरीरातील उष्णता बाहेर टाकण्याची क्षमता कमी होते आणि 'हायपरथर्मिया' निर्माण होतो.

यामुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर ताण येऊन शरीरात 'कॉर्टिसोल' आणि 'ॲड्रेनालिन'सारख्या तणाव निर्माण करणाऱ्या हार्मोन्सचे प्रमाण वाढल्याने वाघ चिडचिडे, आक्रमक बनतात.

वाघ उन्हापासून बचावासाठी ज्या ओढे, सावलीचे भाग किंवा घनदाट जंगल परिसरात आश्रय घेतात, त्याच भागात तेंदूपत्ता मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यामुळे मानव आणि वाघ यांचा थेट संपर्क वाढत असल्याचे निरीक्षण आहे.

तेंदूपत्ता गोळा करताना महिला आणि मजूर खाली वाकून काम करतात. वाघाची दृष्टी हालचाली आणि आकृतीवर आधारित असल्याने वाकलेली मानवी आकृती ही चारपायी प्राण्यासारखी भासू शकते. आधीच उष्णतेमुळे तणावाखाली असलेला वाघ अशा परिस्थितीत तत्काळ हल्ला करण्याची शक्यता वाढते, असेही डॉ. खोब्रागडे यांनी स्पष्ट केले.

# कलिंगडनंतर आता आमरस खाल्ल्यानंतर ७ जाणांना विषबाधा

**आहिल्यानगर**-मुंबईत बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्याने एकाच कुटुंबातील चार जणांना विषबाधा झाल्याचा दावा करण्यात आल्यानंतर आता अहिल्यानगरातील शेवगावमध्ये आमरस खाल्ल्यानंतर एकाच कुटुंबातील सात जणांना विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे.जायभाय कुटुंबातील सर्वांनी आंब्याचा रस खाल्ला. त्यानंतर जायभाय कुटुंबातील सात जणांना चक्कर येणे, तोल जाणे असा त्रास सुरू झाला. नातेवाईकांनी सुरुवातीला सर्वांना शेवगावमधील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले, परंतु सर्वांची प्रकृती बिघडल्याने त्यांना अहिल्यानगरमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही केमिकल्स पोटात गेल्याने अशा प्रकारचा त्रास होऊ शकतो, असे उपचार करणारे डॉ. सचिन पांडुळे यांनी म्हटले आहे. दरम्यान, सात रुग्णापैकी सहा जणांना रुग्णालयातून वेगवेगळ्या दिवशी डिस्चार्ज देण्यात आला असून एकावर अजूनही उपचार सुरू आहे, मात्र सर्वांची प्रकृती स्थिर आहे. कॅल्शियम कार्बाईडने पिकवलेल्या आंब्यांचा संशय आल्याने विक्रेत्यांकडील आंब्यांचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेण्यात आले आहेत. ताब्यात घेतलेले आंबे पुण्यातील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७७ ■ सोमवार, २५ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## गावची शाळा सोडून बाहेर प्रवेश घेतल्यास कारवाई

### लहान आर्वी ग्रामसभेतील निर्णयाने खळबळ; पालकांचा शासकीय लाभ बंद करण्यावर मतदान

**आष्टी जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील लहान आर्वी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत गावातील शाळा वाचवण्यासाठी घेण्यात आलेल्या एका निर्णयाने परिसरात चांगलीच चर्चा रंगली आहे. गावातील विद्यार्थी शिक्षणासाठी आष्टी येथील शाळांमध्ये प्रवेश घेत असल्याने स्थानिक शाळांची पटसंख्या घटत चालली आहे. यावर उपाय म्हणून बाहेरील शाळेत प्रवेश देणाऱ्या पालकांवर कारवाई करण्याचा मुद्दा ग्रामसभेत मांडण्यात आला.



सरपंच सुनील साबळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत लहान आर्वी व लिंगापूर येथील जिल्हा परिषद शाळा तसेच संत गजानन महाराज विद्यालय टिकवण्यासाठी विशेष चर्चा झाली. गावातील नर्सरीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी बाहेर जाऊ नये, अशी भूमिका अनेक सदस्यांनी मांडली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा निलिमा देशमुख यांनी याबाबतचा प्रस्ताव मांडला तर रविंद्र आकोलकर यांनी त्यास अनुमोदन दिले.

ग्रामसभेत आष्टी येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा शासकीय लाभ बंद करण्यात यावा का, यावर मतदान घेण्यात आले. उपस्थित ९५ मतदार सदस्यांपैकी ४१ सदस्यांनी लाभ बंद करण्याच्या बाजूने मत दिले, तर ६ सदस्यांनी विरोध दर्शविला. ४८ सदस्य तटस्थ राहिले. त्यामुळे स्थानिक शाळा टिकवण्यासाठी बहुसंख्य सदस्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे दिसून आले.

यावेळी विद्यार्थ्यांना गावातच दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांची गुणवत्ता वाढवावी आणि पालकांनी स्थानिक शाळांवर विश्वास ठेवावा, असे आवाहन निलिमा देशमुख यांनी केले. शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनीही गावातील शिक्षण व्यवस्था टिकवण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

ग्रामसभेत माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान, मोकाट जनावरांवर नियंत्रण, मान्सूनपूर्व कामे, बंद झालेल्या लाडकी बहीण योजनेचे अनुदान सुरू करणे, बळीराजा पांदण रस्ते योजना, अतिक्रमण हटविणे तसेच ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी विविध शुल्क आकारणीचे प्रस्ताव यावरही चर्चा झाली.

दुकानदारांना ५०० रुपये, पानटपरीधारकांना २५० रुपये शुल्क आकारणे तसेच मोबाईल टॉवरसाठी वार्षिक शुल्क आकारण्याचा मुद्दाही सभेत मांडण्यात आला.

ग्रामसभेला उपसरपंच अमोल होले, सदस्य सागर नागापुरे, कांता इंगोले, भाग्यश्री निंभोरकर, ग्रामपंचायत अधिकारी अनुराधा धारपुरे, तलाठी अक्षय चोरे, पोलिस पाटील देवानंद पाटील, वनरक्षक प्रफुल्ल घोरपडे, मुख्याध्यापिका तारा राठोड, मुख्याध्यापक शरद बाबरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रेतीतून काळा पैसा, सत्तेच्या आशीर्वादाने खुलेआम लूट

### महसूल मंत्र्यांच्या पुत्रावर गंभीर आरोप; कोट्यवधींचे घाट लाखोंमध्ये वाटल्याचा दावा

**आष्टी शहीद जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील रेती घाट वाटप प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, महसूल मंत्र्यांच्या पुत्राच्या हस्तक्षेपातून कोट्यवधी रुपयांचे शासकीय रेती घाट कवडीमोल दरात भाजप कार्यकर्ते, काही पत्रकार आणि संबंधित व्यक्तींना वाटण्यात आल्याची खळबळजनक चर्चा जिल्ह्यात रंगली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शासनाच्या महसुलाला कोट्यवधींचा फटका बसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.



माहितीनुसार, फेब्रुवारी महिन्यात वर्धा जिल्ह्यातील अनेक रेती घाटांचा कागदोपत्री लिलाव दाखवून काही निवडक व्यक्तींना घाट ताब्यात देण्यात आले. विशेष म्हणजे संबंधित विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनाही अंधारात ठेवून व्यवहार पूर्ण झाल्याचा आरोप होत आहे. आर्वी व आष्टी तालुक्यातील घाट अवघ्या सुमारे एक कोटी साठ लाख रुपयांत देण्यात आल्याचे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्ष बाजारमूल्य आणि पूर्वीच्या महसुलाच्या तुलनेत ही रक्कम अत्यंत कमी असल्याची चर्चा आहे. दरम्यान, घाट ताब्यात घेतल्यानंतर दिवस-रात्र जेसीबी, पोकलँड आणि बोटच्या सहाय्याने हजारो ब्रास रेतीचा उपसा सुरू असल्याचा आरोप आहे. ट्रॅक्टर व डम्परमधून खुलेआम रेती वाहतूक केली जात असून वाहनांकडे रॉयल्टी पावत्या नसतानाही महसूल, पोलीस व वन विभागाकडून कोणतीही तपासणी होत नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

टेकोडा घाटावर भागीदारांमध्ये वाद होऊन मारहाणीची घटना घडल्याचेही समोर आले आहे. तर गोदावरी घाट परिसरात गावकऱ्यांनी अवैध वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केल्यानंतर घाट चालकांकडून संपूर्ण गाव उडवून टाकू अशा धमक्या दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या तक्रारी संबंधित विभागाकडे करूनही गावकऱ्यांना उलट समज देऊन परत पाठविण्यात आल्याचा संताप व्यक्त होत आहे.

दलपतपूर घाट परिसरात मौजा सिरसोली हद्दीत भरदिवसा पोकलँडने उत्खनन करून नदीचा प्रवाह बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे आगामी पावसाळ्यात सिरसोलीसह परिसरातील गावांना पुराचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

या सर्व प्रकारामुळे घाट चालकांना पोलीस, महसूल आणि वन विभागाचे अभय असल्याची चर्चा उघडपणे सुरू आहे. स्थानिक पत्रकारांनी अवैध उत्खननाच्या बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर केवळ दिखाऊ कारवाया केल्या जातात; मात्र मोठे रॅकेट मात्र अभयातच राहते, असा आरोप होत आहे. एका पत्रकाराला घाट चालकांनी आमचे कुणी काहीही बिघडवू शकत नाही, अशी धमकी दिल्याचाही दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून रेती घाट वाटप, महसूल नुकसान, अवैध उत्खनन आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. मात्र या आरोपांवर संबंधित विभाग किंवा संबंधित व्यक्तींकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

## कंटेनरमध्ये घुसली दुचाकी; दोघांचे पाय चिरडले

### कलोडे चौकातील भीषण अपघातः दोघांवर सेवाग्राममध्ये उपचार

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील गजबजलेल्या कलोडे चौकात भरधाव दुचाकी थेट कंटेनरमध्ये घुसल्याने दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी घडली. या भीषण अपघातामुळे चौकात काही काळ एकच गोंधळ उडाला होता.



विजय उत्तम साधा (२६) व लल्लन सिहारन यादव (४०) अशी जखमींची नावे आहेत. विजय साधा हा हिंगणघाट एमआयडीसी परिसरातील साईकृपा जिनिंगमध्ये मजूर म्हणून काम करतो, तर लल्लन यादव हा त्याच जिनिंगमध्ये हमाली ठेकेदार म्हणून कार्यरत आहे. दोघेही दुचाकीने जात असताना कलोडे चौकात अचानक कंटेनरसमोर आल्याने दुचाकी थेट वाहनाखाली शिरली.

या भीषण धडकेत दोघांच्याही पायांना गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांच्या ११२ पथकातील प्रमोद डडमल यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर दोघांनाही सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात रेफर करण्यात आले. या घटनेचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस ठाण्याचे प्रभारी अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## आजपासून बारावीच्या गुणपत्रिकांचे वाटप

### तीन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर विद्यार्थ्यांना दिलासा; प्रवेश प्रक्रियेला मिळणार वेग

**वर्धा जनमाध्यम :** बारावीचा निकाल जाहीर होऊन तीन आठवडे उलटल्यानंतर अखेर आजपासून विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका मिळणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर गुणपत्रिका आणि प्रमाणपत्रांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे इंजिनिअरिंग, मेडिकल, फार्मसीसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी रखडलेली कागदपत्र प्रक्रिया आता मार्गी लागणार आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या बारावी परीक्षेचा निकाल २ मे रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला होता. मात्र, मूळ गुणपत्रिका वेळेत उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. विशेषतः परराज्य व परजिल्ह्यात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना टीसी व इतर कागदपत्रांच्या पडताळणीत अडचणी येत होत्या.

शिक्षण मंडळाने अखेर परिस्थितीची दखल घेत नव्या स्वरूपातील गुणपत्रिका तयार केल्या आहेत. यंदा गुणपत्रिका व प्रमाणपत्र एकत्रित स्वरूपात देण्यात येत असून त्यावर विद्यार्थ्यांचा फोटोदेखील असणार आहे. आजपासून सुरू झालेल्या या वितरणामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

## शिक्षकांना 'आभा' सक्तीचा डोस

### आरोग्य योजनांचा लाभ हवा तर कार्ड काढाच

### शिक्षण संचालनालयाचे आदेश

**वर्धा जनमाध्यम :** राज्यातील जिल्हा परिषद तसेच १०० टक्के अनुदानित खासगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आता 'आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट' अर्थात 'आभा' कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. शिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय उपसंचालक, शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना आदेश जारी करत तातडीने नोंदणी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना' आणि 'महात्मा फुले जन आरोग्य योजना' अंतर्गत कॅशलेस उपचारांचा लाभ शिक्षक व कर्मचाऱ्यांना मिळावा, यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनांद्वारे दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंत उपचार सुविधा उपलब्ध होणार असल्याने गंभीर आजारांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत मिळणार आहे.

'आभा' कार्ड तयार करण्यासाठी केंद्र सरकारच्या डिजिटल हेल्थ मिशनच्या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. आधार कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्सच्या आधारे ओटीपी पडताळणी करून काही मिनिटांत कार्ड तयार होणार असून, त्यानंतर १४ अंकी 'आभा' क्रमांक उपलब्ध होईल. संबंधित कार्ड पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

याशिवाय सरकारी रुग्णालयांतील 'कॉमन सर्व्हिस सेंटर'मध्ये ऑफलाईन नोंदणीची सोय करण्यात आली आहे. आधार कार्डच्या सहाय्याने कर्मचाऱ्यांना तेथे 'आभा' कार्ड तयार करून दिले जाणार आहे. दरम्यान, शिक्षण संचालनालयाने जारी केलेल्या पत्रात सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तातडीने 'आभा' कार्ड काढून घ्यावे, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. अन्यथा भविष्यात विविध आरोग्य योजनांच्या लाभांपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## कोळसा आणला, पण स्वतःच काळाच्या पडद्याआड

### उष्माघाताने चालकाचा बळी; कंपनीच्या निष्काळजीपणाने घेतला जीव?

**देवळी । जनमाध्यम :** देवळी येथील महालक्ष्मी एसएमडब्ल्यू कंपनीच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका ट्रक चालकाचा संशयास्पद मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. कर्नाटक येथून कोळसा घेऊन आलेले ट्रक चालक पपगौडा किरणगौडा येरवल (रा. कर्नाटक) हे कंपनीत नंबर न लागल्याने पार्किंगमध्येच ट्रक उभा करून थांबले होते. मात्र, प्रचंड उकाडा आणि जीवघेण्या उन्हाच्या तडाख्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. माहितीनुसार, कडक उन्हामुळे त्रस्त झालेल्या चालकाला तीव्र तहान लागल्याने त्यांनी थंड पाणी प्यायले. त्यानंतर अचानक त्यांना झटके येऊ लागले. उपस्थित चालक व कर्मचाऱ्यांनी तातडीने त्यांना सावंगी येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.या घटनेनंतर महालक्ष्मी एसएमडब्ल्यू कंपनीच्या व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. कंपनीत दररोज शेकडो ट्रक येत असतानाही चालकांसाठी सावलीची व्यवस्था, थंड पिण्याचे पाणी, विश्रांती कक्ष किंवा प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप वाहन चालकांकडून केला जात आहे. उन्हाच्या झळा सहन करत अनेक चालक तासन्तास पार्किंगमध्ये थांबत असल्याचे चित्र आहे.

## हजारो महिलांचे हप्ते बंद

## चुका यंत्रणेच्या, शिक्षा महिलांना; लाडकी बहीण योजनेवर प्रश्नचिन्ह

### मुदतवाढ द्या, चुका दुरुस्त करा; खा. अमर काळे यांची मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे मागणी

**वर्धा जनमाध्यम :** मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेच्या केवायसी प्रक्रियेतील गोंधळामुळे राज्यातील हजारो महिलांचे लाभ बंद झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. ऑनलाईन प्रक्रियेतील तांत्रिक बिघाड, चुकीचे पर्याय निवडले जाणे, आधार लिंकिंगमधील त्रुटी, मोबाईल क्रमांक व बँक खात्यातील विसंगती यामुळे पात्र महिलांनाच अपात्र ठरविण्याचा प्रकार घडत असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे धाव घेत केवायसी दुरुस्तीसाठी विशेष संधी आणि मुदतवाढ देण्याची जोरदार मागणी केली आहे.



'लाडकी बहीण' योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी शासनाने केवायसी सक्तीची केली; मात्र ग्रामीण भागातील महिलांना ऑनलाईन प्रक्रियेची पुरेशी माहितीच नसल्याने अनेकांचा गोंधळ उडाला. त्यातच नेटवर्कचा बोजवारा, ऑनलाईन केंद्रांवरील हलगर्जीपणा आणि शासनाच्या अपुऱ्या जनजागृतीमुळे हजारो महिलांचे हप्ते थांबले. चुका प्रणालीच्या आणि शिक्षा महिलांना अशी संतप्त प्रतिक्रिया लाभार्थी महिलांतून उमटत आहे.

अनेक महिलांनी खासदार अमर काळे यांची भेट घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली. त्यानंतर खासदारांनी मंत्री आदिती तटकरे यांना पत्र पाठवून, केवायसीमध्ये झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, मुदतवाढ जाहीर करावी तसेच ग्रामीण व दुर्गम भागात शिबिरे घेऊन महिलांना मदत करावी, अशी मागणी केली.

गरीब महिलांच्या संसाराला या योजनेचा मोठा आधार मिळाला आहे. तांत्रिक कारणांमुळे पात्र महिलांना वंचित ठेवणे अन्यायकारक आहे, असे स्पष्ट करत शासनाने संवेदनशीलता दाखवून तातडीने निर्णय घ्यावा, असा इशाराच खासदारांनी दिला आहे.

## अधिकमासात माहेश्वरी समाजाची भक्तिमय धर्मयात्रा

### लसनपूर गोशाळेत गौसेवा, रुद्राभिषेक आणि ५६ भोग अर्पण

**वर्धा जनमाध्यम :** अधिकमासाच्या (पुरुषोत्तम मास) पावन पर्वानिमित्त माहेश्वरी मंडळ, वर्धा यांच्या वतीने भक्तिमय धर्मयात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेत समाजातील ५० हून अधिक महिला-पुरुष भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रद्धा, भक्ती आणि गौसेवेचा अनोखा संदेश दिला.



यात्रेची सुरुवात ग्राम साकुर्ली येथील जागृत भवानी माता देवस्थानात दर्शन व सत्संगाने करण्यात आली. त्यानंतर भाविकांचा ताफा प्रसिद्ध लसनपूर गोशाळेत पोहोचला. येथे शेकडो गोवंशाचे संगोपन केले जात असून, भाविकांनी गोमातेची सेवा करून पुण्यलाभ घेतला.

यावेळी गोमातेसाठी विशेष ५६ भोग अर्पण करण्यात आले. यामध्ये विविध शाकभाज्या, धान्य, ड्रायफ्रूट्स तसेच हिरव्या चाऱ्याचा समावेश होता. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

धार्मिक प्रवचनात अधिकमासाचे महत्त्व विशद करण्यात आले. भगवान श्रीकृष्णाला प्रिय असलेल्या या महिन्यात केलेले दान, जप, तप व गौसेवा अनेक पटींनी फळ देणारी मानली जाते, असे वक्त्यांनी सांगितले. तसेच गोमाता ही भारतीय संस्कृती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि पर्यावरण संतुलनाची आधारशिला असल्याचेही नमूद करण्यात आले.

लसनपूर गोशाळा परिसरातील भव्य महादेव मंदिरात भाविकांनी विधिवत रुद्राभिषेक करून भगवान शंकराची पूजा-अर्चना केली. त्यानंतर सत्संग व ध्यान कक्षात आयोजित आध्यात्मिक कार्यक्रमात गौसेवेचे महत्त्व आणि धर्मप्रसाराची आवश्यकता यावर मार्गदर्शन करण्यात आले.

या धर्मयात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी माहेश्वरी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. समारोपावेळी भाविकांनी भविष्यातही गौसेवा, धर्मकार्य आणि समाजहिताच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प केला.

## जनता कर्जात, आमदार सोन्यात!; राज्यातील २८८ आमदारांकडे ३१६ किलो सोन्याचा साठा

### मोदींच्या आवाहनाला केराची टोपली?; पाच वर्षांत आमदारांकडे ९१ किलो सोन्याची भर

**वर्धा जनमाध्यम :** महागाईने होरपळलेल्या जनतेला दोन वेळच्या भाकरीची भ्रांत असताना राज्यातील आमदार मात्र अक्षरशः सोन्यात लोळत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. राज्यातील २८८ आमदारांकडे तब्बल ५,१८३ कोटी रुपयांचे ३१६ किलो सोने असल्याची माहिती शपथपत्रांच्या पडताळणीतून उघड झाली आहे. विशेष म्हणजे सत्ताधारी आमदारांकडेच ४,९२४ कोटींचे २२६ किलो सोने जमा असून त्यात भाजप आघाडीवर आहे. भाजप आमदारांकडे एकट्यांकडेच तब्बल १४७ किलो सोने असल्याचे समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

२०१९ ते २०२४ या अवघ्या पाच वर्षांच्या कालावधीत आमदारांच्या सोन्याच्या साठ्यात तब्बल ९१ किलोची वाढ झाली. जनतेला काटकसरीचे धडे देणारे नेते स्वतः मात्र सोन्याच्या राशी जमवत असल्याची टीका आता जोर धरू लागली आहे. शिंदेसेनेच्या आमदारांकडे ४४ किलो तर राष्ट्रवादीच्या आमदारांकडे ३३ किलो सोने असल्याची आकडेवारीही चर्चेचा विषय ठरली आहे.

**चांदीतही सत्ताधाऱ्यांचीच चांदी**

सोन्याबरोबरच चांदीच्या साठ्यातही प्रचंड वाढ झाली आहे. राज्यातील आमदारांकडे असलेल्या चांदीपैकी तब्बल ९१ टक्के चांदी सत्ताधाऱ्यांकडेच असल्याचे उघड झाले. भाजपकडे ८१ टक्के, शिंदेसेनेकडे २ टक्के तर राष्ट्रवादीकडे ८ टक्के चांदी असल्याचे समोर आले आहे. २०१९ मध्ये ६६४ किलो असलेला चांदीचा साठा आता थेट १,४१४ किलोपर्यंत पोहोचल्याने 'जनतेच्या घामावर नेत्यांची चांदी' अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

**मोदींच्या आवाहनालाही हरताळ?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्षभर सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले होते. मात्र त्याच काळात आमदारांच्या सोन्याच्या साठ्यात झपाट्याने वाढ झाल्याने विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला आहे. माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, देशाची अर्थव्यवस्था बळकट करायची असेल तर सत्ताधाऱ्यांनी सोने दान करावे, असा टोला लगावला आहे.

**शिर्डी संस्थानपेक्षाही 'सुवर्ण' राजकारण**

देशातील श्रीमंत देवस्थानांपैकी एक असलेल्या शिर्डी साईबाबा संस्थानाकडे ५१४ किलो सोने असल्याचे सांगितले जाते. त्या तुलनेत राज्यातील २८८ आमदारांकडे ३१६ किलो सोने आहे. म्हणजेच शिर्डी संस्थानाच्या सोन्याच्या तब्बल ६१ टक्के इतके सोने आमदारांच्या घरात चमकत असल्याचे वास्तव समोर आले आहे. सत्ताधारी तिन्ही पक्षांकडे मिळून २२६ किलो सोने असून हे प्रमाण संस्थानाच्या तुलनेत ४३ टक्के असल्याने जनतेत संतापाची लाट उसळत आहे.


## जाहीरनामा

माझे पक्षकार, हरीष लिलाधर अतकर, वय ४५ वर्ष, व्यवसाय-खाजगी नोकरी, राहणार- मांडवा, तालुका व जिल्हा वर्धा उपरोक्त पत्त्यावर राहत असून माझे पक्षकाराने व भोजराज मारोतराव पाहुणे यांनी दिनांक १५-०१-२०२१ रोजी श्री. आशिष बबनराव बुरले, वय ४५ वर्ष, व्यवसाय- व्यापार, राहणार-महावीर सोसायटी, केळकरवाडी, वर्धा, तालुका व जिल्हा वर्धा यांचेसोबत त्यांचे मालकी व कब्जाचा मौजा नालवाडी मौजा नंबर ७३ त.सा.क्र. २२ र.स.डी. व.र.डी. वर्धा ता.जि. वर्धाचे कक्षेतील ग्रा.पं. असलेले जि.प. वर्धाचे हद्दीतील शेत सर्वे क्रमांक जुना ५३/१ड, ५३/२ड, ५३/१क, ५३/२ख, ५३/१ख, ५५/२घं, ५५/२क, ६६/१, ६६/२, ६६/५ नविन ८७ या शेताचे मे. तहसीलदार साहेब वर्धा यांच्या कोर्टातील रे.के.नं.एन.ए.पी ३४/१ सन १९८५/१९८६ ऑर्डर तारीख ०३/०१/१९८६ अनुसार मंजुरी प्राप्त असलेला डायव्हर्शन झालेला प्लॉट तसेच लेआऊट नकाशा टाऊन प्लॅनर वर्धा कडुन पत्र क्र. १६१२ दिनांक ०४/११/१९८५ अन्वये मंजुर झालेला आहे.

सध्या सदर प्लॉटचे विभाजन करून हरीष लिलाधर अतकर क भोजराज मारोतराव पाहूणे असे वेगवेगळ्या नावे करण्यात आलेले आहे. सदर प्लॉट हा माझे पक्षकाराचे आधी आशिष बबनराव बुरले यांनी शेख आसिफ शेख महेबुब यांचे कडुन दि. १३/११/२०१४ रोजी दस्त क्र. ४४६/२०१४ नुसार विकत घेतलेला आहे. तसेच त्याआधी शेख आसिफ शेख महेबुब यांनी निलेश शंकरराव मलगाम यांचेकडुन दि.२२/१२/२०११ ला विक्रीपत्राचा दस्त क्र. १०३१०/११ नुसार विकत घेतलेला आहे.

उपरोक्त जाहीरनाम्यान्वये सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर प्लॉटचे जुने विक्रीपत्राचे दस्त क्र. १०३१०/११ व विक्रीपत्राचा दस्त क्र. ४४६/२०१४ दोन्ही विक्रीपत्राचे दस्ताचे मुळ प्रतीचे काही कागद/पाने गहाळ झालेली आहे. सदर प्लॉटचे अनुषंगाने माझे पक्षकाराने यांनी एच.डि. एफ.सी बँक, शिवाजी चौक शांखा वर्धा येथे होम लोन घेण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. वरील वर्णनाचे स्थावर प्लॉट मालमत्तेबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप, हरकत असल्यास किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा उजर उपरोक्त मिळकतीसंबंधी असल्यास खाली नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर ८००७७७८७०९ संपर्क करून तथा पत्त्यावर प्रत्यक्ष सर्व कागदपत्रांसह ७ दिवसाचे आत भेटून हरकत नोंदवावी, त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीस वा आक्षेप, हरकत विचारात घेतली जाणार नाही व त्याकरीता माझे पक्षकार कोणत्याही प्रकारे कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाहीत व सदरचे मिळकतीचे पंजीबध्द दस्ताचे अनुषंगाने होम लोन प्राप्त करून घेतील. वर्धा

दिनांक : २३-०५-२०२६

**ॲड. प्रविण आर. पेटकर,**
**मो.क्र. ९६७३६१८९८१**
**जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा**

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# सावधगिरीचा काळ

अलीकडेच झालेल्या भेटीनंतर ट्रम्प यांची पावले भारतविरोधात पडत असल्याची चर्चा वेग धरू लागली आहे. त्यांच्या चीनभेटीचे परिणाम थेट भारताच्या सामरिक आणि आर्थिक भवितव्यावर प्रभाव टाकणारे ठरू शकतात. वरकरणी ही भेट व्यापार, पश्चिम आशियातील तणाव आणि द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या प्रयत्नांभोवती फिरताना दिसली असली, तरी मागे अधिक मोठा संदेश दडला आहे. अमेरिका आणि चीन या दोन्ही महासत्ता आता नियंत्रित स्पर्धा आणि मर्यादित सहकार्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश करताना दिसत आहेत. ट्रम्प यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपग यांना होर्मुज सामुद्रधुनी स्थिर ठेवण्यासाठी आणि पश्चिम आशियातील तणाव कमी करण्यासाठी मदत करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. काही वर्षांपूर्वीपर्यंत चीनला जागतिक अस्थिरतेचा मोठा घटक मानणारा अमेरिका आज त्याच चीनकडून प्रादेशिक स्थैर्यासाठी सहकार्याची अपेक्षा करत आहे, हीच बदलत्या जागतिक वास्तवाची सर्वात मोठी खूण आहे. विशेषतः ऊर्जासुरक्षेच्या प्रश्नावर अमेरिकेला आता एकट्याने जागतिक नेतृत्व करणे कठीण होत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा ऊर्जा आयातदार देश असून पश्चिम आशियात त्याचा आर्थिक प्रभाव सातत्याने वाढत आहे. त्यामुळे इराण, आखाती क्षेत्र आणि तेलवाहतुकीच्या सुरक्षेच्या प्रश्नांवर चीनला पूर्णपणे दूर ठेवून स्थैर्य निर्माण करणे आपल्यालाही शक्य नाही, हे अमेरिकेने मान्य केल्याचे पहायला मिळाले. जागतिक भांडवल स्थिरता आणि कार्यक्षमतेच्या दिशेने जाते. अमेरिकन कंपन्यांना चीनमध्ये पुन्हा सुरक्षितता आणि नफा दिसू लागल्यास भारताकडे वळलेली गुंतवणूक मंदावू शकते, हा आत्ताच्या घडीचा मोठा धोका आहे. उत्पादन, पायाभूत सुविधा आणि निर्यातक्षमता या बाबतीत चीन अजूनही भारतापेक्षा खूप पुढे आहे. त्यामुळे चीनविरोधी भू-राजकीय वातावरण हा भारतासाठी मोठा लाभदायक घटक ठरला होता. तो घटक कमी झाला, तर भारताला स्पर्धेत स्वतःची ताकद सिद्ध करावी लागेल. 'एनव्हिडिया'च्या प्रगत एच २०० कृत्रिम बुद्धिमत्ता चिप्सपर्यंत काही चिनी कंपन्यांना मर्यादित प्रवेश देण्याचा अमेरिकेचा निर्णयही याच व्यापक बदलाचा भाग मानला जात आहे. अमेरिका चीनवरील तांत्रिक निर्बंध हळूहळू शिथिल करू लागल्यास भारताच्या तंत्रज्ञानविषयक महत्त्वाकांक्षांवर थेट परिणाम होऊ शकतो. भारत स्वतःला कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि डिजिटल नवोन्मेषाचे जागतिक केंद्र म्हणून उभे करण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र अमेरिका-चीन। दरम्यानच्या तांत्रिक तडजोडी वाढल्यास भारताला मिळणारे प्राधान्य कमी होण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि चीन यांच्यात खऱ्या अर्थाने मैत्री निर्माण झाली आहे, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. दोन्ही देशांमधील संघर्ष हा केवळ व्यापारापुरता मर्यादित नाही, तर जागतिक नेतृत्व, तंत्रज्ञान, लष्करी प्रभाव आणि हिंद, प्रशांतातील वर्चस्वाशी संबंधित आहे. अमेरिका चीनच्या उदयाला आपल्या जागतिक नेतृत्वासाठी आव्हान मानतो, तर चीन अमेरिकाकेंद्रित जागतिक व्यवस्थेला पर्याय उभा करू इच्छितो. त्यामुळे दोन्ही देशांमधील अविश्वास कायम आहे. असे असले तरी चीन आता जागतिक शक्तिकेंद्र बनला आहे, ज्याला पूर्णपणे दूर ठेवून अमेरिका जागतिक राजकारण चालवू शकत नाही. काही वर्षांपूर्वी अमेरिका चीनविरोधी दबावाच्या भाषेत बोलत होती. आज तीच अमेरिका सहकार्य आणि संतुलनाची भाषा वापरताना दिसते. हाच शी जिनपग यांचा सर्वांत मोठा रणनीतिक विजय मानावा लागेल. भारतासाठी हा काळ सावधगिरीचा आहे. भारताने आता केवळ अमेरिका-चीन संघर्षावर आधारित सामरिक धोरण आखून चालणार नाही. जागतिक समीकरणे बदलत असताना भारताला स्वतःची आर्थिक, औद्योगिक आणि तांत्रिक ताकद स्वतंत्रपणे उभी करावी लागेल. कारण महासत्तांचे संबंध बदलतात; पण राष्ट्रीय हित कायम राहते आणि त्यासाठी भारताला स्वतःच्या क्षमतेवरच अधिक भर द्यावा लागणार आहे. ट्रम्प यांच्या राजकारणात चीन हा केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय नव्हता, तर राजकीय ओळखीचा केंद्रबदू होता. २०१६ च्या प्रचारसभांपासून दुसऱ्या कार्यकाळापर्यंत ट्रम्प यांनी चीनविरोधी राष्ट्रवादाला सातत्याने धार दिली. इंडियानामधील सभेत 'चीन अमेरिकेवर आर्थिक अत्याचार करत आहे' असे केलेले विधान हे केवळ निवडणुकीतील आक्रमक भाषण नव्हते, तर पुढील दशकातील अमेरिकन धोरणाची दिशा दर्शवणारे वक्तव्य होते. चीन अमेरिकेची नोकरी, उद्योग, तंत्रज्ञान आणि आर्थिक वर्चस्व हिरावून घेत आहे, ही भावना ट्रम्प यांनी अमेरिकन मतदारांच्या मनात खोलवर रुजवली. त्यातूनच 'अमेरिका फर्स्ट' चा राजकीय अजेंडा अधिक तीव्र झाला. व्हाईट हाऊसमध्ये पुनरागमन करताना ट्रम्प यांनी आपल्या भोवती चीनविरोधी भूमिकेसाठी ओळखले जाणारे सहकारी उभे केले. मार्को रुबिओ, जेडी व्हॉन्स आणि पीटर नवारो यांसारख्या नेत्यांनी चीनवर अमेरिकेला आर्थिकदृष्ट्या लुटल्याचा, तंत्रज्ञान चोरी केल्याचा आणि फेंटानिल संकटाला खतपाणी घातल्याचा आरोप सातत्याने केला. परिणामी, अमेरिका-चीन संघर्ष केवळ व्यापारापुरता मर्यादित राहिला नाही, तर आर्थिक, तांत्रिक आणि सामरिक स्पर्धेच्या व्यापक चौकटीत पोहोचला. या पार्श्वभूमीवर ट्रम्प प्रशासनाने चीनवर वाढते आयातकर लादण्यास सुरुवात केली. फेब्रुवारी २०२५ मध्ये दहा टक्क्यांपासून सुरू झालेली करवाढ काही महिन्यांमध्येच १४५ टक्क्यांपर्यंत पोहोचली. ट्रम्प यांनी याला 'लिबरेशन डे' असे नाव दिले. अमेरिकेने चीनसह अनेक व्यापार भागीदारांवर आयात कर वाढवण्याच्या निर्णयाला राष्ट्रीय आर्थिक मुक्तीचा रंग देण्याचा प्रयत्न केला. त्यामागील राजकीय संदेश स्पष्ट होता, 'अमेरिकन उद्योगांचे रक्षण आणि चीनच्या आर्थिक प्रभावाला आव्हान'. चीननेही त्याला कठोर प्रत्युत्तर दिले. अमेरिकन वस्तूंवर १२५ टक्के कर लादण्यात आले, तर 'रेअर अर्थ मिनरल्स' च्या निर्यातीवर निर्बंध आणण्यात आले. यामुळे व्यापार युद्धाची ठिणगी प्रत्यक्ष संघर्षात बदलली. विशेषतः रेअर अर्थ मिनरल्सवरील नियंत्रणामुळे अमेरिकेला मोठा धक्का बसला. कारण आधुनिक तंत्रज्ञान उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, संरक्षण व्यवस्था आणि इलेक्ट्रिक वाहन उद्योग या सर्व क्षेत्रांचे चीनवर मोठे अवलंबित्व आहे. चीनने याच अवलंबित्वाचा रणनीतिक वापर करण्यास सुरुवात केली; मात्र या तीव्र संघर्षानंतर अचानक ट्रम्प यांचा बीजिंग दौरा झाला आणि जगाला वेगळेच चित्र पाहायला मिळाले.

# राजकीय यश, आर्थिक अपयश!

**आर्थिक वाढीचे आकडे कुठूनही, कसेही पाहिले तरी, 'सर्वाधिक वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था' असे भारताने स्वत:ला म्हणवून घेणे किती पोकळ आहे याची खात्री पटते. आपल्या आर्थिक धोरणांची दिशा चुकते आहे आणि आर्थिक वाटचालही मंदावते आहे, हे निव्वळ राजकीय यशाच्या झपाट्यापुढे या सरकारच्या लक्षातच येत नाही काय?**




✍ सुरजित भल्ला

पश्चिम बंगालच्या विधान सभा निवडणुकांमधील विजय हा भाजपच्या राजकीय कामगिरीचा सर्वोच्च बिंदूच नाही तर त्याचे ऐतिहासिक यशदेखील आहे. २०२९ मध्ये नरेंद्र मोदींना प्रचंड जनादेश मिळणे हा भाजपसाठी पश्चिम बंगालमध्ये गाठलेला आपला सध्याचा सर्वोच्च निवडणूक-यश-बिंदू ओलांडून पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे. त्याच वेळी, अर्थव्यवस्थेच्या हाताळणीच्या बाबतीत भाजपने नीचांक गाठला असून, परिस्थिती याहूनही अधिक खालावणार नाही याची कोणतीही खात्री देता येत नाही. या संदर्भातील ज्वलंत प्रश्न असा आहे की, या दोन्ही घटना केवळ योगायोगाने घडल्या आहेत की त्या एकाच वेळी आणि परस्परांशी निगडित अशा प्रकारे निश्चित झाल्या आहेत? याचे उत्तर दुसरे म्हणजेच त्या परस्परांशी निगडित आहेत हे आहे. ते कसे, याचे स्पष्टीकरण लेखाच्या ओघात मिळेलच.

आपल्या आर्थिक घसरणीला चार घटक जबाबदार आहेत. त्यातला पहिला आणि सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे स्वत: सरकार. सरकारला समस्या माहीत आहे, पण आर्थिक संकटासाठी इतरांना दोष देण्यातच ते समाधानी आहे. दुसरा घटक आहे महत्त्वाचे उद्योग. तिसरा काँग्रेस पक्ष. तो गांधी घराण्याच्या नेतृत्वाखाली इतका निवांत आहे की भाजपच्या एकपक्षीय लोकशाही राजवटीखेरीज गत्यंतरच उरू नये! चौथा घटक म्हणजे पहिल्या तिघांना पडद्यामागून नियंत्रित करणारा सूत्रधार, अर्थात 'डीप स्टेट'. त्यातच आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक वेगाने विस्तारत असल्याचा दावा अभिमानाने केला जाण्याइतपत पुरेसे आकडे दिसतात, त्यामुळे हे संकट अधिक गंभीर आहे.

पश्चिम बंगालमधील दणदणीत विजय आणि भारतात जवळपास एकपक्षीय लोकशाही वर्चस्व यातून भाजपच्या राजकीय यशाची पातळी स्पष्ट होते. त्यामुळे काही जणांना 'आर्थिक अधोगती' ही संज्ञा कदाचित अतिशयोक्तीची वाटू शकते. भारताची अर्थव्यवस्था ही जिचा वाढदर (जीडीपी अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादनातील वार्षिक वाढीचा टक्का), गेल्या ३५ वर्षांच्या ऐतिहासिक सरासरीइतका, म्हणजेच वर्षाला सहा टक्के इतका आहे, अशी जगातील सर्वात वेगाने वाढणारी 'प्रमुख' अर्थव्यवस्था नाही का, असा प्रश्नही पडू शकतो. यातील खरी मेख 'प्रमुख' या शब्दामध्ये आणि ३५ वर्षांच्या सरासरीच्या निकषावर केलेल्या मोजमापामध्ये दडलेली आहे. भाजपच्या २०१४ पासूनच्या राजवटीत नेमकी किती वाढ झाली, हे सन १९९१ पासूनच्या '३५ वर्षां'च्या हिशेबात शिताफीने दडवले जाते. आजघडीला जीडीपी वाढीच्या बाबतीत भारताचा क्रमांक नववा लागतो; दरडोई जीडीपी वाढीच्या बाबतीत हा क्रमांक आठवा आहे; आणि जीडीपीतील दरडोई वाढ जर अमेरिकी डॉलरमध्ये मोजली तर भारत आज जगात १६ व्या स्थानावर आहे. अमेरिकी डॉलरमधील दरडोई सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीच्या निकषावर बांगलादेश पहिल्या क्रमांकावर असून, त्याची सरासरी दरडोई वाढ वर्षाला ८.३ टक्के इतकी आहे. इथिओपिया ७.२ टक्क्यांसह दुसर्या क्रमांकावर आहे, तर भारत केवळ ४.७ टक्के इतक्याच वाढीपायी १६ व्या क्रमांकावर आहे. या आकडेवारीचे विश्लेषण कोणत्याही प्रकारे केले तरी 'सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था' ही बढाई आता थांबवून शहाणे होण्याची वेळ आली आहे, हेच लक्षात येते.

भारत २०१३ मध्ये जगातील पाच 'अस्थिर अर्थव्यवस्थां'पैकी (फ्रॅजाइल फाइव्ह) एक होता, त्याची स्थिती आता कदाचित केवळ दोन अस्थिर अर्थव्यवस्थांपैकी एक बनण्यापर्यंत (दुसरा देश तुर्की) पोहोचली आहे. भारतीय रुपयाचे अमेरिकी डॉलरच्या तुलनेतील मूल्य गेल्या वर्षभरात सुमारे १२ टक्क्यांनी घसरले. हे घसरणीचे सलग सातवे वर्ष असून, 'आशियातील सर्वात खराब कामगिरी करणार्या चलनां'मध्ये भारतीय रुपयाचा समावेश २०२५ सालापासूनच झालेला आहे. तरीही आज भारताच्या आर्थिक स्थितीमध्ये एक विरोधाभास दिसतो. तो असा की महागाई 'नियंत्रणात' आहे, चालू खात्यातील तूट 'नियंत्रणात' आहे, आर्थिक वाढ 'स्थिर' आहे आणि राजकीय स्थैर्य तर अभूतपूर्व म्हणावे इतके भक्कम आहे. सैद्धांतिकदृष्ट्या, या 'स्थिर' आणि 'नियंत्रणाखालील' परिस्थितीमुळे अस्थिरतेला खतपाणी मिळायला नको, उलट चलनाविषयीचा विश्वास बळकट व्हायला हवा. पण तसे का होत नाही?

भारतीय तसेच परदेशी गुंतवणूकदारांनी भारतात अधिक गुंतवणूक करावी यासाठी आवश्यक शस्त्रक्रिया करण्याऐवजी, सरकारने केवळ तात्पुरती मलमपट्टी केली आहे. भारतीयांना देशातच अधिक गुंतवणूक करण्याचे आवाहन, हे त्यापैकीच. देशातील गुंतवणुकीतून काढता पाय घेण्याच्या आपल्या कृतीतून गुंतवणूकदार त्यांना काय म्हणायचे असते ते म्हणतच असतात, हे फार पूर्वीच सिद्ध झाले आहे. व्यक्ती तसेच कंपन्या नैतिक आवाहनांना किंवा सत्ताधार्यांच्या दृष्टीने जे राष्ट्रीय हित असते त्याला नाही, तर आर्थिक लाभाच्या शक्यतांना प्रतिसाद देतात. आणि आजच्या गुंतवणूकदारांसाठी भारत सोडून जाणे किंवा भारतात गुंतवणूकच न करणे हीच आर्थिक लाभाची शक्यता किंवा 'प्रोत्साहन' (इन्सेन्टिव्ह) ठरले आहे. असे का? तर नव्या गुंतवणूकदारांसाठी भारतातील 'व्यावसायिक वातावरण' हे भारतात गुंतवणूक न करण्यासाठीचे बहुचर्चित कारण आहे. दुसरीकडे भारतीय गुंतवणूकदार कंपन्यांना इथल्या सरकारी धोरणाबाबत निश्चिंत वाटणे दूरच, त्यांना उलट धोरण धरसोडीबद्दल चिंताच वाटत असेल.

परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) हा कोणत्याही देशाच्या जीडीपी वाढीचा, निर्यातीचा आणि उत्पादक क्षेत्राच्या जागतिक स्पर्धेचा मुख्य पाया आहे. ही गुंतवणूक देशात प्रगत तंत्रज्ञान, भांडवल आणि जागतिक पुरवठा साखळ्यांशी जोडणी घेऊन येते. त्यामुळे औद्योगिक क्षेत्राचा विकास होतो. थेट परकीय गुंतवणुकीचे प्रमाण जितके जास्त, तितकी गुंतवणूक जास्त आणि परिणामी आर्थिक वाढही जास्त ही बाब जगभरात सर्वमान्य आहे आणि २०१५ पर्यंत भारततही ती स्वीकारली जात होती. मात्र नव्या विचारसरणीनुसार असे मानले जाते की, भारताच्या 'विशाल' बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी प्रचंड 'आतुर' असलेल्या परकीय गुंतवणूकदारांना भारताने आपल्या अटींवर भारतात प्रवेश दिला पाहिजे आणि तसे करणे शक्यही आहे. या बाजारपेठेच्या व्याप्तीचा अंदाज घेण्यासाठी एक संदर्भ पाहू या. २०१५ मध्ये भारताचा जीडीपी हा अमेरिकेतील 'कॅलिफोर्निया' या एका राज्याच्या जीडीपीपेक्षाही कमी होता. याच विचारसरणीमुळे २०१५ मध्ये 'द्विपक्षीय गुंतवणूक करारां'च्या (बायलॅटरल इन्व्हेस्टमेंट ट्रीटी- 'बीआयटी') आराखड्यात आमूलाग्र बदल करण्यात आले असावेत, अशी शक्यता वर्तवली जाते. त्यानंतर लगोलग, 'गुणवत्ता नियंत्रण आदेशां'ची (क्वालिटी कंट्रोल ऑर्डर्स किंवा 'क्यूसीओ') संख्या वाढली. या आदेशांची संख्या सन २०१७ मध्ये केवळ १४ होती; ती डिसेंबर २०२४ पर्यंत वाढून ७६५ वर गेली. या असल्या 'गुणवत्ता नियंत्रणा'तून, देशांतर्गत विशेषत: परकीय कंपन्यांशी भागीदारी असलेल्या उद्योगसंस्थांना संरक्षण देण्यासाठीचे आणखी एक साधन, यापलीकडे काहीही साध्य झालेले नाही.

'द्विपक्षीय गुंतवणूक करारा'च्या (बीआयटी) मसुद्यात २०१५ मध्येच सुधारण करण्यात आल्या. त्यानुसार, एखाद्या परदेशी गुंतवणूकदाराने आपला भारतीय प्रकल्प सोडून बाहेर पडण्यापूर्वी, लवादाकडे जाण्यासाठी पाच वर्षे वाट पाहणे अनिवार्य करण्यात आले. तसेच सदर लवाद प्रक्रिया एखाद्या भारतीय न्यायाधीशासमोरच पार पडावी, अशीही अट घालण्यात आली होती. मुळात जिथे भारतीय नागरिकसुद्धा (विषय किंवा तक्रार कोणतीही असली तरी) भारतीय न्यायालयांमध्ये जायला कचरतात, तिथे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय न्यायाधीशांकडूनच न्याय मिळवायला हवा ही सक्ती करण्यात काय हशील आहे?

परदेशी गुंतवणूकदारांनी आंतरराष्ट्रीय लवादाकडे जाण्यापूर्वी पाच वर्षे फक्त स्थानिक कायदेशीर उपाययोजनांवरच भिस्त ठेवण्याची सक्ती, ही तरतदू सर्वात हानीकारक ठरल्याचे दिसून येते. आजवरच्या इतिहासात, कोणत्याही प्रकारच्या भागीदारीशी संबंधित एखाद्या करारातून किंवा निर्णयामधून कायदेशीररीत्या मागे हटण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी पाच वर्षे एवढा मोठा कालावधी दिला गेला आहे का? आजही, सरकारने ज्या सुधारणा करण्याचे आश्वासन दिले आहे, त्यात मुळातल्या त्रुटींचा पुनर्विचार करण्याऐवजी केवळ त्या सौम्य करण्याचाच उद्देश असल्याचे दिसते.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये संसदेत घोषणा केली होती की, द्विपक्षीय गुंतवणूक कराराच्या आराखड्याचा आढावा घेतला जाईल आणि तो सुधारून प्रसिद्ध केला जाईल. या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन कधी होणार ते कोणालाच माहीत नाही. वाट बघण्याचा पाच वर्षांचा कालावधी कमी करून तो 'फक्त' तीन वर्षांवर आणणे हा एकच अपवाद वगळता संबंधित आराखड्याच्या मूळ रचनेत कोणताही बदल झालेला नाही, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पण या द्विपक्षीय गुंतवणूक करारातल्या परकीय गुंतवणूकदारानेही भारतीय न्यायालयांमधील कायदेशीर प्रक्रिया सर्वप्रथम पूर्ण करणे ही अट तर २०१५ पूर्वी कधीच नव्हती, ती मात्र कायमच ठेवली जाण्याची शक्यता आहे.

प्रचंड राजकीय यश मिळत गेले की आपण आखलेली धोरणे चांगलीच असणार, अशी खात्री वाटू लागते. असे वाटणे हा खरे तर अधिक मोठा धोका असतो.

कारण वस्तुस्थिती पार निराळी असते. भारतात अजूनही स्थैर्य आहे, इथे खूप मोठी बाजारपेठ आहे आणि या दोन्हीमुळे जागतिक पातळीवर आपण गैरलागू ठरलेलो नाही, याचे फायदे भारताला निश्चितपणे मिळू शकतात. सध्याचे पश्चिम आशियाई संकट ही देशातील आर्थिक सुधारणांसाठी एक अत्यंत अनुकूल परिस्थिती आहे. सरकारने तिचा उपयोग गुंतवणुकीचे वातावरण सुधारण्यासाठी, करारांची विश्वासार्हता पुन्हा निर्माण करण्यासाठी आणि सुधारणांबाबत आपण गंभीर आहोत, हे दाखवण्यासाठी केला पाहिजे.

तसे झाले नाही तर सरकारचे राजकीय वर्चस्व हे त्याचे सामर्थ्य वाटणार नाही, तर सामर्थ्याचा निव्वळ डोलारा वाटू लागेल. निवडणुका सत्ता मिळवून देऊ शकतात, पण समृद्धी येऊ शकते ती केवळ योग्य धोरणांच्याच माध्यमातून. त्या संदर्भात आपण काय करतो याकडे यापुढच्या काळात जगाचे लक्ष असेल.

## ...यांना योग्य धडा शिकवा

नीट पेपरफुटीमुळे शिक्षण व्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. पण, ही समस्या केवळ काही भ्रष्ट आरोपींपुरती मर्यादित आहे का ? की यामागे कोचिंग क्लासचा भस्मासूर आणि ढासळलेली सरकारी शिक्षण व्यवस्था जबाबदार आहे ? असा देखील प्रश्न पडतो. एक देश एक परीक्षा या टॅग लाईनखाली ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बळी दिला गेला आहे असे म्हणणे चुकीचे ठरु नये. या पेपरफुटीमुळे अख्या भविष्याचा चुराडा केला आहे. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या आरोपींना शिक्षा होईल, सुटून येतील मात्र प्रश्न उरतो तो या विद्यार्थ्यांचे काय होणार? काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखा पर्याय निवडल्याचे समोर आले आहे. एकूणच या यंत्रणेतील त्रुटी शोधून काढणे अपेक्षित आहे. निटचे वाकडे करणाऱ्या योग्य धडा शिकवणे अपेक्षित आहे.

**राजू जाधव**

## पाण्याचा वापर जपून

यंदा भारतातील पावसावर 'अल निनो'चे सावट आहे . सरासरीच्या ८८ टक्के पाऊस अपेक्षित आहे . त्यामुळे येणाऱ्या हंगामात पेरणीला अडथळे येतील कि काय अशी शंका आहे. यंदाचा उन्हाळा अतिशय तीव्र असल्यामुळे धरणातील जे पाण्याचे साठे होते ते कमी होत चालले आहेत. जे आपल्याकडे पाणी आहे ते अतिशय जपून वापराने आवश्यक आहे. आज मोठ्या शहरात लाखो वाहने आहेत. ती दररोज धुतली जातात. हे थांबविणे शक्य आहे . जेव्हा जरूर असेल तरच नळ सोडावेत . घरापुढे पाणी मारणे हे सुद्धा काही काळासाठी थांबवता येईल . रस्त्यावरील झाडे पाण्यामुळे नष्ट होऊ नयेत याचीही काळजी घेणे जरुरीचे आहे .शेतकऱ्यांनी पिकाची पेरणी करताना हवामानाचे अंदाज अगोदर पाहावेत. एकूणच पाण्याची नासाडी थांबविणे जरुरीचे आहे. जल हे जीवन आहे अशी आपली धारणा होणे आवश्यक आहे.

**शांताराम वाघ**

जनमाध्यम संवाद

## मायावती यांचा दणका!

२०२७ मध्ये होणाऱ्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीकरता अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षाची जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. गेल्या खेपेप्रमाणे या खेपेसही कॉंग्रेस बरोबर निवडणूक समझोता केला जाईल मात्र कॉंग्रेसने आपल्या ताकदीपेक्षा जास्त जागांची मागणी करु नये. ज्या पक्षाचा उमेदवार एखाद्या ठिकाणी जिंकण्याची जास्त शक्यता असेल, त्या पक्षाला तिथून उमेदवारी देण्यात येईल, असा जागा वाटपाचा फॉर्म्युला अखिलेश यादव यांनी जाहीर केला. मध्यंतरी अखिलेश यादव यांनी बसपाच्या सर्वेसर्वा मायावती यांच्याशी संपर्क साधल्याची चर्चा होती. सपा आणि कॉंग्रेस यांच्या आघाडीत बसपा सामील झाल्यास मुस्लिम आणि दलित मतांचे विभाजन होणार नाही आणि भाजपाला तोडिसतोड लढत देता येईल असा विचार करून अखिलेश यांनी मायावतीं समोर आघाडीचा प्रस्ताव मांडला असावा. मायावती यांनी अगोदरच जाहीर केले आहे की, उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत त्यांचा पक्ष कोणाशीही आघाडी करणार नाही.

नुकतेच कॉंग्रेसचे उत्तरप्रदेशातील दोन नेते तनुज पुनिया आणि राजेंद्र पाल गौतम हे मायावती यांची भेट घेण्यासाठी लखनौ येथील त्यांच्या निवासस्थानी गेले होते. त्यांनी मायावती यांची अपॉइंटमेंट घेतली नव्हती. मायावती यांनी त्यांना घराबाहेर एक तास ताटकळत ठेवले आणि शेवटी भेट घेतली नाहीच.

त्यामुळे ते नेते निश्चितपणे अपमानित झाले असणार, परंतु सांगणार कुणाला? मायावती यांनी भेट नाकारल्यानंतर त्या नेत्यांनी बचावासाठी असा खुलासा केला की आम्ही व्यक्तीगतरित्या मायावती यांना भेटायला गेलो होतो. मात्र शेवटी गोंधळ व्हायचा होता तो झालाच. कॉंग्रेस नेतृत्वाने त्या नेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून, त्या विषयावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

**अभय गोखले**

## नेपाळकडून डिवचण्याचे प्रकार

महाकाली नदीच्या पूर्वेला असलेल्या लिंपियाधुरा, कालापानी, लिपुलेख हे भाग नेपाळचेच प्रदेश असल्याचा दावा सध्या नेपाळकडून सुरु आहे. सहा महिन्यांपूर्वी नेपाळच्या मध्यवर्ती बँकेने शंभर रुपयाच्या नेपाळी नोटेवर छापलेल्या नकाशात हे भूभाग नेपाळचे म्हणून दाखवण्यात आले होते. नेपाळकडून सुरु असलेल्या अशा प्रकारांमुळे दोन्ही देशातील संबंधांमध्ये तणाव निर्माण होत आहे. परंतु नेपाळकडून भारताला वाकुल्या दाखवण्याचे प्रकार काही बंद होताना दिसत नाहीत.

यामागे निश्चितपणे चीनचा हात असण्याची शक्यता दिसत आहे. काही ना काही कुरापत काढण्याचे चीनचे धोरण भारत मागील काही वर्षांपासून अनुभवत आहे. नव्याने सत्तेत आलेल्या नेपाळ सरकारला चीनकडून मोठी आर्थिक आणि लष्करी मदत मिळणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळेच नेपाळ भारताशी संघर्ष करण्याचा पवित्रा घेत असावा का, अशीही शंका व्यक्त होत आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

# अमरावतीला अपेक्षित आणि प्रतीक्षेत असलेल्या विकासापासून वंचित

माझेही मत

✍ दीपक तळवलकर

गोंदिया आणि गडचिरोलीला जसे लाभले तसे अमरावतीला समृद्धी महामार्गाचे विस्तारीकरण लाभल्यानंतरच..., अंबादेवी एकवीरादेवी शक्तिपीठ असल्यामुळे नागपूर गोवा शक्तिपीठ मार्ग अमरावतीला लाभल्यानंतरच..., नवीन अमरावती रेल्वे मंडळ मंजूर होऊन त्याची निर्मिती झाल्यानंतरच..., प्रस्तावित नागपूर मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पात अमरावती स्थानकाचा समावेश झाल्यानंतरच..., अमरावती परतवाडा धारणी मार्गावर सतत भीषण अपघात घडत असतात म्हणून त्या मार्गाचे रुंदीकरण झाल्यानंतरच...., देवस्थान विकसित करा कारण विदर्भातील दोन पैकी एक असलेल्या मागासलेल्या अमरावती आयुक्तालय क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा त्यापेक्षाही अत्यधिक जास्त महत्त्वाच्या आहेत.

गेली कित्येक वर्षे अमरावतीचे राजनैतिक नेतृत्व सबळ नाही आणि आहे ते अजिबात सक्षम नाही याचे कारण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नक्की कुठल्या योग्य जागी व्हावे याबाबत इथल्या राजनैतिक नेतृत्वात एकमत नाही. अमरावती शहरापासून १२-१५ किमी नियोजित जागा योग्य नाही. अस्तित्वात असलेल्या अमरावती स्थानकाला ३००-५०० मीटर स्थलांतरित करण्यासाठी हलवण्याची तुघलकी योजना प्रस्तावित झाली होती. अमरावतीच्या प्रगती साठी आवश्यक पायाभूत प्रकल्पांच्या ऐवजी देवस्थान विकसित करण्याचा अट्टाहास केला जात आहे हे कितपत योग्य आहे याचा सर्वकष विचार व्हायला हवा.

असल्या सक्षम नसलेल्या विद्यमान राजकीय नेतृत्वामुळे अमरावती महसूल आयुक्तालय क्षेत्राचा योग्य प्रकारे आवश्यक अती प्रलंबित असलेला सर्वांगीण विकास कसा साध्य होणार असे अती चिंताजनक प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अमरावतीकरांच्या तोंडाला नुसती पाने पुसली जात आहेत. त्यामुळे त्यांच्या हक्काच्या आवश्यक असलेल्या व अजूनपर्यंत प्रलंबित असलेल्या विकासाला अमरावतीकर दुर्दैवाने मुकत आहेत कारण येथे वर नमूद पायभूत प्रकल्पांच्या अभावी, अमरावतीला अपेक्षित आणि प्रतीक्षेत असलेल्या विकासापासून पूर्णपणे वंचित रहावे लागत आहे याची दखल मुंबई आणि दिल्ली दरबारी असलेल्या सत्ताधीशांनी अग्रक्रमाने घेणे आता निश्चितच अती आवश्यक झाले आहे.

खापर्डे बगीचा, अमरावती

('एक्स' वरून साभार)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# शिवसेना-भाजपमध्ये जागेसाठी जोरदार रस्सीखेच

## दोन्ही पक्षांकडून ताकद प्रदर्शन सुरू अंतिम निर्णयावर कार्यकर्त्यांच्या नजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

विधान परिषद निवडणुकीचे बिगुल वाजताच महायुतीतील जागावाटपाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून भाजप आणि शिंदे शिवसेना यांच्यात उमेदवारीवरून अंतर्गत रस्सीखेच वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. दोन्ही पक्षांतील इच्छुकांनी आपापल्या पातळीवर जोरदार हालचाली सुरू केल्या असल्या, तरी जागा नेमकी कोणाच्या वाट्याला जाणार याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने कार्यकर्ते आणि इच्छुकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, स्थानिक पातळीवरील नेते या प्रश्नावर थेट भूमिका घेण्याचे टाळत असून अंतिम निर्णय वरिष्ठ नेतृत्वाकडे असल्याचे सांगत घोडदौड मुंबई आणि दिल्ली दरबारात सुरू असल्याने तर्क-वितर्कांना अधिकच उधाण आले आहे. शिंदे शिवसेनेकडून तब्बल नऊ इच्छुकांची नावे चर्चेत असल्याची माहिती राजकीय वर्तुळातून समोर येत आहे. त्यात पूर्वेश सरनाईक, दृष्यंत चतुर्वेदी, किरण पांडव यांसारख्या बाहेरील नावांसह जिल्ह्यातील सलीम खेतानी यांच्या नावाचीही जोरदार चर्चा सुरू आहे. या संभाव्य नावांमुळे स्थानिक स्तरावर अनेक वर्षे पक्षासाठी काम करणाऱ्या जुन्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची कुजबुज सुरू झाली आहे. निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून नव्या किंवा बाहेरील चेहऱ्यांना संधी दिली जाणार का, असा सवाल आता उघडपणे उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या निवडणुकीत उमेदवार शिंदे शिवसेना गटाचाच असणार असल्याची माहिती पराग पिंगळे यांनी दिल्याचे समोर आले आहे. दुसरीकडे भाजपमध्येही इच्छुकांची संख्या कमी नसल्याचे दिसत आहे. नगरसेवकांची संख्या आणि मतदारांमधील प्रभाव लक्षात घेता पक्षाची दावेदारी अधिक मजबूत असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. माजी नगरसेवक, विद्यमान पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आणि काही प्रभावी व्यावसायिकांनीही उमेदवारीसाठी पक्ष पातळीवर फिल्डिंग सुरू अल्याची चर्चा आहे. काही इच्छुकांनी गुप्त बैठका, मतदारसंघ दौरे आणि कार्यकर्ता मेळाव्यांद्वारे वातावरण निर्मितीला सुरुवात केली आहे.

वरवर महायुतीमध्ये एकोप्याचे चित्र रंगवले जात असले, तरी प्रत्यक्षात जागावाटपावरून दोन्ही पक्षांमध्ये तीव्र चढाओढ सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे. स्थानिक गटांकडून वरिष्ठ नेतृत्वासमोर स्वतःची ताकद सिद्ध करण्यासाठी स्वतंत्र हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. काही प्रभावी नेत्यांनी आपल्या समर्थकांना संधी मिळावी यासाठी मुंबईत राजकीय फिल्डिंग लावल्याचीही चर्चा आहे. अंतिम निर्णय जाहीर होण्यास होत असलेल्या विलंबामुळे कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. काही इच्छुकांनी पर्यायी राजकीय पर्यायांचाही विचार सुरू केल्याची चर्चा असून, अपक्ष लढण्याची तयारी, इतर पक्षांशी संपर्क तसेच स्थानिक समीकरणांची जुळवाजुळव यांनाही वेग आल्याचे बोलले जात आहे. महायुतीतील जागावाटपाचा तिढा सुटणार की राजकीय अस्वस्थता आणखी वाढणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नरेगात कोट्यवधींचा खेळ? पांदण रस्ते बदलले, इस्टिमेट गुंडाळले..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २४ :** दिग्रस तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (नरेगा) कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असला, तरी अनेक विकासकामे मंजूर इस्टिमेटप्रमाणे न झाल्याचे आरोप आता जोर धरू लागले आहेत. विशेषतः शेतकऱ्यांच्या सोयीसाठी मंजूर करण्यात आलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांमध्ये गंभीर अनियमितता झाल्याचा दावा ग्रामस्थांकडून केला जात आहे.

शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत पोहोचण्यासाठी मंजूर झालेले पांदण रस्ते प्रत्यक्ष मंजूर जागेवर न करता, स्थळ बदलून अन्य ठिकाणी करण्यात आल्याचा आरोप आहे. त्यामुळे मूळ लाभार्थी असलेल्या अनेक शेतकऱ्यांना या सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. केवळ ठेकेदार व संबंधितांच्या सोयीसाठी स्थळांमध्ये बदल करण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. याशिवाय नालेबांध, विहिरी व इतर विकासकामे ही इस्टिमेट नुसार पूर्ण न करताच कागदोपत्री पूर्ण दाखवून बिले उचलण्याचा प्रकार सुरू असल्याची चर्चा आहे. पावसाळा तोंडावर असताना अनेक पांदण रस्त्यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे दिसून येत असून, हे रस्ते पहिल्याच पावसात वाहून जाण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, या सर्व कामांचे विशेष ऑडिट करण्याचे आदेश वरिष्ठ स्तरावरून आल्यानंतर संबंधित यंत्रणेत मोठी हालचाल सुरू झाली आहे. ऑडिट मध्ये वास्तव समोर येऊ नये म्हणून काही स्तरावर 'खातिरदारी'च्या माध्यमातून अहवाल प्रभावित करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची दबक्या आवाजात चर्चा रंगू लागली आहे. आता प्रश्न असा उपस्थित होत आहे की, ऑडिट पथक प्रत्यक्ष गावोगावी जाऊन स्थळ पाहणी, पंचनामा आणि कामांची गुणवत्ता तपासणार का? की कागदोपत्री सर्व काही व्यवस्थित असल्याचे दाखवत या प्रकरणावर पडदा टाकला जाणार? तालुक्याचे लक्ष आता या ऑडिटकडे लागले असून, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### काय आहेत मुख्य आरोप?

- मंजूर पांदण रस्त्यांचे स्थळ बदलल्याचा आरोप
- इस्टिमेटप्रमाणे कामे न करता बिले उचलल्याची चर्चा
- नालेबांध व विहिरींच्या कामांवर प्रश्नचिन्ह
- निकृष्ट दर्जामुळे पावसात कामे वाहून जाण्याची भीती
- विशेष ऑडिटपूर्वी 'अहवाल मॅनेज' करण्याच्या हालचालींची चर्चा

# घटना-घडामोडी

## प्रभू विश्वकर्मा मंदिरासाठी ५० लाख मंजूर..!

**पुसद :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुसद येथील धनकेश्वर परिसरातील प्रभू विश्वकर्मा मंदिरात सभागृह, सुशोभीकरण, रोषणाई, भक्तनिवास तसेच पायवाटा बांधकामासाठी ५० लाख रुपयांच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. या विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्याचा कार्यक्रम शुक्रवार, दि.२२ मे २०२६ रोजी साध्या पद्धतीने पार पडला. राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक यांच्या प्रयत्नांतून धनकेश्वर येथील विश्वकर्मा भगवान मंदिर संस्थेला हा निधी मंजूर झाल्याचे सांगण्यात आले. यामुळे विश्वकर्मा समाजाला दिलेले आश्वासन पूर्ण झाल्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली. विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू असलेल्या आचारसंहितेमुळे राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि नगराध्यक्ष मोहिनी नाईक हे भूमिपूजन कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र, विश्वकर्मा समाजाच्या सदस्यांनी कोणताही गाजावाजा न करता भूमिपूजन सोहळा पार पाडत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी मदनलाल जांगीड, ओमजी जांगीड, हरिप्रसाद विश्वकर्मा, राधेश्याम जांगीड, भगीरथ जांगीड, देवराम, प्रल्हाद, मदन, नीलेश अग्रवाल, संतोष बजाज तसेच ठेकेदार आनंद राधेश्याम जांगीड आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी विश्वकर्मा समाजातील अनेक नागरिक उपस्थित होते.



## पांढरकवडा पंचायत समितीत माहिती अधिकाराची पायमल्ली?

**सुनावणीत नागरिकाला तब्बल सहा तास ताटकळत ठेवले..**

**पांढरकवडा :** पंचायत समिती पांढरकवडा कार्यालयातील कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागविण्यात आली होती. मात्र संबंधित विभागाने अपूर्ण, दिशाभूल करणारी व असमाधानकारक माहिती देत प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप समोर आला आहे. यामुळे अर्जदाराने प्रथम अपील दाखल केले होते. या अपीलावर पंचायत समितीकडून १५ मे २०२६ रोजी सुनावणी निश्चित करण्यात आली होती. मात्र अधिकाऱ्यांचा दौरा असल्याचे कारण देत सुनावणी रद्द करण्यात आली. त्यानंतर २२ मे रोजी दुपारी १:३० वाजता नव्याने सुनावणी ठेवण्यात आली. अपीलकर्ता नियोजित वेळेनुसार पंचायत समिती कार्यालयात उपस्थित राहिला. त्यावेळी सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी दुपारी ३:३० वाजता सुनावणी घेतील, असे सांगितले. मात्र अपीलकर्त्याला सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रतीक्षा करावी लागली तरी संबंधित अधिकारी कार्यालयात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पंचायत समितीतील अनेक कर्मचारी बाहेरगावाहून येत असल्याची चर्चा असून, त्यांना संरक्षण देण्यासाठी माहिती अधिकार प्रक्रियेत जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तसेच माहिती अधिकारांतर्गत मागविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती पूर्णपणे देण्यात आली नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबतची माहिती लपवली जात असल्याची चर्चा देखील रंगली आहे.

# पर्यावरण जनजागृतीची अनोखी मोहीम..!

## १० दिवसांत ९७ भागांमध्ये नागरिकांशी संवाद, प्रयास यवतमाळ व सावित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालयाचा संयुक्त उपक्रम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २४ :** पर्यावरण संवर्धनाबाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रयास यवतमाळ आणि सावित्री जोतिराव समाजकार्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने यवतमाळ शहरात प्रथमच व्यापक स्वरूपात पर्यावरण जनजागृती अभियान २०२६ यशस्वीपणे राबविण्यात आले. १४ मेपासून सुरू झालेली ही मोहीम २४ मेपर्यंत विविध भागांमध्ये प्रभावीपणे पार पडली.



या अभियानांतर्गत शहरातील प्रमुख चौक, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणी पर्यावरण विषयक पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. ई-वेस्ट संकलन, रेन वॉटर हार्वेस्टिंग, प्लास्टिक निर्मूलन, ध्वनी प्रदूषण आणि कचरा विलगीकरण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत जनजागृती केली. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये समाजोपयोगी उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने समाजकार्य महाविद्यालयातील प्रथम आणि द्वितीय वर्षातील ३८ विद्यार्थ्यांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अभियानासाठी आवश्यक पोस्टर व साहित्य विद्यार्थ्यांनी प्रयास यवतमाळच्या सहकार्याने स्वतः तयार केले असून त्यासाठी विशेष परिश्रम घेतले. मोहीम सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत प्रयासचे अध्यक्ष डॉ. विजय कावलकर, डॉ. सौ. विजया कावलकर, डॉ. चेतन दरणे आणि उदय सज्जनवार यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण विषय समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत मार्गदर्शन केले. दहा दिवसांच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी सकाळी आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत शहरातील विविध ९७ भागांना भेट देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी अनेक नागरिकांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग व ई-वेस्ट संकलनाबाबत उत्सुकता दाखवत अधिक माहिती जाणून घेतली. या पर्यावरण जनजागृती अभियानामुळे शहरातील नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण होत असून या उपक्रमासाठी प्रयास यवतमाळच्या सर्व सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. उपक्रमाचे समन्वयन प्रा. घनश्याम दरणे यांच्या मार्गदर्शनाखाली रितेश गवारकर, प्रणव गोहणे, शैलेश पिंजरकर आणि प्रज्वल उगेवार या विद्यार्थ्यांनी केले.

# ढाणकीत पाणी संकट कायम..!

## लोकप्रतिनिधींचा स्वखर्च की प्रशासनाच्या अपयशावर पडदा?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**ढाणकी, दि. २४ :** ढाणकी शहरात उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातील अनेक भागांत तब्बल २० ते २५ दिवसांनी एकदाच नळाला पाणी येत असल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, नागरिकांना ५०० लिटर पाण्यासाठी तब्बल १५० रुपये मोजावे लागत आहेत.




या संकटाच्या पार्श्वभूमीवर काही लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेत स्वखर्चाने पाणीपुरवठा सुरू केला आहे. या मदतीमुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळत असला, तरी या कृतीमुळे नगरपंचायत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. लोक प्रतिनिधींनाच स्वतःच्या खिशातून पाणीपुरवठा करावा लागत असेल, तर प्रशासनाची भूमिका नेमकी काय, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.नागरिकांच्या मते, लोकप्रतिनिधींनी स्वखर्चातून मदत करण्यापेक्षा नगरपंचायतीच्या माध्यमातून कायमस्वरूपी उपाययोजना राबविणे अधिक गरजेचे आहे. प्रशासनाला जाब विचारून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. मात्र पाणी प्रश्नावर प्रशासनाला धारेवर धरण्या ऐवजी तात्पुरत्या उपायांवर भर दिला जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. दरम्यान, पैनगंगा नदीवरून लाखो रुपयांचा खर्च करून राबविण्यात आलेली पाणीपुरवठा योजना अद्याप सुरळीत न झाल्याने प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारावर ही टीका होत आहे. पाणी हा मूलभूत अधिकार असताना नागरिकांना तहाने साठी वणवण भटकावे लागणे हे प्रशासनाचे मोठे अपयश मानले जात आहे.

# शहर समस्यांवर युवा टायगर फोर्स आक्रमक..!

## प्रशासनाला निवेदन, तातडीच्या बैठकीचे आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २४ :** शहरातील वाढत्या नागरी, आरोग्य, सुरक्षा व मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर युवा टायगर फोर्सने आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. विविध गंभीर प्रश्नांबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डोंगरे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.



निवेदनात शहरातील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे, औषधांचा तुटवडा, सोनोग्राफी सेवा व रुग्णवाहिका सुविधा, शहरातील कचरा व नाल्यांची समस्या, रस्त्यांवरील खड्डे, बंद पथदिवे, पाणीटंचाई, दूषित पाणीपुरवठा व वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. याशिवाय महिलांची सुरक्षा, वाढती गुन्हेगारी, वाहतूक कोंडी, बेरोजगार युवकांसाठी रोजगार शिबिरे, शहरात सीसीटीव्ही व्यवस्था आणि आदिवासी भागातील मूलभूत सुविधांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले.युवा टायगर फोर्सच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या जीवनाशी संबंधित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशारा प्रशासनाला दिला. या निवेदनाची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी डोंगरे यांनी सर्व संबंधित विभागांची संयुक्त बैठक तातडीने बोलावून प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच प्रत्येक विभागाला स्वतंत्र निर्देश देऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी युवा टायगर फोर्सचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शहरातील विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेच्या या भूमिकेचे नागरिकांतून स्वागत होत आहे.

# संजय खाडेंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी गाजला

## वाढदिवसाचा जल्लोष नव्हे, समाजसेवेचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. २४ :** शेतकरी, कामगार नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संजय खाडे यांचा वाढदिवस यंदा केवळ शुभेच्छा आणि सत्कारापुरता मर्यादित न राहता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. रक्तदाना पासून वृद्धाश्रम भेटी पर्यंत विविध सामाजिक उपक्रमांमुळे वाढदिवसानिमित्त वणी शहरात दिवसभर सेवाभावी वातावरण निर्माण झाले. सकाळच्या सत्रात शेतकरी मंदिर, वणी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला युवक व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात १०० हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले. लाईफ लाईन रक्तपेढी, नागपूर यांच्या माध्यमातून रक्त संकलन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी संजय खाडे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दुपारच्या सत्रात पळसो नी येथील बाजीराव वृद्धाश्रमात कपडे, चप्पल व दैनंदिन वापराच्या साहित्याचे वितरण करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या भावनिक आधारासाठी ही प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करून सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला. संध्याकाळी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते धनंजय खाडे संचालित "डीएसके कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स" या नव्या कार्यालयाचे उद्घाटन झाले. त्यानंतर शेतकरी मंदिर येथे अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला. वणी विधानसभा क्षेत्रातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती यावेळी लक्षवेधी ठरली. संजय खाडे फाउंडेशन व सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# अतिदुर्गम वरपोड मधून सचिन नाईक यांच्या दौऱ्याची सुरुवात..!

## खासदार प्रतिभाताई धानोरकर टेकड्या चढत पोहोचल्या आदिवासी पाड्यावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामनी, दि. २४ :** काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी नियुक्तीनंतर आपल्या पहिल्या दौऱ्याची सुरुवात झरी-जामनी तालुक्यातील अतिदुर्गम वरपोड या आदिवासी पाड्या पासून केली. या कार्यक्रमाला चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या.

विशेष म्हणजे या गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने खासदार, जिल्हाध्यक्ष आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना रखरखत्या उन्हात टेकड्या चढत जंगलातून काही अंतर पायी प्रवास करावा लागला. दाभाडी गट ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थांनी पाहुण्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करत क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची प्रतिमा भेट दिली. यावेळी गावातील महिला, बालके आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व सामाजिक प्रश्न जाणून घेण्यात आले. यावेळी सचिन नाईक यांनी आदिवासींसाठी काँग्रेसने क्षेत्र बंधन कायदा, पेसा कायदा, वनहक्क कायदा, मनरेगा आणि अन्न सुरक्षा अधिकार यांसारखे महत्त्वाचे कायदे लागू करून न्याय दिला असल्याचे सांगितले. विद्यमान सरकार आदिवासी प्रश्नांबाबत गंभीर दिसत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. दुर्गम भागातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा काँग्रेस कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.स्थानिक ग्रामस्थांनी गावासाठी रस्ता व समाज भवनाची मागणी केली. त्यावर खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी वन विभाग व संबंधित यंत्रणांशी चर्चा करून रस्त्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. त्यानंतर दाभाडी येथे रोजगार हमी मजुरांशी संवाद साधत रोजगाराच्या प्रश्नांवर पाठपुरावा करण्याची ग्वाही देण्यात आली. तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचीही भेट घेण्यात आली.



**वरपोडला भेट देणाऱ्या पहिल्या खासदार प्रतिभाताई धानोरकर देश स्वतंत्र झाल्यानंतर प्रथमच एखाद्या खासदाराने वरपोड या दुर्गम आदिवासी गावाला भेट दिल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. "खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी गावात येऊन आपुलकीने विचारपूस केली. त्यामुळे गावकरी भारावून गेले आहेत," अशी भावना सरपंच सुभाष कुळमेथे यांनी व्यक्त केली.**

# डिझेल टंचाईमुळे शेतकरी संकटात..!

## मशागतीच्या तोंडावर इंधनासाठी रांगा, २६ मे रोजी ट्रॅक्टर-डबकी मोर्चा

**यवतमाळ, दि. २४ :** मे महिन्याच्या वाढत्या उष्णतेमुळे राज्यात तापमानाचा पारा ४४ ते ४५ अंशांपर्यंत पोहोचला असून, हवामान विभागाने आगामी काही दिवसांत पावसाचे संकेत दिले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीसाठी मशागतीच्या कामात व्यस्त झाले आहेत. मात्र याच काळात डिझेल-पेट्रोल टंचाईचा प्रश्न गंभीर बनल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.



शासनाकडून राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा केला जात असला, तरी ग्रामीण भागातील प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक तालुक्यांतील पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी शेतकऱ्यांच्या लांबलचक रांगा लागल्या असून, तासन्तास प्रतीक्षा करूनही इंधन मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी यामुळे वादविवाद आणि तणावाचे प्रकारही घडत असल्याचे समोर येत आहे. पूर्वी शेतीसाठी बैलजोडीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात होता. मात्र आधुनिक शेती पद्धतीमुळे ट्रॅक्टर आणि यंत्रसामग्रीवर अवलंबित्व वाढले आहे. त्यामुळे मशागतीसाठी पेट्रोल,डिझेल अत्यावश्यक बनले आहे. त्यातच रासायनिक खतांच्या वाढत्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. केंद्र सरकारने नैसर्गिक व सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले असले, तरी अनेक वर्षांपासून सुरू असलेली रासायनिक शेती एकदम बंद करणे शक्य नसल्याचे शेतकरी सांगत आहेत. त्यात रासायनिक खताचा सुद्धा तुटवडा होणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेती विद्यापीठे व संबंधित यंत्रणांनी कमी खर्चातील शेती, सेंद्रिय शेतीचे पर्याय आणि शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन यावर अधिक भर देण्याची गरज व्यक्त होत आहे. दुसरीकडे राजकीय स्तरावर विविध निवडणुका व जागावाटपाच्या चर्चांना प्राधान्य दिले जात असताना, शेतकऱ्यांच्या दैनंदिन प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. यवतमाळ हा आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यातच यंदा पिक विमा न मिळाल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. पिक विमा न मिळाल्याने सुद्धा शेतकरी हताश न होता परत शेतीच्या कामाला लागले आहे. त्यामुळे शेतकरी हा खरंच राजा असतो हे यातून अधोरेखित होत आहे. या पार्श्वभूमीवर डिझेल टंचाईच्या निषेधार्थ स्थानिक आमदार बाळासाहेब मांगुरकर यांच्या नेतृत्वात २६ मे रोजी भव्य ट्रॅक्टर व डबकी मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे इंधन व सुविधा मिळणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# 'नीट'चा गोंधळ टाळायचा तर...

**वैद्यकीय शिक्षणासाठी अनिवार्य असणाऱ्या 'नीट' परीक्षेतील गैरव्यवहारांसंदर्भात नित्यनव्याने माहिती समोर येत आहे आणि त्यातून परीक्षामाफियांचा विळखा किती खोलवर पसरला आहे, याचे दर्शन देशाला घडत आहे. महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा या राज्यांमध्ये पसरलेले हे रॅकेट शोधून काढणे सीबीआयपुढे मोठे आव्हान आहे; पण भविष्यात ही परीक्षा पारदर्शकपणाने कशी पार पडणार, हा पालक व विद्यार्थ्यांमधून उपस्थित होणारा मुख्य प्रश्न आहे.**


वैद्यकीय शिक्षणासाठी संपूर्ण देशात घेतली जाणारी 'नीट' पुन्हा एकदा पेपरफुटीच्या आणि गैरप्रकारांच्या चक्रव्यूहात अडकली आहे. यंदाच्या परीक्षेनंतर उद्धवलेल्या परिस्थितीमुळे देशभरा तील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. या पार्श्वभूमीवर, केवळ वरवरच्या सुधारणा किंवा गुन्हेगारांना अटक करून हा प्रश्न सुटणार नाही, असे स्पष्ट मत देशभरातील शिक्षणतज्ज्ञ, वैद्यकीय संघटना आणि उच्चस्तरीय समित्यांनी व्यक्त केले आहे. परीक्षा पद्धतीतील गैरप्रकार कायमचे रोखायचे असतील, तर 'नीट'सारख्या अतिकेंद्रीकृत परीक्षा पूर्णपणे बंद कराव्यात किंवा त्यांच्या रचनेत मूलभूत बदल करावेत, असाही सूर उमटत आहे. भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) आणि फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन (फायमा) यांसारख्या सर्वोच्च संस्थांनी सध्याच्या परीक्षा प्रणालीतील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले आहे. २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी एकाच दिवशी, एकाच वेळी कागद आणि पेन (ओएमआर शीट) स्वरूपात परीक्षा देतात, तेव्हा त्या संपूर्ण प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप आणि त्रुटींची शक्यता प्रचंड असते. प्रश्नपत्रिकांची छपाई, त्यांची वाहतूक आणि परीक्षा केंद्रांपर्यंत त्यांचे वितरण या संपूर्ण साखळीत अनेक कच्चे दुवे असून त्यांचा फायदा परीक्षा माफिया आणि गैरप्रकार करणारे गट घेतात. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनीही ओएमआर आधारित परीक्षा पद्धती हेच पेपरफुटीचे मुख्य कारण असल्याचे मान्य केले आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने 'इस्रो'चे माजी प्रमुख डॉ. के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने देशभरातून सुमारे ३७ हजार सूचना गोळा करून १८५ पानांचा सविस्तर अहवाल सादर केला होता. त्यामध्ये परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी ९५ महत्त्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या होत्या. राधाकृष्णन समितीने यामध्ये स्पष्ट केले होते की, भौतिक स्वरूपातील प्रश्नपत्रिकांची वाहतूक ही या संपूर्ण व्यवस्थेतील सर्वात कमकुवत कडी आहे. त्यावर उपाय म्हणून समितीने संगणक साहाय्य असणारी सुरक्षित प्रश्नपत्रिका (सीपीपीटी) ही संकरित पद्धत सुचवली होती. या पद्धतीनुसार, प्रश्नपत्रिका डिजिटल स्वरूपात एनक्रिप्टेड करून थेट परीक्षा केंद्रावरील सुरक्षित सर्व्हरवर पाठवली जावी आणि परीक्षा सुरू होण्यापूर्वी काही वेळ आधीच तिची छपाई केली जावी. तथापि, तज्ज्ञांच्या मते या तात्पुरत्या उपायांपेक्षा संपूर्ण परीक्षा पद्धती डिजिटल आणि संगणकीकृत करणे अधिक सुरक्षित ठरेल.

राधाकृष्णन समिती आणि इतर शिक्षणतज्ज्ञांनी 'नीट' परीक्षा पूर्णपणे संगणक आधारित चाचणी (सीबीटी) मोडमध्ये आणण्याची शिफारस केली आहे. जेव्हा परीक्षा संगणकावर आणि वेगवेगळ्या सत्रांमध्ये घेतली जाते, तेव्हा एकाच वेळी संपूर्ण देशात पेपर फुटण्याचा धोका जवळपास ९५ टक्क्यांनी कमी होतो. वेगवेगळ्या सत्रांमधील काठिण्य पातळी संतुलित करण्यासाठी 'सायकोमेट्रिक नॉर्मलायझेशन' (गुण सुसूत्रीकरण) पद्धतीचा वापर करावा, असाही एक उपाय पुढे आला आहे. या बदलामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता त्यांच्या सापेक्ष कामगिरीवरून ठरेल आणि प्रश्नपत्रिकेच्या एखाद्या विशिष्ट सेटमुळे कोणावरही अन्याय होणार नाही.

दुसरीकडे, देशातील काही राज्यांनी आणि तज्ज्ञांच्या गटाने 'नीट' परीक्षा पूर्णपणे बंद करून वैद्यकीय प्रवेशाचे अधिकार पुन्हा राज्यांकडे सोपवण्याचा पर्याय सुचवला आहे. तामिळनाडू आणि काही इतर राज्यांच्या समित्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, 'नीट' मुळे कोचिंग क्लास संस्कृतीला अवाजवी महत्त्व आले असून गरीब आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. वैद्यकीय जागांचे वर्गीकरण करून राज्यांना आपापल्या शिक्षण पद्धतीनुसार आणि बारावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश देण्याची परवानगी दिली, तर राष्ट्रीय स्तरावरील एकाच परीक्षेवर येणारा प्रचंड ताण कमी होईल. परीक्षेचे विकेंद्रीकरण केल्यास गैरप्रकारांची व्याप्ती मर्यादित राहील आणि संपूर्ण देशातील वैद्यकीय प्रवेश प्रक्रिया एकाच वेळी ठप्प होणार नाही.

परीक्षा घेणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) अंतर्गत रचनेवरही अनेक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. राधाकृष्णन समितीने असे निदर्शनास आणून दिले होते की, एनटीए ही संस्था कंत्राटी कर्मचारी आणि खासगी संस्थांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. सुरक्षित परीक्षा केंद्रांची कमतरता असल्याने खासगी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्रे दिली जातात. तिथे सुरक्षिततेचे नियम पाळले जात नाहीत. भारतीय विज्ञान संस्थेने (आयआयएससी) केलेल्या तपासणीत काही केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे देशातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय संस्थांच्या मदतीने किमान एक अधिकृत आणि सुरक्षित परीक्षा केंद्र उभारले जावे, अशी शिफारस करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांचे हे खासगीकरण थांबवून केवळ नामांकित शासकीय संस्था, केंद्रीय विद्यालये किंवा आयआयटीसारख्या ठिकाणीच परीक्षा घेतल्या जाव्यात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येण्याचा आर्थिक त्रास होऊ नये म्हणून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज 'मोबाईल टेस्टिंग सेंटर्स' (फिरती परीक्षा केंद्रे) तयार करण्याचा एक अभिनव पर्यायही राधाकृष्णन समितीने सुचवला आहे.



केंद्र सरकारने परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सार्वजनिक परीक्षा (अनुचित साधनांना प्रतिबंध) कायदा लागू केला आहे. यामध्ये दहा वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद आहे. परंतु, तज्ज्ञांच्या मते हा कायदा केवळ गुन्हा घडल्यानंतर शिक्षा देणारा आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक तंत्रज्ञान आणि संस्थात्मक उत्तरदायित्व अधिक महत्त्वाचे आहे. केवळ कायदे करून किंवा तांत्रिक अद्ययावततेचे दावे करून प्रश्न सुटणार नाही, तर यंत्रणेतील मानवी हस्तक्षेप पूर्णपणे कमी करावा लागेल. आगामी काळातील परीक्षा पूर्णपणे सुरक्षित आणि पारदर्शक करायच्या असतील, तर उच्चस्तरीय समित्यांच्या शिफारसींची संपूर्ण अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. परीक्षा पद्धतीचे डिजिटलायझेशन करणे, खासगी कोचिंग संस्थांवर नियंत्रण आणणे आणि एनटीएसारख्या संस्थांचे पूर्ण पुनर्गठन करणे हाच या राष्ट्रीय समस्येवरील एकमेव आणि शाश्वत उपाय आहे, असे मत संपूर्ण देशातील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

डॉक्टरांच्या सर्वोच्च संघटनांपैकी एक असलेल्या 'युनायटेड डॉक्टर्स फ्रंट' (यूडीएफ) या संस्थेने थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) कायदेशीर अस्तित्वावरच मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. संघटनेच्या कायदेतज्ज्ञांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले आहे की, एनटीए ही संस्था संसदेच्या कोणत्याही कायद्याद्वारे स्थापन झालेली वैधानिक संस्था नाही. ती केवळ १८६० च्या सोसायटी नोंदणी कायद्यांतर्गत नोंदणीकृत असलेली एक स्वायत्त संस्था आहे. तज्ज्ञांच्या मते, एका एनजीओसारख्या संरचनेत काम करणाऱ्या संस्थेकडे देशभरातील बावीस लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या भविष्याचा निर्णय घेण्याची जबाबदारी देणे, हीच मुळात एक मोठी घोडचूक आहे. या रचनेमुळे संस्थेमध्ये उत्तरदायित्वाचा पूर्णपणे अभाव (अकाऊंटिबिलिटी व्हॅक्यूम) निर्माण झाला आहे. म्हणूनच, ही जुनी रचना बरखास्त करून संसदेच्या विशेष कायद्यांतर्गत थेट लोकसभेला आणि राज्यसभेला जबाबदार असणारी वैधानिक राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरण संस्था स्थापन करावी.

यामुळे या संस्थेचे संपूर्ण आर्थिक आणि प्रशासकीय कामकाज भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांच्या थेट ऑडिटच्या कक्षेत येईल, अशी आग्रही मागणी वैद्यकीय तज्ज्ञांनी केली आहे.

शिक्षणमंत्र्यांनी पुढील वर्षीपासून 'नीट'ची परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले आहे; पण यंत्रणेमध्येच दोष असतील, तर त्या परीक्षांमध्येही गैरप्रकार घडू शकतात, हे विसरता कामा नये.

**विश्वास सरदेशमुख**

# नीट पेपरफुट प्रकरण : दोष फक्त व्यवस्थेचा की आपलाही?

सध्या सोशल मिडीया उघडा, वर्तमानपत्र वाचा किंवा कोणाशीही चर्चा करा, प्रत्येकाच्या ओठी एकच विषय आहे नीट पेपरफुट प्रकरण. सर्वत्र हाच विषय. दररोज कोणत्या ना कोणत्या नव्या व्यक्तीला अटक होत आहे आणि त्यातून नवीन नवीन माहिती समोर येत आहे.हे सर्व पाहून, वाचून आणि ऐकून असे वाटते की जणू भारतात अशी घटना प्रथमच घडली आहे आणि त्यामुळे देशाची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर मलीन झाली आहे. पण खरोखरच या प्रकरणात दोष फक्त पेपर विकणाऱ्यांचा किंवा व्यवस्थेचाच आहे का? हा प्रश्न आपणही स्वतःला विचारायला हवा.

पेपरफुट प्रकरणात अनेकदा प्रायव्हेट कोचिंग क्लासेसचे संचालक किंवा शिक्षक यांची नावे समोर येतात. परंतु थोडा विचार केला, तर एक गोष्ट लक्षात येते की जेव्हा एखाद्या शिक्षकाकडे पेपरसंबंधी माहिती असेल, तेव्हा तो ती माहिती विद्यार्थ्याला किंवा त्याच्या पालकांना देण्याचा प्रयत्न करेल. पण जर पालकांनीच स्पष्टपणे नकार दिला, तर शिक्षक काय करू शकणार? दुर्दैवाने, आजची परिस्थिती अशी झाली आहे की काही पालक आपल्या पाल्याने कमी मेहनतीत जास्तीत जास्त पुढे जावे, यासाठी वाटेल ते करण्यास तयार आहेत. लाख, दोन लाख, पाच लाख रुपयेच या रकमांना जणू काही किंमतच उरलेली नाही. पण हा पैसा येतो कुठून? आणि कोणत्या अपेक्षेने खर्च होतो? खरे तर सर्वप्रथम अशा पालकांची चौकशी व्हायला हवी. ज्यांनी लाखो रुपये देऊन पेपर विकत घेतला, त्यांचा स्वतःच्या मुलावर किंवा ज्या संस्थेत तो शिकतो त्या संस्थेवरही विश्वास नव्हता, हेच यातून स्पष्ट होते. मग त्या शिक्षणाचा, त्या मेहनतीचा अर्थ काय?

आज कोचिंग क्लासेस ही एक समांतर अर्थव्यवस्था बनली आहे. आयुष्यभर कष्ट करून मध्यमवर्गीय माणूस एक घर उभे करतो. थोडीफार पूर्वजांची शेती असते. अनेक कुटुंबे हे घर, शेती, दागिने विकून मुलांना या क्लासेसला पाठवतात. पण खरच इतकी गरज आहे का? स्वमेहनतीने अभ्यास करून यश मिळू शकत नाही? पूर्वी असे मोठमोठे क्लासेस नव्हते. तरीही त्या काळात अत्यंत विद्वान डॉक्टर, इंजिनिअर आणि तज्ज्ञ निर्माण झाले. फरक एवढाच की आज शिक्षणाभोवती एक वेगळे बाजारपेठेचे जाळे तयार झाले आहे. संस्थाचालक त्यांचा व्यवसाय करत आहेत. प्रत्येकाला व्यवसाय करण्याचा आणि श्रीमंत होण्याचा अधिकार आहे. पण आपण स्वतः काय करायचे, किती करायचे आणि कुठे थांबायचे, हे ठरवण्याची जबाबदारी आपली स्वतःचीच आहे. फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स, बायोलॉजीमध्ये पुरेसे गुण नसतानाही अनेक विद्यार्थी फक्त मित्र गेले म्हणून ँकिंवा NEET च्या मागे लागतात. कारण काय तर दुसऱ्या झगमग शहरात राहायला मिळेल, बाईक मिळेल, व्यक्ती स्वातंत्र्य मिळेल या आकर्षणांमुळे अनेक निर्णय घेतले जातात. पण नंतर अभ्यास जमत नाही, स्पर्धा झेपत नाही आणि मग काही जण चुकीच्या मार्गाकडे वळतात आणि जर अपेक्षित निकाल मिळाला नाही, तर मग निराशा, आत्महत्या आणि व्यवस्थेला दोष देणे सुरू होते. परंतु आत्महत्या हा उपाय कधीच असू शकत नाही. अनेक समस्या येतील, अपयश येईल, पण त्यातून मार्ग शोधणे हेच खरे धैर्य आहे. एका परीक्षेचा निकाल म्हणजे आयुष्याचा शेवट नाही.

माझा स्वतःचा अनुभव सांगतो. माझी मुलगी CBSE शाळेत शिकली. सातवीतून आठवीत गेल्यानंतर शाळेकडून मोठा दबाव होता. आतापासूनच JEE/NEET च्या पूर्व तयारीसाठी शाळेचा ज्या प्रायव्हेट क्लासेस सोबत आर्थिक संबंध होता त्या मोठ्या नामांकित प्रायव्हेट क्लासेसमध्ये प्रवेश घ्यावा, असे वारंवार सांगितले जात होते. पण मी स्पष्टपणे नकार देत होतो. माझे एकच म्हणणे होते 'माझ्या मुलीने डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावे हे ठरवणारे तुम्ही कोण?' ४-५ वेळा घरी निरोप दिल्यानंतर सुद्धा माझा नकार गेल्यानंतर मला सांगण्यात आले की क्लासेस न लावल्यास तिचे ँ॰ कमी येतील, प्रसंगी ती नापासही होऊ शकते. पण माझे उत्तर एकच होते 'मला काही घेणेदेणे नाही. ती नापास झाली तरी चालेल. तिचे मानसिक आरोग्य अधिक महत्त्वाचे आहे.' मी दहावीपर्यंत तिला कोणतीही ट्युशन किंवा प्रायव्हेट क्लास लावला नाही. तरीही ती नेहमी टॉप टेनमध्ये होती. दहावीत तिला ९६% गुण मिळाले. तिच्या जवळपास सर्व मैत्रिणी इंजिनिअरिंगकडे गेल्या तरीसुद्धा आम्ही इंजिनिअरिंग किंवा मेडिकल क्षेत्राचा हट्ट धरला नाही. प्रत्येक जण आपापले 'दुकान' मांडून बसला आहे. आपण काय घ्यायचे, कोणत्या मार्गाने जायचे, हे आपल्यालाच ठरवावे लागते. एक जुनी म्हण आहे 'अंथरूण पाहून पाय पसरावे.' शेजाऱ्याचा मुलगा करतो म्हणून आपणही तेच करायचे, ही मानसिकता बदलली पाहिजे.

पेपरफुट ही काही आजची नवीन घटना नाही. यापूर्वीही असे झाले आहे आणि कदाचित पुढेही होत राहील. पण जोपर्यंत कोणी विकत घेण्यास तयार आहे, तोपर्यंत विकणारेही तयार राहतील. जर हे थांबवायचे असेल, तर त्याची सुरुवात पालकांनाच करावी लागेल. यशाची व्याख्या फक्त मोठा पगार किंवा प्रतिष्ठित पद नाही तर समाधानी आणि प्रामाणिक आयुष्य हेही तितकेच मोठे यश आहे.

कदाचित माझ्या या लिखाणामुळे काही पालकांना वाईट वाटेल. कोणावर टिका टिप्पणी करण्याचा हेतू नाही. फक्त एवढेच वाटते प्रत्येकाने एकदा शांतपणे आत्मपरीक्षण करावे. कारण प्रश्न फक्त पेपरफुटीचा नाहीष्ठ प्रश्न आहे आपल्या विचारसरणीचा.

**राजेश कळमकर**

# गुणवत्तेचा लिलाव

पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्र असल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) तपासातून समोर आले आहे. देशभरात अटक करण्यात आलेल्या एकूण ११ प्रमुख आरोपींपैकी एकट्या महाराष्ट्रातून ७ आरोपींना अटक करण्यात आली आहे. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'च्या परीक्षा प्रक्रियेशी जोडलेल्या तज्ज्ञांनीच मुख्य पेपर फोडून तो लातूर आणि पुणे येथील कोचिंग नेटवर्क्सपर्यंत पोहोचवल्याचे उघड झाले आहे.

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी 'नीट' परीक्षा अखेर पेपरफुटीच्या महाघोटाळ्यामुळे रद्द करावी लागली. सुरुवातीला या घोटाळ्याची पाळेमुळे इतर राज्यांत असल्याचे वाटत असतानाच, सीबीआयने केलेल्या धडक कारवायांमुळे महाराष्ट्रातच या पेपरफुटीचे मुख्य धागेदोरे सापडले. राज्याला लाभलेल्या 'लातूर पॅटर्न' सारख्या शैक्षणिक परंपरेला कलंकित करत, शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्या नामांकित कोचिंग क्लास चालकांनी थेट प्रश्नपत्रिकाच विकत घेतल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या प्रकरणात महाराष्ट्रातील अनेक हाय प्रोफाइल आणि धनदांडग्या पालकांनी आपल्या पाल्यांसाठी २५ ते ५० लाख रुपयांचे पॅकेज देऊन हा पेपर आधीच खरेदी केला होता. परीक्षेच्या आदल्या रात्री पुण्याच्या आणि लातूरच्या काही हॉटेल्समध्ये विद्यार्थ्यांना डांबून ठेवून, त्यांच्याकडून या लीक झालेल्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे पाठ करून घेण्यात आली होती, असे पुरावे सीबीआयच्या हाती लागले आहेत. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक वह्यांमध्ये नीटचे हुबेहूब प्रश्न लिहून घेतल्याचेही उघड झाले आहे. या पेपरफुटीमुळे २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात सापडले असून, आता पुनर्परीक्षा घेतली जात आहे.

यामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांना प्रचंड मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शिवाय, महाराष्ट्रातील इंजिनीअरिंग आणि फार्मसीच्या प्रवेश प्रक्रियेलाही या घोटाळ्यामुळे मोठा फटका बसून त्या लांबणीवर पडल्या आहेत.राज्यात पेपर फुटीचे उघड झालेले हे पहिलेच प्रकरण आहे का? राज्यात गेल्या काही वर्षांत विविध शासकीय भरती परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. टीईटी, म्हाडा, आरोग्य विभाग आणि पोलीस भरती यांसारख्या महत्त्वाच्या परीक्षांचे पेपर फुटल्यामुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. ही केवळ एक तांत्रिक चूक किंवा तात्पुरती समस्या नसून, यामागे एक अत्यंत संघटित आणि खोलवर रुजलेली गुन्हेगारी साखळी कार्यरत आहे.

राज्यभरात पेपर फोडणारे आणि त्यांचे दलाल यांचे मोठे रॅकेट सक्रिय असते. हे लोक गरजू आणि श्रीमंत उमेदवारांना शोधून त्यांच्याकडून लाखोंच्या रकमा वसूल करतात. परीक्षांचे कंत्राट बऱ्याचदा बाह्य खासगी कंपन्यांना दिले जाते. या कंपन्यांच्या यंत्रणेतील कमकुवत सुरक्षा व्यवस्थेचा गैरफायदा घेतला जातो. काही प्रकरणांमध्ये वरिष्ठ शासकीय अधिकारी, परीक्षा परिषदेचे प्रमुख आणि राजकीय वरदहस्त असलेल्या व्यक्तींचा थेट सहभाग आढळला आहे. यामुळे या प्रकरणांची पाळेमुळे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचल्याचे दिसते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये थेट पेपर फुटीचे मोठे पुरावे अनेकदा समोर आले नसले तरी, विविधपरीक्षांमध्ये गैरव्यवहार, तोतया उमेदवार आणि ४० लाख रुपयांत पेपर देण्याचे आमिष दाखवणारे रॅकेट पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने फेब्रुवारी २०२५ मध्ये उघडकीस आणले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू शशिकांत कर्णिक यांना २००२ मधील बहुचर्चित एमपीएससी उत्तरपत्रिका घोटाळ्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली होती. महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्राला हादरवून सोडणारा हा त्या काळातील सर्वात मोठा घोटाळा होता. त्यानंतरही राज्यात गेल्या काही वर्षांत विविध शासकीय भरती परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. टीईटी, म्हाडा, आरोग्य विभाग आणि पोलीस भरती यांसारख्या महत्त्वाच्या परीक्षांचे पेपर फुटल्यामुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले.

गुणवत्तेपेक्षा वशिलेबाजी आणि गैरप्रकारांना महत्त्व मिळाल्यामुळे समाजाचा दर्जा खालावत चालला आहे, ही आजच्या काळातील एक अत्यंत चिंताजनक आणि कटू वस्तुस्थिती आहे. जेव्हा मेहनत आणि प्रामाणिकपणाला डावलून पैसा आणि वशिल्याच्या जोरावर यश विकत घेतले जाते, तेव्हा त्याचा थेट परिणाम संपूर्ण समाजव्यवस्थेच्या मानसिकतेवर आणि गुणवत्तेवर होतो.क्लासची फी, खोलीचे भाडे आणि परीक्षा फी भरून विद्यार्थ्यांचे कुटुंबीय कर्जबाजारी होत आहेत. वर्षानुवर्षे पुण्यात किंवा इतर शहरांमध्ये राहून, उपाशीपोटी अभ्यास करणाऱ्या गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास उडाला आहे. त्यामुळे पेपर फुटी ही केवळ शिक्षण व्यवस्थेला लागलेली कीड नसून, ती महाराष्ट्राच्या तरुण पिढीच्या स्वप्नांचा चुराडा करणारी प्रवृत्ती आहे. ही पाळेमुळे उपटून टाकण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्तीच नव्हे, तर प्रशासकीय शुद्धीकरण आणि कायद्याचा कडक बडगा उचलण्याची अत्यंत गरज आहे.राज्यातील स्पर्धा परीक्षांचे कंत्राट खासगी कंपन्यांना देण्याऐवजी संपूर्ण प्रक्रिया एमपीएससी किंवा आयबीपीएस बीपीएस (सारख्या विश्वासार्ह शासकीय संस्थांमार्फत राबवावी. प्रश्नपत्रिकांची छपाई, वाहतूक आणि डिजिटल वितरण यावर कडक तंत्रज्ञान आधारित पाळत (उदा. बायोमेट्रिक, जॅमर्स) असावी. पेपर फुटीच्या खटल्यांसाठी विशेष न्यायालये स्थापन करून गुन्हेगारांना सहा महिन्यांच्या आत कठोर शिक्षा व्हावी, जेणेकरून इतरांवर जरब बसेल. नीट परीक्षांच्या निमित्ताने केंद्राच्या परीक्षांमध्ये राज्यातील यंत्रणांचा असा थेट सहभाग आढळणे ही राज्यासाठी शरमेची बाब आहे. जोपर्यंत या घोटाळ्यातील मूळ सूत्रधारांना आणि पेपर विकत घेणाऱ्या धनदांडग्या पालकांना तुरुंगात डांबून त्यांच्यावर कठोर सामाजिक व कायदेशीर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत गुणवत्तेचा हा लिलाव थांबणार नाही.

**महेश पांचाळ**

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे.

आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. परंतु याच टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.ग्रामीण भागातही प्लास्टिकचे संकट वाढत आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, रासायनिक खतांच्या पॅकेजिंग, कीटकनाशकांच्या बाटल्या आणि विविध कृषी साहित्यामुळे शेतजमिनी प्रदूषित होत आहेत. गावांमध्ये योग्य कचरा व्यवस्थापन नसल्यामुळे प्लास्टिक उघड्यावर फेकले जाते किंवा जाळले जाते. याचा परिणाम पशुधन, माती आणि पाण्यावर होत आहे. अनेक वेळा गायी आणि इतर जनावरे कचऱ्यातील प्लास्टिक खातात. त्यांच्या पोटात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक साचल्यामुळे त्यांचा मृत्यू होतो.



मानवी आरोग्यावर प्लास्टिकचे होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. प्लास्टिकमध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक रसायनांचा मानवी शरीरावर घातक परिणाम होतो. बिस्फेनॉल-ए, पर्थॅलेट्स यांसारखी रसायने हार्मोन्सच्या कार्यात अडथळा निर्माण करतात. प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये ठेवलेले पाणी किंवा गरम पदार्थांमुळे या रसायनांचे प्रमाण वाढते. त्यामुळे मधुमेह, हृदयविकार, प्रजनन समस्या आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. लहान मुलांमध्ये प्लास्टिकच्या खेळण्यांमधूनही विषारी रसायने शरीरात जाण्याचा धोका असतो.

आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन हा केवळ औपचारिक दिन नसून पर्यावरण संवर्धनासाठी एक जागतिक चळवळ आहे. या निमित्ताने जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि सरकारी विभागांच्या माध्यमातून जनजागृती केली जाते. प्लास्टिक वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते. पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, कापडी पिशव्यांचा प्रचार, प्लास्टिक संकलन मोहीम आणि स्वच्छता अभियान यांसारखे उपक्रम राबवले जातात.आज जगभरात 'झिरो वेस्ट' आणि 'सस्टेनेबल लिव्हिंग' या संकल्पना लोकप्रिय होत आहेत. कमीत कमी कचरा निर्माण करणे, पुनर्वापर वाढवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे यावर भर दिला जात आहे. अनेक देशांनी प्लास्टिक कमी करण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. काही देशांमध्ये प्लास्टिक पिशव्या पूर्णपणे बंद करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाते. त्यामुळे लोक पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रवृत्त होतात.आज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणे कठीण असले तरी तो मोठ्या प्रमाणात कमी करणे शक्य आहे. त्यासाठी शासन, उद्योग, संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. 'रिड्यूस, रीयूज आणि रिसायकल' या तत्त्वांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गरज नसताना प्लास्टिक वापरणे टाळले पाहिजे.या आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिनानिमित्त प्रत्येकाने एक छोटा संकल्प करणे गरजेचे आहे. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पृथ्वी निर्माण करण्यासाठी सक्रिय योगदान देऊ. कारण पृथ्वी वाचली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील. निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे आणि प्लास्टिकमुक्त जीवनशैली ही त्या दिशेने टाकलेली महत्त्वपूर्ण पायरी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# खेट्री ग्रामपंचायतीत सचिवपदाचा गोंधळ; ग्रामस्थ संभ्रमात

## साडेतीन वर्षांत दोन सचिव निलंबित, तिघांच्या बदल्यांमुळे कारभार विस्कळीत

■ प्रतिनिधी | खेट्री ■

**पातूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या खेट्री ग्रामपंचायतीत सचिवपदाच्या सततच्या बदल्या आणि निलंबनाच्या कारवाईमुळे प्रशासनिक गोंधळ निर्माण झाला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायतीचा अधिकृत सचिव नेमका कोण, याबाबतच स्पष्टता नसल्याने नागरिक संभ्रमात पडले आहेत.**

गेल्या साडेतीन वर्षांच्या कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून दोन सचिवांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली, तर तिघांची बदली झाली आहे. परिणामी ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले असून विकासकामांनाही मोठा फटका बसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.




वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी वेळेत होत नसल्याचे चित्र आहे. जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे, करसंबंधित कामे तसेच इतर कागदपत्रांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. सध्या ग्रामपंचायतीत प्रभारी सचिवांकडे कारभार सोपविण्यात आला असला, तरी कायमस्वरूपी सचिव नसल्याने अनेक निर्णय प्रलंबित राहत असल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने तातडीने कायमस्वरूपी सचिवाची नियुक्ती करून ग्रामपंचायतीचा कारभार सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

### अनेक सचिवांनी खेट्री गाव घेण्यास नकार?

२०२३ ते मे २०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कारभाराविरोधात ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे अनेक तक्रारी केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर दोन सचिवांवर निलंबनाची कारवाई झाली, तर तिघांची बदली झाली. या सततच्या घडामोडींमुळे खेट्री ग्रामपंचायतीचा पदभार स्वीकारण्यास अनेक सचिवांनी नकार दिल्याची चर्चा आहे. गेल्या महिनाभरापासून प्रभारी सचिवांकडेच कारभार सुरू आहे.

### ग्रामपंचायत कार्यालयाला नेहमी कुलूप?

१२ डिसेंबर २०२५ रोजी सचिव बी. बी. आडे यांच्या निलंबनानंतर ग्रामपंचायत कार्यालय नियमित सुरू राहत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सध्या सहाव्या क्रमांकाचे सचिव एस. डी. ताले यांच्याकडे प्रभारी पदभार आहे. मात्र कार्यालय अनेकदा बंद आढळत असल्याने विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना भर उन्हात ताटकळत बसून कामाविना परतावे लागत असल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पांदण रस्ते योजनेंतर्गत ग्रामीण भागातील महत्त्वाचे रस्ते तातडीने सुरू करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सुकर दळणवळणाची सुविधा उपलब्ध व्हावी तसेच ग्रामीण परिसर सुजलाम-सुफलाम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या पांदण रस्ते योजनेची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेऊन कार्य करावे, असे निर्देश आमदार रणधीर सावरकर यांनी अधिकाऱ्यांना दिले.

### आ. रणधीर सावरकर यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील पांदण रस्त्यांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार सावरकर बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून ही योजना राबविण्यात येत असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळाला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून पांदण रस्त्यांबाबतच्या अडचणी, प्रस्तावित आराखडे तसेच शासनस्तरावरील प्रलंबित बाबींची माहिती घेण्यात आली. ज्या ठिकाणी प्रशासकीय अडथळे आहेत, त्यांचे तातडीने निराकरण करून कामांना गती द्यावी, असे निर्देश आमदार सावरकर यांनी दिले.

तसेच अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातील महत्त्वाचे पांदण रस्ते प्राधान्याने मंजूर करून कामे सुरू करण्यावर त्यांनी भर दिला. बैठकीला उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपविभागीय अधिकारी शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्यासह बांधकाम विभागातील पटोकार मॅडम, ढंगारे मॅडम, जानोरकर साहेब, अंबादास उमाळे, जयकुमार ठोकळ, पंकज वाडीवाले, राजेश ठाकरे, विवेक भरणे, वैभव तराळे, अतुल आवारे, लव भटकर आदी अधिकारी उपस्थित होते.

## कराटे स्पर्धेसाठी अकोल्याच्या खेळाडूंची निवड



**अकोला :** दि. २६ मे ते २९ मे २०२६ दरम्यान मसुरी, उत्तराखंड येथे एख्एइ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ४१ व्या ऑल इंडिया कराटे स्पर्धेसाठी अकोला येथील महाराष्ट्र स्टॉग शोतोकान स्पोर्ट्स कराटे-डो ऑर्गनायझेशन इंडिया यांच्या दोन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

या स्पर्धेत १० वर्षांखालील गटात काता व कुमिते (फाईट) प्रकारासाठी खेळाडू सूर्यवीर चोपडे व अगस्त्य खीरेकर यांची निवड झाली आहे.

# भुईमूग उत्पादनात मोठी घट; पातूर तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात

## सावरगावसह परिसरातील शेतकऱ्यांचे गणित कोलमडले

■ प्रतिनिधी | खेट्री ■

रब्बी हंगामातील भुईमूग उत्पादनात यंदा मोठी घट झाल्याने सावरगावसह पातूर तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मागील खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यानंतर या वर्षी भुईमूग लागवडीतून दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र बदलते हवामान, तीव्र उष्णता आणि रोगराईमुळे उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे.



यंदा अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भुईमूग लागवड केली होती. बियाणे, खत, मशागत, औषध फवारणी आणि मजुरीवर मोठा खर्च करण्यात आला. मात्र पिकांची वाढ अपेक्षेप्रमाणे झाली नाही. उष्णतेच्या लाटेमुळे झाडांची वाढ खुंटली, तर रोगराईमुळे शेंगांची गुणवत्ता घसरली. परिणामी उत्पादनात मोठी घट झाली आहे.

उत्पादन कमी झाल्याने अनेक शेतकऱ्यांना खर्चही वसूल करता आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले असून पुढील हंगामासाठी भांडवल उभे करण्याचे मोठे संकट निर्माण झाले आहे. काही शेतकऱ्यांवर कर्जाचा भार वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, नुकसानग्रस्त भागांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### उष्णतेचा फटका; उत्पादनात मोठी घसरण

यंदाच्या वाढत्या तापमानाचा भुईमूग पिकाला मोठा फटका बसला. पिकांची वाढ मंदावल्याने शेंगा कमी लागल्या. त्यात रोगराई वाढल्याने उत्पादन आणि गुणवत्ता दोन्ही घसरली. खर्च वाढत असताना उत्पन्न घटल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले असून शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी होत आहे.

## पंढरपूर येथे कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**अकोला :** सखा श्रीहरी सेवा समिती अकोलाच्या वतीने वै.श्रीराम महाराज मेहुणकर यांच्या पावन जन्मशताब्दी वर्षानिमित्त पंढरपूर येथे अखंड हरिनाम सप्ताह व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पुरुषोत्तम मासानिमित्त हभप मोहन महाराज गोंडचवर यांनी साकार केलेल्या या कीर्तन महोत्सवाचा प्रारंभ पंढरपूर येथील श्री संत सखाराम महाराज मठात रविवार दिनांक ७ जून रोजी होणार असून समापन शुक्रवार दिनांक १२ जून रोजी होणार आहे.

# चेतना दिनानिमित्त चांदूरमध्ये मोरणा नदी स्वच्छता अभियान



■ प्रतिनिधी | अकोला ■

सर्वसामान्य नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवत केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविणारे खासदार अनुप धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभर ‘चेतना दिवस’ विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघातील चांदूर येथे लोकसहभागातून मोरणा नदी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

### खा. अनुप धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त युवकांचा सामाजिक उपक्रम; आ. रणधीर सावरकरांचा सहभाग

चांदूर गावकरी, युवक तसेच शाळेतील वर्गमित्र-मैत्री ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात आमदार रणधीर सावरकर यांनी प्रत्यक्ष सहभागी होत युवकांच्या कार्याचे कौतुक केले. नदी परिसरात स्वच्छता करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार सावरकर म्हणाले की, लोकसहभागाशिवाय कोणतीही योजना यशस्वी होऊ शकत नाही. शासन चांगले काम करू शकते, मात्र जनतेच्या सहभागातून ते अधिक प्रभावी ठरते. उत्सव, सामाजिक कार्यक्रम आणि जनजागृती मोहिमांच्या माध्यमातून समाजात एकोप्याची भावना निर्माण होत असते. चांदूर येथील युवकांनी मोरणा नदी स्वच्छतेचा उपक्रम राबवून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

खासदार अनुप धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून युवक, कार्यकर्ते व पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. हा प्रतिसाद खासदार धोत्रे यांच्या लोकप्रियतेची व जनसंपर्काची पावती असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी भाजपा महानगराध्यक्ष जयंत मसने, राजेश लुंगे, तहसीलदार कुणाल झाल्टे, बीडीओ सौ. पटोकार , पीआय मनोज केदारे, वैभव माहोरे, संजय कोरडे, वासुदेव टिकार, लखुआप्पा लंगोटे, देविदास बोदडे, संजय माहोरे, चिन्मय वाकोडे यांच्यासह ग्रामस्थ व युवाशक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# सिंधी कॅम्प येथे आंबा महोत्सव उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक सिंधी कॅम्प येथे आंबा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. परमानंद मोटवानी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या बागेत तयार होणाऱ्या सेंद्रिय फळांचा महोत्सव दरवर्षी आयोजित करण्यात येतो. या महोत्सवामध्ये सीताफळ, जांभूळ, आंबा आदी फळांचे विशेष आकर्षण असते.या कार्यक्रमात शेकडो नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमामध्ये सर्व मान्यवर व नागरिकांसाठी स्वादिष्ट अल्पोपहार तसेच ताज्या आंब्याच्या रसाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित मान्यवरांनी परमानंद मोटवानी यांचे या स्तुत्य उपक्रमासाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात.कार्यक्रमात पूज्य सिंधी जनरल पंचायतचे माजी अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी, बाबा हरदास रामनगरचे माजी अध्यक्ष भारूमल मुलानी, नगरसेवक हरीशभाई आलमचंदानी, नंदलाल मोटवानी, सिंधु सीनियर सिटीजनचे अध्यक्ष कोडुमल चावला, उम्मीद फाउंडेशनचे कायदेशीर सल्लागार अँड. प्रणव पाटील तसेच सखर पंचायतचे अध्यक्ष हरीश पारवानी समवेत ज्ञानचंद तलरेजा, दीपक मनवाणी, मोहन नागवानी, गौतम वाधवानी, हरीश सावलानी, भगतराम देवानी, सुनील साधवानी, कमल साधवानी, सुरेश आहुजा, प्रभु सेनानी, राजकुमार मिर्चला, महेश खानचंदानी, नरेश केसवानी, मानिक वाधवानी, घनश्याम मोटवानी, शखावत वाधवानी, मुरलीधर विरवानी, आदींसह उपस्थित होते.

# मोबाईलच्या पडद्यामागे हरवतंय बालपण; मैदानं ओस, संवादही कमी

## ऑनलाइन गेम्स आणि स्क्रीनच्या आहारी गेलेल्या मुलांविषयी पालकांमध्ये वाढती चिंता

■ नासीर शेख ■

**खेट्री :** एकेकाळी शाळा सुटताच गल्लीबोळात क्रिकेट, लगोरी, लपाछपीसारखे खेळ रंगत असत. मात्र आता हीच मैदानं ओस पडलेली दिसत असून लहान मुलांचे जग मोबाईलच्या स्क्रीनपुरते मर्यादित होत चालल्याचे चित्र ग्रामीण भागातही प्रकर्षाने दिसून येत आहे. ऑनलाइन गेम्स, व्हिडिओ आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे मुलांमधील एकटेपणा, चिडचिड आणि सामाजिक दुरावा वाढत असल्याची चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून मुलांच्या हातात आलेला मोबाईल आता त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. शिक्षणापुरता सुरू झालेला वापर आता मनोरंजन आणि गेमिंगपर्यंत पोहोचला असून अनेक मुलं तासन्तास स्क्रीनसमोर



वेळ घालवत आहेत. परिणामी अभ्यासाकडे दुर्लक्ष, मैदानी खेळांपासून दुरावा आणि संवाद कौशल्यात घट होत असल्याचे निरीक्षण व्यक्त होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, सातत्याने मोबाईलचा वापर केल्याने डोळ्यांवर ताण येण्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो. झोपेच्या समस्या, आक्रमक वर्तन, एकलकोंडेपणा आणि भावनिक अस्थिरता यांसारख्या समस्या मुलांमध्ये वाढताना दिसत आहेत. विशेषतः लहान वयात डिजिटल माध्यमांचा अतिरेक मेंदूच्या विकासावर परिणाम करू शकतो, असा इशाराही तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान, पालकांच्या व्यस्त दिनचर्येमुळे मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी मोबाईल देण्याचे प्रमाण वाढल्याचेही दिसून येते. अनेक कुटुंबांमध्ये संवादाऐवजी स्क्रीनने जागा घेतल्याने मुलांच्या सामाजिक जडणघडणीवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### पालकांनी काय करावे?

तज्ज्ञांच्या मते, मुलांचा मोबाईल वापर नियंत्रित ठेवण्यासाठी पालकांनी स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे. मुलांशी नियमित संवाद साधणे, मैदानी खेळ, वाचन, कला आणि सर्जनशील उपक्रमांकडे त्यांना वळवणे गरजेचे आहे. तसेच पालकांनी स्वतःही मोबाईलचा मर्यादित वापर करून मुलांसमोर आदर्श निर्माण करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# ‘जनधन’वर विम्याचा जबरदस्तीचा भार?

## संमती नसताना खात्यातून हप्ते कपात; एसबीआय हिवरखेड शाखेविरोधात संताप

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

**गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या जनधन योजनेतील खात्यांमधून खातेदारांच्या स्पष्ट संमतीशिवाय प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) अंतर्गत हप्ते कपात होत असल्याचा गंभीर आरोप भारतीय स्टेट बँकेच्या हिवरखेड शाखेवर करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत असून खातेदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.**

माहितीनुसार, PMJJBY साठी ४३६ तर PMSBY साठी २० अशी रक्कम अनेक जनधन खात्यांतून कपात करण्यासाठी खातेदारांना मेसेज पाठविण्यात आले. विशेष म्हणजे, संबंधित ग्राहकांनी कोणताही अर्ज न करता किंवा ऑटो-डेबिटसाठी परवानगी न देता ही प्रक्रिया सुरू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हिवरखेड येथील रहमान खान बिस्मिल्ला खान यांच्या कुटुंबातील चार जनधन खात्यांमध्ये विमा हप्त्यांचे संदेश आल्यानंतर हा प्रकार समोर आला. संबंधितांनी बँकेकडे लेखी अर्ज करून ‘आम्हाला कोणतीही विमा योजना नको असून खात्यातून कपात करू नये,’ अशी स्पष्ट सूचना दिल्यानंतरही कपात झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी डॉ. वाजिद अली आणि अ‍ॅड. धनंजय गावंडे यांनी शाखा व्यवस्थापनाकडे जाब विचारला. त्यावेळी ‘जनधन खात्यांना या योजना पूर्वीपासून लागू आहेत,’ असे शाखा व्यवस्थापकांनी सांगितल्याचा दावा तक्रारकर्त्यांनी केला आहे. मात्र खातेदारांच्या संमतीबाबत विचारणा होताच अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे सांगण्यात आले.

तक्रारकर्त्यांनी बँकेकडे लेखी स्वरूपात काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. खातेदारांच्या परवानगीशिवाय विमा हप्ते कपात करण्यास कोणते शासकीय अथवा RBI चे आदेश आहेत का? असल्यास त्याची प्रत उपलब्ध करून द्यावी, तसेच नसल्यास कोणत्या अधिकाराखाली ही कपात केली जात आहे, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### देशभरातही असा प्रकार?

हा प्रकार केवळ हिवरखेड शाखेपुरता मर्यादित नसून इतर शाखांमध्येही हजारो खातेदारांच्या बाबतीत असे घडले असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ‘झिरो बॅलन्स’ म्हणून उघडलेल्या खात्यांवर विमा योजनांचा आर्थिक बोजा टाकला जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे देशभरात किती खात्यांतून अशा पद्धतीने रक्कम कपात झाली, याची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

### रक्कम परत मिळणार का?

अनधिकृतपणे कपात झालेली रक्कम तात्काळ परत करावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारकर्त्यांनी केली आहे. गरीब आणि मोलमजुरी करणाऱ्या खातेदारांच्या पैशांवर परवानगीशिवाय हात घालणे योग्य नसल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### बँक व्यवस्थापकांचे स्पष्टीकरण

‘जनधन खात्यांना या योजना पूर्वीपासून लागू करण्यात आल्या आहेत. जर कोणत्याही खातेदाराची संमती नसताना कपात झाली असेल, तर त्यांनी लेखी तक्रार करावी. संबंधित तक्रारी वरिष्ठांकडे पाठवून रक्कम परत मिळवून देण्याची प्रक्रिया केली जाईल.’

**मनोज चौहान,** शाखा प्रबंधक एसबीआय बँक, हिवरखेड

**Change In Name**

I have change my name From
YASEER AFRAZ
-To-
MOHD YASIR MOHD KHALIQUE
Address- Behind Anjuman School Kagzipura Balapur, Akola, Maharashtra -444302
Passport No :- L1802836

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ५२ हजार १८४ शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप
## कर्ज वाटपात राष्ट्रीयीकृत, खासगी बँकांची मंद गती

**अमरावती/प्रतिनिधीः-** अग्रणी बँकेमार्फत अमरावती जिल्ह्यासाठी खरीप हंगामात पीक कर्ज वाटपाचे मोठे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, आतापर्यंतच्या वाटपात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आघाडी घेतली आहे. मात्र, ११ राष्ट्रीयीकृत व ७ वाणिज्य बँका कर्जवाटपात पिछाडीवर असल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे.

जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८८ हजार ६०० शेतकऱ्यांना १ हजार ६५० कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्ह्यातील ११ राष्ट्रीयीकृत बँका, ७ वाणिज्य बँका, ग्रामीण बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या माध्यमातून १ एप्रिलपासून पीक कर्ज वाटपाला सुरुवात करण्यात आली. खरीप हंगामाची तयारी




सुरू असताना शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक मदत मिळावी यासाठी बँकांनी प्रक्रिया गतिमान केली आहे. सध्यापर्यंत जिल्ह्यातील ५२ हजार १८४ शेतकऱ्यांना एकूण ७५७ कोटी १२ लाख रुपयांचे पीक कर्ज वितरित करण्यात आले असून, हे एकूण उद्दिष्टाच्या सुमारे ४६ टक्के इतके आहे. यामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांनी ९ हजार ९५३ शेतकऱ्यांना १५० कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरित केले असून, त्यांची कामगिरी सुमारे २० टक्के इतकी आहे. ग्रामीण बँकांनी ५४७ शेतकऱ्यांना सुमारे ७कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पीक कर्ज वाटपात सर्वाधिक आघाडी घेतली आहे. या बँकेमार्फत तब्बल ४१ हजार ६८४ शेतकऱ्यांना ५९५ कोटी ५६ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले असून, उद्दिष्टपूर्तीची टक्केवारी ७६ टक्क्यांवर पोहोचली आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना वेळेत आर्थिक पाठबळ मिळाल्यास बियाणे, खत आणि मशागतीची कामे सुलभ होणार आहेत. आगामी काही दिवसांत उर्वरित शेतकऱ्यांनाही कर्ज वाटप पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीयीकृत व खासगी बँकांकडून आघाडी घेणे गरजेचे आहे.

# जिल्ह्यात साडेपाचशे रिक्त जागांवर लवकरच शिक्षक भरती

## मेळघाटात सर्वाधिक रिक्त जागा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील रिक्त पदांचा प्रश्न सोडवण्यासाठी आता मोठी शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याच्या हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात तब्बल साडेपाचशे शिक्षक पदांसाठी भरती प्रक्रिया लवकरच होण्याची शक्यता असून, यामुळे हजारो भावी शिक्षकांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

शिक्षण विभागाला बिंदू नामावली पूर्ण करून रिक्त जागांसह भरतीची जाहिरात पोर्टलवर अपलोड करण्यासाठी ३१ मेपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागाची प्रशासकीय तयारी आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. जिल्ह्यात सध्या मेळघाट भागात ४०२ तर सपाटी भागात १६६ अशा एकूण ५६८ जागा रिक्त आहेत. याशिवाय ३१ मार्चपर्यंत आणखी १३६ शिक्षक सेवानिवृत्त झाले आहेत. जिल्ह्यातील एकूण रिक्त पदांची संख्या ७०४ वर पोहोचली आहे.



शासनाच्या धोरणानुसार उपलब्ध रिक्त पदांपैकी ८० टक्के पदे भरणे बंधनकारक असल्याने जिल्ह्यात किमान ५६४ शिक्षक पदे भरली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या डी.एड., बी.एड. धारक उमेदवारांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत. विशेष म्हणजे, या भरतीत मेळघाट भागाला सर्वाधिक प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. कारण यापूर्वी ७६ शिक्षक मेळघाटातून सपाटी भागात बदलीने आल्याने दुर्गम भागातील रिक्त पदांचा अनुशेष अधिक वाढला आहे. परिणामी, प्रस्तावित भरतीत

तब्बल ४७८ पदे केवळ मेळघाट भागात भरली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर उर्वरित सुमारे ८६ पदे सपाटी भागासाठी असू शकतात. दुर्गम आणि आदिवासी भागातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता ही दीर्घकाळापासून गंभीर समस्या राहिली आहे. अनेक शाळांमध्ये

एकाच शिक्षकावर अनेक वर्गांचा भार असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर होणारी ही भरती विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठीही महत्त्वाची ठरणार आहे. दरम्यान, आता भरती प्रक्रिया प्रत्यक्षात कधी सुरू होणार, जाहिरात केव्हा प्रसिद्ध होणार आणि नियुक्त्या कधी होणार, याकडे भावी शिक्षकांसह शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करा
## महावितरणचे संचालक सचिन तालेवार यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** उन्हाळ्याच्या तीव्र पार्श्वभूमीवर ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणचे संचालक (संचलन/प्रकल्प) सचिन तालेवार यांनी नागपूर येथे स्पष्ट आणि कडक निर्देश दिले. काटोल मार्गावरील विद्युत भवन येथे आयोजित नागपूर परिमंडळाच्या परिपूर्ण आढावा बैठकीत ते बोलत होते. ऐन उन्हाळ्यात तांत्रिक बिघाडामुळे होणारे वीज खंडित होण्याचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी सर्वांनी पूर्ण कार्यक्षमतेने काम करावे आणि कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने आपल्या कामात हयगय करू नये, अशी तंबीच त्यांनी यावेळी दिली. पालकमंत्री नागपूर यांनी दिनांक ४ मे च्या बैठकीत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपने पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

या महत्त्वपूर्ण बैठकीत बोलताना तालेवार यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही एकाच फीडरवर वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार आता अजिबात सहन केले जाणार नाहीत. वीज पुरवठा विस्कळीत होऊ नये म्हणून यापुढे सर्व प्रकारची देखभाल व दुरुस्तीची कामे अत्यंत काटेकोर आणि पूर्व नियोजनासह करण्याचे आदेश त्यांनी दिले. सध्या उन्हाळ्यामुळे यंत्रणेवर विजेचा वाढता ताण पाहता, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले आहे. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मानव संसाधन विभागामार्फत तात्काळ कारवाई सुरू करण्यात आली असून, पुढील एक महिना कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची आकस्मित कारणाशिवाय रजा मंजूर देण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आले.ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातील विजेच्या पायाभूत सुविधांची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही संचालक तालेवार यांनी दिले.

वीज पुरवठा सक्षम करण्यासोबतच, मे महिन्यातील वीज बिलांची थकीत रक्कम कमी करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचना देण्यात आली. वीज बिल वसुलीसाठी कंपनीने एक विशेष आणि सकारात्मक मोहीम आखली आहे. महावितरणच्या या ग्राहककेंद्री प्रयत्नांना नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद देऊन थकीत देयके भरून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# महसूल विभागाने जबाबदारी घेऊन कार्य करावे
## -अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे -महसूल विभागाच्या विविध कार्यालयांना भेटी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महसूल विभाग हा समाजासाठी कार्य करणारा विभाग आहे. त्यामुळे विविध परिस्थितीमध्ये अनपेक्षित जबाबदाऱ्या या विभागावर येतात. मात्र जनतेसाठी कार्य करावयाचे असल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारी घेऊन कार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात खारगे यांनी महसूलच्या अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आदी अधिकारी उपस्थित होते.

खारगे यांनी महसूलमधील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस दौरा करावा. यामुळे प्रशासनावर पकड मजबूत करण्यास मदत होणार आहे. दौरा करताना विविध विकासकामांची तपासणी केल्यास तथ्य जाणून घेण्यास मदत मिळणार आहे. त्यासोबतच जनतेशी भेटावे. त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. निवेदनावर केलेली कारवाई कळवावी. यामुळे नागरिकांच्या अडचणी लक्षात येतात. हे सर्व करीत असताना अधिनस्त कर्मचाऱ्यांशी संवाद साधून समस्याही जाणून घ्याव्यात. प्रशासनाने नागरिकांच्या जवळ



जाण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी. त्यांच्या तक्रारींचा मागोवा घ्यावा. शासनने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार १२ दुरूस्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्ह्याची संक्षिप्त माहिती दिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रामुख्याने जिल्ह्यात लोकसहभागातून निर्माण करण्यात येणाऱ्या पांदन रस्त्याची माहिती दिली. तसेच रहिवासी जमिन नियमानुकूल करणे, पट्टेवाटप करणे, मिळकत पत्रिका वाटप करणे याबाबत माहिती दिली.

दरम्यान खारगे यांनी सकाळी अमरावती उपविभागीय अधिकारी कार्यालय, अमरावती तहसील कार्यालय, सहनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, वडाळी मंडळ अधिकारी कार्यालयाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली. यावेळी त्यांनी कार्यरत कर्मचारी यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली.

# डफरिन हॉस्पिटलमध्ये सामाजिक उपक्रम
## -आरती वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-** आरती राजेश वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे मित्रमंडळाने सामाजिक दायित्वाची जाणीव दाखवत एक उदात्त उपक्रम हाती घेतला आहे. दिनांक २५ मे २०२६ रोजी सोमवारी सकाळी १० वाजता जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरिन हॉस्पिटल) येथे प्रसूता माता व नवजात बाळांसाठी अत्यावश्यक सामग्रीचे वाटप करण्यात येणार आहे.या कार्यक्रमात गर्भवती माता, प्रसूता महिला आणि नवजात शिशूंना बाळांची काळजी घेण्यासाठी आवश्यक वस्तू जसे की बाळांचे कपडे, डायपर, पावडर, साबण, तेल, पोषक आहार संबंधित सामग्री, आरोग्यकिट इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. हा उपक्रम आमदार राजेश वानखडे यांच्या सहचारिणी आरती वानखडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला असून, त्यांच्या मातृत्वाच्या भावनेला साजेसा हा कार्यक्रम मानला जात आहे.



सर्व स्नेही, कार्यकर्ते, नागरिक व समाजातील मान्यवर व्यक्तींनी सकाळी १०.०० वाजता डफरिन हॉस्पिटल येथे उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे,' असे आवाहन मित्रमंडळाने केले आहे.

आरती राजेश वानखडे या सामाजिक कार्यात सदैव सक्रिय असतात. महिलांच्या आरोग्य, बालकल्याण आणि गरजू घटकांसाठी विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असतो. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हॉस्पिटलमध्ये प्रसूता मातांना मदत करण्याचा हा उपक्रम त्यांच्या सामाजिक जाणिवेचे प्रतिबिंब दर्शवतो. हा उपक्रम केवळ वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता समाजातील दुर्बल घटकांना मदत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यास निश्चितच मदत होणार असून सुदृढ माता सुदृढ बाळ या शासनाच्या धोरणाकरिता निश्चितच मदत होणार आहे.या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व स्तरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, महिला संघटना व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती आयोजकांनी केली आहे. 'मातेच्या जन्मदिनी मातांना मदत' हा संदेश घेऊन हा उपक्रम राबवला जात आहे.

# दहावी व बारावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी** : तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील तिजारे यांच्या माध्यमातून दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी व बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. निमखेड बाजार येथील श्री जयपुरी महाराज मंदिर परिसरात आयोजित या कार्यक्रमात तब्बल १०० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले.



यावेळी तन्वी गिर्हे वानखडे हिने बी.ई. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी शिक्षणामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सर्व शाखांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिला डॉ. पद्मश्री व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले असून, तिचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच बारावी सीबीएसई परीक्षेत ९७ टक्के गुण मिळविणाऱ्या शिवम प्रविण काळपांडे, दहावी सीबीएसई परीक्षेत ९१ टक्के गुण प्राप्त करणारा सार्थक अतुल पवार, तसेच ८७ टक्के गुण मिळविणारी संस्कृती राहुल रौंदळे यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. निमखेड बाजार येथील प्रेम राहुल गवई याची नवोदय विद्यालयासाठी निवड झाल्याबद्दल त्याचाही सत्कार करण्यात आला.

याशिवाय १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त निमखेड बाजार येथे आयोजित भव्य रॅलीमध्ये गावातील मुलींनी सादर केलेल्या लेझीम नृत्याचे विशेष कौतुक करण्यात आले. सहभागी मुलींना सन्मानपत्र, 'जिजाऊची शिकवण' हे पुस्तक व विविध बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सभापती विलासराव पवार, डॉ. सुरेश रौंदळे, सुभाषराव काट्यारामल, किशोर पवार, गजानन ताठे, ताराचंद घोडेराव, माधव पवार, मनोहर बोरकर, मंगेश काळपांडे, संजय ताठे, गोपाल गिर्हे, महेश ताठे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांनी, पालकांनी तसेच गावकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि शिक्षणाची प्रेरणा निर्माण व्हावी, या उद्देशाने विजय तिजारे मित्रपरिवारामार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# मेळघाटच्या हरिसाल वनपरीक्षेत्रात अग्नीतांडव
## परतवाडा-धारणी मार्गालगत जंगलाची राखरांगोळी

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील गुगामल वन्यजीव विभागाच्या हरीसाल वनपरीक्षेत्रात भीषण वनवा लागल्याने मोठ्या प्रमाणावर जंगल जळून खाक झाल्याची घटना समोर आली आहे. परतवाडा ते धारणी या मुख्य मार्गालगत असलेल्या जंगल परिसरात आग लागल्याने संपूर्ण परिसर धुराने व्यापला होता. उन्हाळ्याच्या तीव्र तापमानात लागलेल्या या आगीमुळे वनसंपदा, लहान वन्यजीव व पर्यावरणाचे मोठे नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, मेळघाट भ्रमणावर असलेले खोज संस्थेचे संस्थापक ॲड. बंड्या साने यांनी घटनास्थळाचे व्हिडीओ व माहिती सोशल मीडियावर व्हायरल केली. संबंधित पोस्टमध्ये त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देऊनही घटनास्थळी अधिकारी व कर्मचारी आग विझविण्यासाठी वेळेवर पोहोचले नसल्याचा आरोप केला आहे. सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर स्थानिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, परतवाडा-धारणी मार्गालगत अनेक ठिकाणी जंगलात आग लागल्याचे दिसून आले. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आग झपाट्याने पसरत गेली. त्यामुळे काही काळ वाहनचालकांनाही धुरामुळे अडचणींचा सामना करावा लागला. वनविभागाकडून आग नियंत्रणासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी, वनवा नेमका कशामुळे लागला याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# बकरी ईदनिमित्त अमरावती महानगरपालिकेची आढावा बैठक
## -मोकाट जनावरांचा प्रश्न, महानगरपालिकेच्या विशेष पथकाची नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधी: -** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन, पाणीपुरवठा, जनावरांच्या वाहतुकीवर नियंत्रण तसेच गौवंश संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यासंदर्भात अमरावती महानगरपालिकेत गुरुवार दिनांक २१ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजता महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, पशुसंवर्धन उपायुक्त संजय कावरे, सहाय्यक आयुक्त डॉ.पुरुषोत्तम सोळंके, उपायुक्त नरेंद्र वानखडे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, राजापेठ वाहतुक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रविण वांगे, खोलापुरी गेट चे पोलीस निरीक्षक दिलीप वडगावकर, नागपुरी गेट चे पोलीस निरीक्षक हनुमंत उरलागोंडावार, गाडगेनगर चे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सिटी कोतवाली चे पोलीस निरीक्षक कोटनाके, राजापेठ चे पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, बडनेरा चे पोलीस निरीक्षक सुनिल चव्हाण, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, विविध विभागांचे अधिकारी, स्वच्छता विभागाचे प्रतिनिधी, पशुवैद्यकीय विभागाचे अधिकारी, संबंधित पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच मुस्लीम बांधव उपस्थित होते.



बैठकीदरम्यान बकरी ईद सणाच्या कालावधीत शहरात कोणतीही गैरसोय होऊ नये, नागरिकांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध व्हाव्यात तसेच स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने योग्य उपाययोजना करण्यात याव्यात यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी दिनांक २७ मे २०२६ ते २९ मे २०२६ या कालावधीत विविध संवेदनशील व गर्दीच्या ठिकाणी स्वच्छता निरीक्षकांची विशेष नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित ठिकाणी स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी, कचरा संकलनासाठी कंटेनर आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले.

शहरातील स्वच्छता व्यवस्थापन प्रभावीपणे राबविण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वच्छता निरीक्षकांची नावे व त्यांचे मोबाईल क्रमांक संबंधित पोलीस स्टेशनना उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यामुळे आपत्कालीन परिस्थितीत प्रशासन व पोलीस विभागामध्ये तातडीने समन्वय साधता येणार असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

बकरी ईद निमित्त कुरबानीसाठी जनावरांची वाहतूक करताना वाहनांमधून रक्त, मांस अथवा जनावरांचे अवशेष रस्त्यावर पडून अस्वच्छता निर्माण होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना स्वच्छता निरीक्षकांना देण्यात आल्या. अशा प्रकारामुळे शहरातील स्वच्छतेवर परिणाम होऊ नये तसेच नागरिकांच्या आरोग्यास कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी संबंधित विभागांनी सतर्क राहण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

बैठकीत गौवंश संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीवरही विशेष चर्चा करण्यात आली. कायद्यांतर्गत गाय, वासरू व बैल यांची कत्तल होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले. कोणत्याही प्रकारचा संशयास्पद प्रकार अथवा कायद्याचे उल्लंघन निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित पोलीस स्टेशन बडनेरा, नागपुरी गेट व खोलापुरी गेट यांच्याशी संपर्क साधण्याचे सांगण्यात आले. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन बोंद्रे (मो. ७०३०९२२९०२), पशुधन निरीक्षक निलेश सोळंके (मो. ७०३०९४०२२७) आणि पशुधन निरीक्षक गुणसागर गवई (मो. ७०३०९२२९५८) यांच्याशी तातडीने संपर्क साधून आवश्यक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न लक्षात घेता, अशा जनावरांना पकडण्यासाठी महानगरपालिकेच्या विशेष पथकाची नियुक्ती करण्यात येणार असून या पथकाला संबंधित पोलीस स्टेशनमार्फत पोलीस संरक्षण उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यामुळे कारवाई अधिक प्रभावीपणे राबविता येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

तसेच मनपा क्षेत्रातील मुस्लिम बांधव, धार्मिक प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांशी समन्वय साधून बकरी ईद सण शांततेत, स्वच्छतेत आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यासाठी आवश्यक सूचना व सहकार्य घेण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सणाच्या काळात प्रशासन, पोलीस विभाग आणि नागरिक यांच्यात समन्वय राखून शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# बॅनरवरून काँग्रेसमध्येच ‘पोस्टरवॉर’

■ भर चौकात शहराध्यक्ष विरुद्ध नगराध्यक्ष;आचारसंहितेवरून रंगली ‘तू तू-मै मै’

■ फक्त आमचेच बोर्ड का काढले? काँग्रेस शहराध्यक्षांचा संताप

■ नगरपालिकेच्या कारवाईवरून राजकीय धुरळा; मध्यस्थीने टळला

**वर्धा/ रवींद्र लाखे**

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आचारसंहिता लागू असताना शहरातील रस्त्यांवर झळकणारे वाढदिवसाचे बॅनर आणि बोर्ड आता राजकीय वादाचे कारण ठरू लागले आहेत. वर्ध्यात तर एका वाढदिवसाच्या बोर्डावरून काँग्रेसमध्येच भर चौकात ‘तू तू-मै मै’ झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. शहर काँग्रेस अध्यक्ष आणि नगराध्यक्ष यांच्यात झालेल्या शाब्दिक चकमकीमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार आचारसंहितेच्या काळात सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले राजकीय स्वरूपाचे फलक, बॅनर आणि बोर्ड हटविण्याची मोहीम नगरपालिका प्रशासनाकडून राबविण्यात येत आहे. त्यानुसार नगरपालिका कर्मचारी शहरातील विविध चौक आणि रस्त्यांवरील बॅनर हटवत होते. याचवेळी एका काँग्रेस नेत्याच्या वाढदिवसाचे बोर्ड हटविण्यात आले आणि त्यावरून वादाची ठिणगी पडली.

घटनास्थळी पोहोचलेल्या शहर काँग्रेस अध्यक्षांनी संतप्त होत नगराध्यक्षांनाच जाब विचारल्याचे सांगितले जाते. फक्त आमच्याच नेत्याचे बोर्ड का काढले जात आहेत? समोर सत्ताधारी पक्षाचे बोर्ड अजूनही लटकत आहेत, ते का हटवले नाहीत, असा प्रश्न त्यांनी भर चौकातच उपस्थित केला. यानंतर दोन्ही बाजूंमध्ये जोरदार शाब्दिक खडाजंगी उडाली. काही काळ परिसरात बघ्यांची गर्दीही जमली होती. मात्र प्रत्यक्षात नगराध्यक्षांनी कोणतेही स्वतंत्र आदेश दिले नसून, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसारच नगरपालिका कर्मचारी कारवाई करीत



असल्याचे समोर आले. तरीही गैरसमज आणि राजकीय संशयातून हा वाद चिघळल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

वाद वाढत असल्याचे पाहून काही ज्येष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मध्यस्थी करत परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. अखेर दोन्ही बाजूंना समजावून सांगत प्रकरण निमुळते करण्यात आले. अन्यथा छोट्याशा बोर्डाच्या मुद्द्यावरून काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी उघड्यावर आली असती, अशी चर्चा राजकीय गल्लीबोळात सुरू आहे. दरम्यान, आचारसंहितेच्या काळात सर्वच पक्षांच्या फलकांवर समान कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडूनही होत आहे. कायद्यापुढे सर्व समान असतील, तरच प्रशासनावरील विश्वास टिकेल, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. मात्र वाढदिवसाच्या बॅनरने वर्ध्यात काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाला चांगलेच खतपाणी घातल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

विशेष म्हणजे काही वेळानंतर नगराध्यक्ष तेथून निघून गेल्यानंतर कार्यकर्त्यांच्या गटात कुजबूज सुरू झाली.

पालकमंत्र्यांच्या जवळीकतेमुळे स्वतःची खुर्ची वाचवण्यासाठीच हे कृत्य करण्यात आले असावे, अशी बोचरी टीकाही काही कार्यकर्त्यांकडून दबक्या आवाजात करण्यात आली. त्यामुळे या संपूर्ण प्रकाराला आता केवळ बॅनर वादाचे स्वरूप न राहता काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीची किनार मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

# पहाटेची डुलकी ठरतेय मृत्यूची झोप

## रात्री २ ते पहाटे ५ महामार्गाची वाहतूक बंद करा

## महामार्ग झाले मृत्यूचे कॉरिडॉर; सरकार अजून किती बळी घेणार?

**वर्धा/ जनमाध्यम**

राज्यातील महामार्ग आता प्रवासाचे नव्हे, तर मृत्यूचे रस्ते बनत चालले आहेत. विशेषतः मध्यरात्रीनंतर पहाटेपर्यंत होणाऱ्या भीषण अपघातांनी नागरिकांच्या मनात भीतीचे सावट पसरले असून, रात्री २ ते पहाटे ५ वाजेपर्यंत सर्वसामान्य वाहनांची वाहतूक बंद करा, अशी संतप्त मागणी आता जोर धरू लागली आहे. झोपेच्या डुलकीमुळे होणाऱ्या अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसल्याने नागरिकांनी थेट सरकारलाच धारेवर धरले आहे. अलीकडेच वर्धा परिसरात घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण जिल्हा हादरला. देवदर्शन करून नागपूरकडे परतणारे प्रवासी घरापासून अवघ्या ८० किलोमीटर अंतरावर आले होते. मात्र, चालकाला पहाटेच्या वेळी झोपेची डुलकी लागली आणि भरधाव वाहन थेट उभ्या ट्रकवर जाऊन आदळले. एका क्षणात आनंदाचा प्रवास शोकांतिका ठरला. या अपघातात



दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला, तर आठ जण गंभीर जखमी झाले.ही घटना एकटी नाही. राज्यभरात दररोज अशाच प्रकारे निष्पाप जीव रस्त्यावर चिरडले जात आहेत. पहाटेच्या काळात शरीराचा थकवा, डोळ्यावर येणारी झोप आणि वाहनांचा वेग यांचे घातक समीकरण तयार होत आहे. घर गाठायची घाई जीवावर बेततेय, अशी संतप्त प्रतिक्रिया आता सर्वसामान्य नागरिक देत आहेत. विशेष म्हणजे, अनेक प्रवासी रात्रीचा प्रवास करून ‘रातराणी’चे पैसे वाचवण्याच्या नादात चालकांवर दबाव टाकतात. चालक सलग अनेक तास वाहन चालवत असतो, पण विश्रांती न घेता प्रवास सुरू ठेवतो. परिणामी, पहाटेची एक डुलकी संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त करून जाते. वाहन चालकही सुधारत नाहीत आणि जनता देखील हट्ट सोडत नाही, अशी संतप्त भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे.केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते अपघात रोखण्यासाठी सातत्याने विविध उपाययोजना जाहीर करीत असले, तरी प्रत्यक्षात मृत्यूचे आकडे कमी होताना दिसत नाहीत. त्यामुळे आता नागरिकांनी थेट ठोस निर्णयाची मागणी केली आहे. किमान काही महिन्यांसाठी तरी रात्री २ ते पहाटे ५ वाजेपर्यंत महामार्ग बंद करून पाहा. ही वेळ माणसाच्या झोपेची आहे. रस्त्यालाही आराम द्या, असा आर्त स्वर उमटत आहे.

महामार्गांवर अधिक विश्रांती केंद्रे,चालकांसाठी सक्तीची विश्रांती, वेग नियंत्रण आणि जनजागृती मोहिमा यांची तातडीने अंमलबजावणी झाली नाही, तर पहाटेचा प्रत्येक प्रवास हा मृत्यूला निमंत्रण देणारा ठरेल, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.

## संक्षिप्त

### गळफास घेऊन व्यक्तीची आत्महत्या

**आर्वी-** शहरातील तायडे लेआउट परिसरात एका व्यक्तीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. महादेव नागोराव तुमडे (५८) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महादेव यांना दारूचे व्यसन होते. त्यांनी घराचे दार आतून बंद करून सिलिंग फॅनला कापडी दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. काही वेळाने कुटुंबीयांनी दार उघडण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद न मिळाल्याने संशय निर्माण झाला. त्यानंतर परिसरातील नागरिकांच्या मदतीने दार उघडले असता महादेव यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### आजाराला कंटाळून महिलेची आत्महत्या

**आष्टी (शहीद)-** दीर्घकालीन आजारपणाला कंटाळून एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दलप्तपूर गावात उघडकीस आली. रूपाली भास्कर मात्रे (३८) असे मृत महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रूपाली या काही दिवसांपासून आजारी होत्या. सततच्या आजारपणामुळे त्या मानसिक तणावात असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, त्यांनी घरातील लाकडी मयालीला दोरी बांधून गळफास घेत आत्महत्या केली. ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून आजारपणामुळे वाढणाऱ्या मानसिक तणावाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### चाकू हल्ल्यात तरुण जखमी

**हिंगणघाट-** किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना कारंजा चौकातील दुर्गामाता मंदिरासमोर घडली. रामकुमार दीपकसिंग छाडी (३३) असे जखमी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामकुमार यांच्याजवळ एक श्वानाचे पिल्लू आले होते. त्यांनी ते पायाने बाजूला केले. याच कारणावरून नितीन झाडे याने संताप व्यक्त करत ‘माझ्या खानाला लाथ का मारली, असे म्हणत शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर आरोपीने चाकू काढून रामकुमार यांच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात रामकुमार जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

### तांब्याचा हंडा लंपास

**वडनेर-** घराबाहेर ठेवलेला तांब्याचा हंडा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बोपापूर गावात घडली. योगेश प्रकाश दौलतकर यांनी याबाबत पोलिसांत तक्रार दिली आहे. माहितीनुसार, योगेश यांनी तांब्याच्या हंड्यात पाणी भरून आणले होते.

# काम करा नाहीतर उपाशी मरा’; मजुरांची विदारक अवस्था

## ४७ अंशांच्या जळत्या उन्हात मजुरांची होरपळ; ‘कामगारांचा वाली’ कोण?

## जीव मुठीत धरून मजुरी; प्रशासन मात्र थंडगार कार्यालयात!

**वर्धा/ जनमाध्यम**

शहरासह जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाने अक्षरशः कहर केला आहे. तब्बल ४७ डिग्री अंशांपर्यंत पोहोचलेल्या उष्णतेमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाले असताना दुसरीकडे मजूर कामगार मात्र जीव धोक्यात घालून उन्हात राबताना दिसत आहेत. अंगावर आग ओकणारे ऊन, डांबरी रस्त्यांवरून निघणाऱ्या उष्णतेच्या झळा आणि डोक्यावर सावलीचा अभाव अशा परिस्थितीतही मजूर पोटासाठी काम करत आहेत. मात्र त्यांच्या आरोग्याची, सुरक्षिततेची आणि विश्रांतीची कोणतीही व्यवस्था नसल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

बांधकामे, रस्त्यांची कामे, गटार दुरुस्ती, वीटभट्ट्या आणि विविध खासगी प्रकल्पांवर काम करणारे मजूर सकाळपासून दुपारच्या कडक उन्हापर्यंत काम करताना दिसतात. अनेक ठिकाणी पिण्याच्या थंड पाण्याची सुविधा नाही, तर कुठे सावलीसाठी शेडदेखील उपलब्ध नसल्याने कामगारांची अक्षरशः होरपळ होत आहे. काही मजूरांना चक्कर येणे, उलट्या होणे, अंगातून घामाच्या धारा वाहणे अशा त्रासांनाही सामोरे जावे लागत आहे.

विशेष म्हणजे हवामान विभागाकडून उष्णतेचा इशारा देण्यात आलेला असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली दिसत नाही. कामगार विभाग, महानगरपालिका तसेच संबंधित यंत्रणा फक्त कागदोपत्री सूचना देत असल्याचा आरोप होत आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे शाळांच्या वेळा बदलल्या जातात, नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले जाते; मग मजूर कामगारांच्या जीवाची किंमत नाही का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.दुपारच्या वेळेत काम बंद ठेवण्याचे आदेश, प्रत्येक कामाच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था, प्राथमिक उपचार सुविधा आणि विश्रांतीसाठी शेड उभारणे आवश्यक असताना संबंधित विभाग मात्र डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे. काम नाही तर जेवण नाही या विवंचनेत अडकलेला मजूर वर्ग जीव मुठीत धरून काम करत आहे.एका बाजूला वातानुकूलित कार्यालयांमध्ये बसून बैठका घेणारे अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला उन्हात भाजून निघणारा मजूर ही दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. उष्माघातामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



### उन्हाच्या तडाख्याने मजुराचा मृत्यू

**अल्लीपूर-** वाढत्या तापमानाचा फटका ग्रामीण भागातील मजुरांना बसत असून सोनेगाव (स्टेशन) परिसरातील शेतशिवारात काम करताना एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. पंडलिक तानबाजी मांदाडे (४४) असे मृतकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पंडलिक हे शेतात उन्हात काम करीत होते. दुपारच्या सुमारास अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. परिसरातील नागरिकांनी तातडीने त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढला असून नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. पोलिसांनी घटनेची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

# ‘कारला’ नावाला डावलण्याचा आरोप

## गटग्रामपंचायत कारला-पिपरी (मेघे) असा उल्लेख करण्याची नागरिकांची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

शासकीय नोंदीमध्ये गटग्रामपंचायत कारला-पिपरी (मेघे) अशी अधिकृत नोंद असताना ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांमध्ये आणि माहिती फलकांवर केवळ ‘ग्रामपंचायत पिपरी (मेघे)’ असा उल्लेख केला जात असल्याने कारला गावातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सर्व शासकीय कामकाजात अधिकृत नावाचा वापर करावा, अशी मागणी कारला येथील नीलेश वसंतराव नेहारे यांनी सरपंच व ग्रामसेवकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनानुसार, सदर ग्रामपंचायत ही केवळ पिपरी गावापुरती मर्यादित नसून कारला आणि पिपरी (मेघे) या दोन्ही गावांची गटग्रामपंचायत आहे.मात्र विविध योजनांच्या फलकांवर, शासकीय कागदपत्रांवर आणि कार्यालयीन नोंदींमध्ये ‘कारला’ या नावाचा उल्लेख टाळला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे कारला गावातील नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून ग्रामपंचायतीच्या अधिकृत नावाचा सर्वत्र वापर करावा,तसेच जुन्या फलकांमध्ये तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वरिष्ठ स्तरावर दाद मागण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

## आज ‘रेड अलर्ट’; दुपारी घराबाहेर पडू नका, प्रशासनाचा इशारा

**वर्धा/ जनमाध्यम**

सूर्याच्या प्रखर तडाख्याने वर्धा जिल्हा अक्षरशः भाजून निघत असून तापमानाने यंदाचे सर्व विक्रम मोडले आहेत. भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यात आज २५ मेपर्यंत ‘रेड अलर्ट’ जारी केला असून नागरिकांना अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यात कमाल तापमान तब्बल ४७.०१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने रस्ते ओस पडले असून दुपारच्या वेळेत जनजीवन ठप्प झाल्याचे चित्र आहे. गेल्या आठवडाभरापासून उष्णतेची तीव्र लाट कायम असून सकाळपासूनच अंगाची लाही लाही होत आहे. रविवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत उष्ण वाऱ्यांचा जोर होता. रात्रीच्या वेळीदेखील तापलेल्या वाऱ्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. हवामान विभागाने अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असा स्पष्ट इशारा दिला आहे.।शासनाने नागरिकांना दुपारी १२ ते ३.३० या वेळेत उन्हात जाणे टाळण्याचा सल्ला दिला आहे.

लहान मुले व पाळीव प्राणी बंद वाहनांमध्ये सोडू नयेत, गडद रंगाचे व जाड कपडे परिधान करू नयेत तसेच कडक उन्हात जड श्रमाची कामे टाळावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गोव्यात विरूळच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

**विरूळ आकाजी/ जनमाध्यम**

ग्रामीण भागातील खेळाडूंमध्येही मोठी क्षमता असते, हे विरूळ येथील तरुणांनी पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. गोवा येथे १८ ते २० मेदरम्यान आयोजित आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाकडून खेळणाऱ्या विरूळच्या सहा खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत संघाला प्रथम क्रमांक मिळवून दिला. अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने मध्यप्रदेश संघावर मात करत विजेतेपद पटकावले.

गोवा येथील ज्युली स्टेडियमवर पार पडलेल्या या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील संघ सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांत महाराष्ट्र संघाने सातत्यपूर्ण खेळ करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात खेळाडूंनी अचूक चढाया आणि भक्कम बचावाच्या जोरावर मध्यप्रदेश संघाचा पराभव केला. या स्पर्धेत विरूळ येथील सहा खेळाडूंसह इतर पाच खेळाडूंनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व केले. ग्रामीण भागातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी केल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे. गावात परतल्यानंतर विजेत्या खेळाडूंचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.संघाचे नेतृत्व रोहित भलावी यांनी केले, तर प्रशिक्षक म्हणून दिगांबर देशमुख यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रशिक्षणामुळे संघाला आत्मविश्वास मिळाल्याचे खेळाडूंनी सांगितले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंमध्ये रोहित भलावी, क्रुणाल कावटकर, अमित भुते, नैतिक आतराम, खुशाल पंधराम, नितेश कोकड्डे, ज्ञानेश खाडे, देवांशु घोडाम, दर्शन चाफले, मानव माजरखे आणि भावेश सेमोनिया यांचा समावेश होता. या यशामुळे परिसरातील युवकांमध्ये कबड्डीबद्दल नव्याने उत्साह निर्माण झाला आहे.

# ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करा; हयगय खपवून घेतली जाणार नाही

## संचालक सचिन तालेवार यांचे स्पष्ट निर्देश

**नागपूर/ जनमाध्यम**

उन्हाळ्याच्या तीव्र पार्श्वभूमीवर ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणचे संचालक (संचलन/प्रकल्प) सचिन तालेवार यांनी आज नागपूर येथे स्पष्ट आणि कडक निर्देश दिले. काटोल मार्गावरील विद्युत भवन येथे आयोजित नागपूर परिमंडळाच्या परिपूर्ण आढावा बैठकीत ते बोलत होते. ऐन उन्हाळ्यात तांत्रिक बिघाडामुळे होणारे वीज खंडित होण्याचे प्रमाण (Outages) शून्यावर आणण्यासाठी सर्वांनी पूर्ण कार्यक्षमतेने काम करावे आणि कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा अधिकाऱ्याने आपल्या कामात हयगय करू नये, अशी तंबीच त्यांनी यावेळी दिली. माननीय पालकमंत्री नागपूर यांनी दिनांक ४ मे च्या बैठकीत दिलेल्या सूचनांचे काटेकोर पने पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

या महत्त्वपूर्ण बैठकीत बोलताना तालेवार यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही एकाच फीडरवर वारंवार वीज खंडित होण्याचे प्रकार आता अजिबात सहन केले जाणार नाहीत. वीज पुरवठा विस्कळीत होऊ नये म्हणून यापुढे सर्व प्रकारची देखभाल व दुरुस्तीची कामे अत्यंत काटेकोर आणि पूर्व नियोजनासह (Proper Planning) करण्याचे आदेश त्यांनी दिले. सध्या उन्हाळ्यामुळे यंत्रणेवर विजेचा वाढता ताण पाहता, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयात (HQ) उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात आले आहे. या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मानव संसाधन (HR) विभागामार्फत तात्काळ कारवाई सुरू करण्यात आली असून, पुढील एक महिना कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची आकस्मित कारणाशिवाय रजा मंजूर देण्यात येऊ नये असे निर्देश देण्यात आले.

ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी शहरी आणि ग्रामीण भागातील विजेच्या पायाभूत सुविधांची (Infra Works) कामे गतीने पूर्ण करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याचे निर्देशही संचालक तालेवार यांनी दिले. वीज पुरवठा सक्षम करण्यासोबतच, मे महिन्यातील वीज बिलांची थकीत रक्कम (Balance Arrears) कमी करण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचना देण्यात आली. वीज बिल वसुलीसाठी कंपनीने एक विशेष आणि सकारात्मक मोहीम आखली आहे. महावितरणच्या या ग्राहककेंद्री प्रयत्नांना नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद देऊन थकीत देयके भरून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.तसेच महावितरण तर्फे ग्राहकांना सर्व सुविधा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी ऑनलाईन आलेले अर्ज विहित कालमर्यादेत निकाली काढण्याचे आदेशित करण्यात आले. या आढावा बैठकीला नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता अमित परांजपे, मंगेश वैद्य , दीपाली माडेलवार यांच्यासह परिमंडळातील सर्व कार्यकारी अभियंते आणि नागपूर जिल्ह्यातील उपविभागीय अभियंते प्रामुख्याने उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १७७**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### क्रांतिकारी शहीद कर्तारसिंग सराभा यांना अभिवादन

**अमरावती-**नवजागरण मनिषी व क्रांतिकारी स्मरण समिती, अमरावती यांच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारी शहीद कर्तारसिंग सराभा यांच्या जयंतीनिमित्त माल्यार्पण व पुष्पार्पण कार्यक्रम अत्यंत मर्यादापूर्वक व प्रेरणादायी वातावरणात झाला.यावेळी वक्त्यांनी आपल्या मनोगतातून कर्तारसिंग सराभा यांच्या अल्पवयात केलेल्या देशसेवेचा, त्यागाचा व बलिदानाचा गौरवपूर्ण इतिहास उपस्थितांसमोर मांडला. कार्यक्रमादरम्यान 'इंकलाब जिंदाबाद', 'महान क्रांतिकारी कर्तारसिंग सराभा जिंदाबाद', 'कर्तारसिंग सराभा के विचारों को गांव-शहर में फैला दो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. तसेच क्रांतिकारकांचे विचार समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी सामाजिक, वैचारिक व जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.या प्रसंगी समितीचे सन्माननीय गणेश मुंधरे, सतीश ढोरे, प्रियंका मुंधरे, निलू दास, किशोर पेंढारकर, विक्रांत सातारकर, माही वानखडे, ओम चेडे, स्वरा साबे, वीरा हनवते, मसिरा शेरखान, भावेश चाफले, कृष्णाई ठाकरे, हिमांशू चरपे, श्रेयांश कोराम, लोकेश डहाके, ईश्वरी डगवार, धवल तेली, श्रेयांश्री डहाके, कौतुक चोरे, ईश्वरी हटवार, प्रिन्स बिजवे, कार्तिक तेली, आराध्या मंडाले, गौरी बिलगये, अनघा बिजवे, नित्या आखरे, त्रीउषा लवाडे, गणेश आखरे व निधी कोराम उपस्थित होते.कार्यक्रम शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण व क्रांतिकारी वातावरणात पार पडला.

### आचारसंहितेचे उल्लंघन करून ई-निविदेच्या मुदतीत वाढ?

**चांदूर रेल्वे-**आचारसंहितेच्या काळात नगर परिषद प्रशासनाने केळ्यांसाठी ई-निविदा काढली आहे. मुदतवाढ दिल्याचा आरोप करत जिल्हाधिकाऱ्यांनी काँग्रेसचे नगरसेवक किंवा मुख्य अधिकारी, शहर अभियंता, कनिष्ठ अभियंता आणि संगणक अभियंता यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.नगर परिषदेने नागरी सेवा आणि सुविधा योजनेअंतर्गत विविध विकास कामांसाठी १२ तारखेला ई-निविदा सूचना प्रसिद्ध केली होती. केवळ, संबंधित निविदा 'व्यवस्थापन' करण्यासाठी प्रशासनाने तांत्रिक अडचणींमुळे निविदा मुदतवाढ दिल्याचा आरोप आहे. वास्तविक पाहता, साइन साइटवर कोणताही तांत्रिक अडथळा आल्याचा दावा झाला यांनी वंशवादी मुद्द्यासमोर केला आहे. किंवा या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेस गट नेते मोहम्मद अनीस शेख गफूर यांनी केली. नगरसेविका कल्पना राजू लांजेवार, अतिरिक्त कीर्ती यांची भूमिका राहुल इमले, पूनम प्रफुल्ल कोकाटे आणि प्रियांका सतपाल वर्थे यांनी साकारली आहे.

### जावरा ते वरुडा रस्त्याच्या दुरुस्तीसाठी दहा दिवसांचा अल्टिमेटम

**तिवसा-**तालुक्यातील जावरा फाटा ते वरुडा मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे. तालुका काँग्रेस कमिटीने आक्रमक होत जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंत्यांना निवेदनातून दहा दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. विशेष म्हणजे, १० ऑगस्ट २०२५ रोजी याच समस्येबाबत निवेदन देण्यात आले होते. त्यावेळी पावसाळा संपताच रस्त्याचे काम करण्यात येणार असल्याचे आश्वासन बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आले होते. रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाल्याने येथील आबालवृद्धांसह शालेय विद्यार्थ्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. यावेळी वैभव वानखडे, विश्वजित बाखडे, सोपान डोळस, संकेत धोटे दीपक फडळकर, गौरव चौधरी, आकाश मकेश्वरसह पदाधिकारी उपस्थित होते.

### १४ जूनला डॉ. मनिष गवई यांचा अभिष्टचिंतन सोहळा

**अमरावती-**भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याणविभागाचे राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा अंतर्राष्ट्रीय सार्क संघटनेचे युवा दूत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राज्यपाल माजी नामित सिनेट सदस्य, खाजगी सचिव व हिंदुस्थान स्काऊट अँड गाईडचे निवासी आयुक्त डॉ. मनिष गवई यांच्या नागरी अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन येत्या १४ जूनला स्थानिक विश्रामगृह, कॅम्प रोड अमरावती येथे करण्यात आले असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी अध्यक्षस्थानी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले हे ऑनलाइन द्वारे उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाच्या यश्वीतेकरिता अरुण वानखडे, सय्यद नावेद संपादक विदर्भ शासन,संविधान मनोहरे,डॉ.निर्मल सरदार, डेटाराम मनोजा, प्रेम जवंजाळ, पत्रकार अजय श्रृंगारे,अमित तायडे, नरेंद्र गुलदेवकर,समाधान वानखडे,अ‍ॅड, डॉ. मनिष सिरसाट, मिलिंद वानखडे,शुभांगी वानखडे, कुसुम, आर. एच. ढोके, विभा सोनावणे, उमा जवंजाळ, पुष्पा इंगोले, प्रभा मनोहर, संगीता राऊत, गजानन आठवले, राजेश गजभिये, मिलिंद वानखडे, सुमितराजा सिरसाट, महेश अहेर अथक परिश्रम घेत असून कार्यक्रमाचे संचालन डॉ. वैभवकुमार निमकर हे करणार असून आभार साहिल मोरे (कव्वाल) मानतील डॉ. मनिष गवई यांच्या नागरी अभिष्टचिंतन सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्रवाशाला धक्काबुक्की, एसटी वाहकावर गुन्हा दाखल

**मोर्शी -** प्रवाशाला शिवीगाळ करून धक्काबुक्की करणाऱ्या एसटी वाहकाविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.प्रदीप लुंगे रा. मोर्शी असे फिर्यादीचे नाव आहे. ते एसटी बस क्र. एमएच १४ एमएच १५०९ ने काटोलवरून मोर्शी येथे येत असताना त्यांच्या कंबरेला त्रास होत असल्याने त्यांनी वाहकास मोर्शी शहरातील परशुराम मंगल कार्यालयाजवळ उतरवून देण्याची विनंती केली. परंतु वाहक इंगळे यांनी त्यांची विनंती न मानता एसटी थेट बसस्थानकात थांबविली व तेथे लुंगे यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. या प्रकरणाची तक्रार त्यांनी प्रथम आगार व्यवस्थापककाकडे केली व नंतर पोलिसांत तक्रार दिल्याने वाहक इंगळे विरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# फुलांचेही भाव वाढले, खाद्यतेलाचे दर तेजीत

**अंजनगाव बारी-**जिल्हासह अंजनगाव बारी ग्रामीण भागात महागाईचा झटका अधिकच जाणवू लागला आहे. इंधन दरवाढ, वाहतूक खर्च वाढ आणि बाजारातील मागणी-पुरवठ्याच्या असमतोलामुळे भाजीपाल्यापासून धान्यापर्यंत सर्वच वस्तूंचे दर आकाशाला भिडले आहेत. खाद्यतेलांचे दरही तेजीत असून सामान्य ग्राहकांचे बजेट कोलमडत आहे.



**भाजीपाल्याचे दर वाढले**

अंजनगाव बारी आठवडी बाजारात मेथी व कोथिंबिरीचे भाव भडकले असून प्रतिजुडी २० ते ४० रुपये आकारले जात आहेत. इतर पालेभाज्या दहा रुपयांवर स्थिर आहेत. फळभाज्यांमध्ये प्रतिकिलो ५ ते १० रुपये वाढ दिसून येत आहे.

कांद्याची पात : १५-२० रुपये, पालक, वांदळ, करडई, चाकवत : १० रुपये प्रतिजुडी, वांगी : ५०-६० रुपये, दोडका : ७०-८० रुपये, गवार : ६० रुपये, कारली : ५०-६० रुपये, टोमॅटो : ३०-४० रुपये, कांदा : १५-३० रुपये, बटाटा : २०-३० रुपये, लसूण : १००-१८० रुपये, कोबी : १०-२० रुपये, फुलकोबी : १५-३० रुपये (दर :- प्रतिकिलो )

**फळांचे प्रतिकिलो भाव**

सफरचंद : १८०-२००, पेरू : ८०, मोसंबी : ८०-१२०, चिकू : ६०-८०, द्राक्षे : १००-११०, डाळिंब : १००-२५०, आवळा : १२द-१५०, अननस : १००-१५० रुपये, कलिंगड : ६०-१०० रुपये (नग)

**फुलांच्या दरातही तेजी**

निशिगंध : २५०-३००, गलांडा : १५०-२००, शेवंती : २००-३००, गुलाब : २५०-३५० रुपये (दर - प्रतिकिलो)

**धान्याचे प्रतिकिलो दर**

गहू : ३५-४६, ज्वारी (संकरित) : ३०-३५, बार्शी शाळू : ४५-५४, तांदूळ : ३०-११० (प्रकारानुसार), हरभरा डाळ : ७७-८०, तूरडाळ : १३०-१४, मूगडाळ : ११०-१२०, मसूर डाळ : ७७-८५, उडीद डाळ : १२०-१३०, मटकी : १०-१००, मसूर : ७०-७७, मूग : १०-२६, फुटाणा डाळ : १००-११०, चवळी : ११०-११५, हिरवा वाटाणा : १२०-१३०, पावटा : १२०, हरभरा : ११०-१२० रुपये

**खाद्यतेलांचे दर तेजीत**

सोयाबीन : १७०-१८०, सूर्यफूल : १८०-१९०, पामतेल : १५५-१६०, सरकी : १७०-१८०, शेंगदाणा तेल : २००-२१० रुपये

**मसाल्यांच्या पदार्थांचे दर**

धणे : २४०-३००, जिरे : ३७०-५००, तीळ : २००-२४०, खसखस : २००० रुपये किलो, लवंग (१०० ग्रॅम) : १५०-२००, मिरे (१०० ग्रॅम) : १५०-२०० रुपये

महागाईचा मोठा तडाखा – ग्राहकांच्या खिशाला चांगलीच झळ भाजीपाला, धान्य, फळे, फुले आणि खाद्यतेलांचे सातत्याने वाढणारे दर पाहता. अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण ग्राहकांवर महागाईचा मोठा ताण दिसून येत आहे.

**इंधनदरवाढीचा आणखी झटका**

इंधानदरवाढीमुळे बाजारपेठेतील महागाई आणखी वाढली आहे. पेट्रोलच्या किंमतींमध्ये ८७ पैशांची आणि डिझेलमध्ये ९१ पैशांची वाढ नोंदली गेली असून, १० दिवसांत ही तिसरी दरवाढ आहे. १५ मे रोजी ३ रुपये आणि १९ मे रोजी ९० पैसे अशी वाढ झाली होती. त्यामुळे एकूण जवळपास ५ रुपये प्रति लिटरने इंधन महाग झाले आहे. इंधनाचे वाढते दर वाहतूकखर्च वाढवून थेट भाजीपाल्यापासून धान्यापर्यंतच्या दरांवर परिणाम करत आहेत.

# आदिवासी प्रोत्साहन भत्ता आठ महिन्यांपासून थकीत

## मुख्याध्यापकांवर गंभीर आरोप; घर जप्तीची वेळ

**अमरावती/का.प्र.**

तालुक्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, सुसर्दा येथील कर्मचारी ए.पी. गुडदे (कामाठी) यांनी आदिवासी प्रोत्साहन भत्ता गेल्या आठ महिन्यांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करत मुख्याध्यापकां विरोधात प्रशासनाकडे तक्रार दाखल केली आहे.

गुडदे यांच्या दिलेल्या माहितीनुसार, आदिवासी प्रोत्साहन भत्ता थकबाकी मिळण्यासाठी त्यांनी वारंवार मुख्याध्यापक एन.टी. तायडे यांच्याकडे पाठपुरावा केला. मात्र प्रत्येकवेळी उडवाउडवीची उत्तरे देत त्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, इतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर दिले जात असताना स्वतःचे वेतन मुद्दाम उशिरा करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे घरकर्जाचे हफ्ते वेळेवर भरता न आल्याने बँकेकडून घर जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे. १८ मे रोजी घरावर नोटीस लावण्यात आली असून २४ मेपर्यंत थकीत रक्कम जमा न केल्यास घराबाहेर काढण्यात येईल, असे न्यायालयाचे आदेश मिळाल्याचे त्यांनी सांगितले.या संपूर्ण प्रकरणाची माहिती प्रकल्प कार्यालय धारणी तसेच आदिवासी विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संबंधित अधिकाऱ्यांनी मुख्याध्यापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नसल्याचाही आरोप करण्यात आला आहे. याचबरोबर प्रलंबित भत्ता मंजूर करण्यासाठी १० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा गंभीर आरोपहा गुडदे यांनी केला आहे. 'पैसे दिल्याशिवाय तुझे बिल काढणार नाही,' अशी धमकी देण्यात आल्याचा दावा त्यांनी आपल्या निवेदनात केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गुडदे यांनी केली.

# व्यक्ती निर्माण ते राष्ट्र निर्माण' हाच भारताला जागतिक बनवण्याचा मार्ग-खा.बोंडे

## 'स्वयंम मल्टीपर्पज फाउंडेशन' तर्फे१० वी आणि १२ वीच्या गुणवंतांचा ऐतिहासिक गौरव सोहळा

**अमरावती/का.प्र.**

'देशाचा विकास करायचा असेल तर सर्वात आधी तरुणांचे चारित्र्य आणि व्यक्ती निर्माण होणे गरजेचे आहे. 'व्यक्ती निर्माण ते राष्ट्र निर्माण' हाच भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. जेव्हा या देशातील युवा पिढी सक्षम, सुशिक्षित आणि राष्ट्रप्रेमाने प्रेरित होईल, तेव्हाच 'समर्थ युवा, समर्थ भारत' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल,' असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा खा. डॉ. अनिल बोंडे यांनी केले. दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे 'स्वयंम मल्टीपर्पज फाउंडेशन'च्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

आपल्या ओघवत्या आणि प्रेरणादायी भाषणात खा. डॉ. अनिल बोंडे यांनी राष्ट्रनिर्माणात तरुणांच्या भूमिकेवर विशेष प्रकाश टाकला. विविध महापुरुषांची उदाहरणे देत त्यांनी उपस्थित तरुणाईमध्ये नवा जोश भरला. ते म्हणाले की,'स्वामी



विवेकानंदांनी सांगितलेला 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्तीशिवाय थांबू नका' हा मंत्र आजच्या डिजिटल युगातही तितकाच लागू पडतो.

पुढे बोलताना त्यांनी मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या 'विंग्स ऑफ फायर' (अग्निपंख) चा दाखला दिला. 'डॉ. कलाम यांनी नेहमीच तरुणांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची शिकवण दिली. त्यांच्या या मांडणीने आणि राष्ट्रकेंद्री विचारसरणीने कार्यक्रमाला उपस्थित शेकडो तरुण आणि विद्यार्थी कमालीचे आकर्षित झाले.

**शिवाजी संस्थे'च्या स्पर्धा परीक्षा अकॅडमीतून शेकडो अधिकारी घडताहेत-हेमंत काळमेघ**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी तळागाळातील सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांच्या याच दूरदृष्टीमुळे आज आपला समाज प्रगतशील आणि सुशिक्षित म्हणून ओळखला जातो,' असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ यांनी यावेळी केले. शिक्षणापासून एकही गरजू वंचित राहू नये, यासाठी गोरगरीब नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना आवश्यक ती सर्व मदत श्री शिवाजी शिक्षण संस्था करेल, असे आश्वस्त त्यांनी यावेळी केले.

# वास्तूदोषाच्या नावाखाली गुरुजीने जमवली कोट्यवधीची माया?

## आध्यात्मिक महाराजांच्या मालमत्ता खरेदीने शहरात खळबळ

**संबंधित शासकीय यंत्रणांचे मौन चर्चेत**

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव शहरात आध्यात्मिक धडे देणाऱ्या एका प्रसिद्ध महाराजांनी गेल्या काही दिवसांत कोट्यवधी रुपयांची स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. कोणताच उघड आर्थिक स्रोत नसताना महाराजांकडे एवढी मोठी रक्कम आली कुठून? असा सवाल आता सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात असून, या व्यवहारांमुळे शहरात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे

या आर्थिक स्रोताबाबत आता प्रश्नचिन्हहे उपस्थित होत आहे. महाराज शहरातील एका आध्यात्मिक केंद्रात वास्तव्याला असून महाराज भक्तांना भविष्य व वास्तू शांती बाबत मार्गदर्शन करतात. मात्र, गेल्या काही वर्षांत त्यांनी शहराच्या मोक्याच्या ठिकाणी कोट्यवधींच्या खुल्या जागा आणि शेती विकत घेतल्याची माहिती समोर आली आहे. एखाद्या उद्योजकालाही थक्क करेल अशा वेगाने हे व्यवहार सुरू आहेत. मुळात महाराजांचा कोणताही अधिकृत व्यवसाय किंवा उत्पन्नाचे साधन नसताना, एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम आणि गुंतवणुकीसाठी पैसा येतो कुठून? हा कळीचा मुद्दा बनला आहे.



एकीकडे एखादा सामान्य नागरिक किंवा मध्यमवर्गीय व्यापारी एखादा छोटा मालमत्तेचा व्यवहार करतो, तेव्हा प्राप्तिकर विभाग आणि इतर शासकीय यंत्रणा त्याला नोटिसा पाठवून पैशांचा हिशोब मागतात. सामान्य माणसाला अनेक प्रश्नांची उत्तरे देताना नाकी नऊ येतात. मात्र, डोळ्यादेखत कोट्यवधींचे व्यवहार करणाऱ्या या महाराजांकडे कोणत्याही विभागाने ढुंकूनही बघण्याचे धाडस दाखवलेले नाही. 'सामान्यांना कायदा आणि महाराजांना सवलत' असा दुजाभाव यंत्रणा का करत आहेत, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत

**भक्त की पाठीराखे? बड्या अधिकाऱ्यांचा वरदहस्त**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या महाराजांच्या भक्तगणांमध्ये अनेक बडे सनदी अधिकारी, पोलीस अधिकारी आणि वजनदार राजकारण्यांचा समावेश आहे. अनेकवेळा हे अधिकारी महाराजांच्या चरणी लीन झालेले दिसतात. या 'हायप्रोफाईल' भक्तसंपर्कामुळेच संबंधित तपास यंत्रणा कारवाई करण्यास कचरत असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

महाराजांच्या आर्थिक साम्राज्याला या बड्या अधिकाऱ्यांचे संरक्षण लाभल्यामुळेच कोणतीही चौकशी होत नसल्याचे बोलले जात आहे.

**अवैध मार्गाच्या संपत्तिची चौकशीची मागणी**

आध्यात्मिक क्षेत्रातील व्यक्तींनी साधेपणाचा आदर्श ठेवणे अपेक्षित असताना,या महाराजांच्या मालमत्ता खरेदीच्या धडाक्याने अध्यात्माच्या पडद्याआड 'काहीतरी वेगळेच' शिजत असल्याची शंका व्यक्त होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून महाराजांच्या उत्पन्नाचा मार्ग जाहीर करावा आणि कायद्या समोर सर्व समान आहेत हे प्रशासनाने सिद्ध करून दाखवावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# SFI तर्फे NEET पेपरफुटी विरोधात तहसीलदारांना निवेदन




**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

देशभर गाजत असलेल्या NEET परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसह दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) व डेमॉक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (DYFI) यांच्या वतीने नांदगाव खंडेश्वर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, NEET परीक्षेतील गैरप्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यासमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विद्यार्थी प्रामाणिकपणे मेहनत करून परीक्षा देतात, मात्र अशा भ्रष्ट प्रकारांमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरत आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी परीक्षा प्रक्रियेत कडक सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न असल्याने शासनाने तात्काळ पावले उचलावीत, असे निवेदनात नमूद करण्यात आले.यावेळी जिल्हा सचिव किशोर शिंदे, मोहसीन शेख, शहनशाह, राजगुरू शिंदे SFI राज्य समिती सदस्य विशाल शिंदे,संकेत मते,आदित्य शिंदे, साहिल साथी यांचे सह अनेकांची उपस्थित होते.

# पदोन्नती प्रक्रियेत अन्याय होत असल्याचा शिक्षकांचा आरोप

## वि.अ. श्रेणी-२ व ३ पदोन्नती यादीवर आक्षेप, CET अट व ज्येष्ठता निकषावर प्रश्नचिन्ह?

**अमरावती/वार्ताहर**

विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-२ व ३ पदोन्नतीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादीवर पात्र सेवाजेष्ठ शिक्षकांनी तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. यासंदर्भात जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे सामूहिक निवेदन सादर करण्यात आले असून पदोन्नती प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने राबविली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. असे शिक्षणाधिकारी प्राथमिक अमरावती संघरत्न सरोदे साहेब यांना निवेदन देण्यात आलेला आहे.



निवेदनात शिक्षकांनी म्हटले आहे की, पदोन्नती प्रक्रियेसाठी १ सप्टेंबर २०२५ ही कट ऑफ तारीख धरण्यात आली असून त्यामुळे अनेक पात्र शिक्षकांवर अन्याय होत आहे. सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा दाखला देत 'पदोन्नती प्रक्रिया सुरू होण्याच्या दिवशी शिक्षकाकडे TET/CET पात्रता असणे आवश्यक आहे' असे स्पष्ट करण्यात आले असल्याचा दावा करण्यात आला आहे.तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांनुसार दरवर्षी जानेवारी महिन्यात सेवाजेष्ठता यादी प्रसिद्ध करणे बंधनकारक असताना सप्टेंबर २०२५ पर्यंतची यादी तयार करण्यात आल्याने प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'Seniority-cum-Merit' या तत्त्वानुसार पदोन्नती देणे आवश्यक असताना काही पात्र शिक्षकांना डावलण्यात आल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

शिक्षकांनी पुढे म्हटले आहे की, जिल्हा पदोन्नती समिती (DPC) ची बैठक अद्याप झालेली नसताना पदोन्नती प्रक्रिया राबविणे नियमबाह्य आहे. याशिवाय शैक्षणिक अर्हता, अनुभव व TET/CET पात्रतेबाबत शासन निर्णयांचा चुकीचा अर्थ लावून काही शिक्षकांना अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.सदर निवेदनावर मंगेश खेरडे, राजेंद्र दिक्षित, दत्तप्रसाद भेले,जयकुमार कदम, नितीन भुरे, गजानन कोरडे, शीला मसराम, मिलिंद वाहूरवाघ, सतीश डोंगरे,अमोल वऱ्हेकर, प्रशांत उंडे, किशोर रूपनारायण आदी सेवाजेष्ठ शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.चुकीची यादी रद्द करून DPC बैठकीच्या तारखेपर्यंत पात्र ठरणाऱ्या सर्व शिक्षकांचा विचार करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अन्यथा न्यायालयीन लढा उभारण्याचा इशाराही शिक्षकांनी दिला आहे.

त्याबाबत शिक्षण अधिकारी प्राथमिक संघरत्न सरोदे यांनी सकारात्मक विचार करून मंगळवार २६मे २०२६ रोजी सभा आयोजित केलेली आहे.

# गाजीपूर- रुदाळी खाण फाईल्स ETS मोजणीवर गंभीर प्रश्नचिन्ह

## २०१७ मध्ये २४ हजार ब्रास उत्खनन; २०२६ च्या अहवालात थेट १० हजार ब्रासने घट

### दोन ETS अहवालांतील तफावत पाहून महसूल यंत्रणाच बुचकळयात; नव्याने सॅटेलाईट मोजणीची मागणी जोरात

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील मौजे गाजीपूर व रुदाळी येथील गौण खनिज उत्खनन प्रकरण आता नव्या वळणावर आले असून भूविज्ञान व खनिज संचालनालयाच्या ETS मोजणीवरच गंभीर संशय निर्माण झाला आहे.



२०१७ मध्ये करण्यात आलेल्या ETS मोजणीत एका खदानीत २४ हजारांहून अधिक ब्रास उत्खनन दाखविण्यात आले होते, तर तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या नव्या ETS मोजणीत हेच उत्खनन तब्बल १० हजार ब्रासने कमी दाखविण्यात आल्याने संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहे.

या विसंगतीमुळे 'नेमके खरे कोण?' असा प्रश्न आता महसूल, भूविज्ञान विभागासह पर्यावरणप्रेमींनाही पडला असून मोजणी प्रक्रियेतील पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेष म्हणजे अतिरिक्त उत्खननाच्या कोट्यावधी रुपयांच्या दंडापासून वाचलेल्या खाणधारकांची सुद्धा यामुळे चांगलीच गोची झाली आल्याची चर्चा जिल्ह्यात रंगू लागली आहे.

सन २०१७ मध्ये अकोट तालुक्यातील गाजीपूर व रुदाळी परिसरातील तात्पुरत्या व लीजधारक खदानींची ETS मोजणी करण्यात आली होती. त्यावेळी मौजे रुदाळी येथील गट क्रमांक ३ मधील खदानीची मोजणी तत्कालीन अधिकारी एम. एल. मावसकर यांनी केली होती. त्या अहवालात संबंधित खदानीतून तब्बल २४ हजार ३२६ ब्रास गौण खनिजाचे उत्खनन झाल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले होते. हा अहवाल त्या काळात महसूल विभागासाठी महत्त्वाचा दस्तऐवज मानला गेला होता आणि आता २०२६ मध्ये आकडा थेट १४ हजारांवर आला. २३ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत भूविज्ञान व खनिज संचालनालय, नागपूर यांच्या मार्फत पुन्हा ETS मोजणी करण्यात आली. ही मोजणी अधिकारी ए. आर. भोळे यांनी केली.मात्र या नव्या अहवालात याच गट क्रमांक ३ मधून केवळ १४ हजार ८७३ ब्रास उत्खनन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, यामध्ये एक-दोन हजार नव्हे तर तब्बल १० हजार ब्रासची तफावत समोर आली आहे. नैसर्गिकरित्या उत्खननाचा आकडा वर्षानुवर्षे वाढण्याची शक्यता असताना उलट तो एवढ्या मोठ्या प्रमाणात कमी कसा झाला? हा प्रश्न आता चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

### ■ 'लाखमोलाची शक्कल' वापरल्याचा संशय

पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांच्या मते, ETS मोजणीमध्ये 'लाखमोलाची शक्कल' वापरून अनेक प्रकरणांतील उत्खनन कमी दाखविण्यात आल्याचा गंभीर संशय आहे. त्यामुळे आता भूमी अभिलेख विभागाच्या संयुक्त मोजणीवर प्रश्न उपस्थित करणारे अधिकारी आणि खाणधारक स्वतःच अडचणीत सापडले आहेत. कारण ETS मोजणीतच दोन वेगवेगळे आकडे समोर आल्याने संपूर्ण प्रक्रियेची विश्वासार्हताच धोक्यात आली आहे. परिणामी ही मोजणी रद्द करून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नव्याने सॅटेलाईट सर्व्हे करण्यात यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. स्थानिकांच्या मते, सॅटेलाईट मोजणी झाल्यास 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' होईल आणि अतिरिक्त उत्खननाचे खरे वास्तव समोर येईल.

### ■ भाडेपट्ट्याचाही संशय वाढला

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित खदानीचा भाडेपट्टा एका गैरआदिवासी अग्रवाल नामक व्यक्तीकडे देण्यात आल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे हा करार केवळ १०० रुपयांच्या बाँडवर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या व्यवहाराला शासनाची आवश्यक परवानगी घेण्यात आली नसल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ३६ (अ) चे स्पष्ट उल्लंघन झाल्याचा आरोप होत आहे. आदिवासी जमिनींचे कथित बेकायदेशीर व्यवहार, गौण खनिज उत्खनन आणि महसूल तोट्याच्या पार्श्वभूमीवर या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### ■ समजदार को इशारा काफी...

दोन ETS मोजण्यांतील ही प्रचंड विसंगती नेमकी कशामुळे निर्माण झाली, याबाबत प्रशासनाकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण समोर आलेले नाही. मात्र या प्रकारामुळे 'समजदार को इशारा काफी...' अशीच प्रतिक्रिया आता दबक्या आवाजात व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, २०२६ मध्ये झालेल्या ETS मोजणीवर सुरुवातीपासूनच संशय व्यक्त होत होता. कारण सन २०२४ मध्ये भूमी अभिलेख विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संयुक्त पथकाने केलेल्या मोजणीत अनेक खदानींमध्ये हजारो ब्रास अतिरिक्त उत्खनन झाल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. यानंतर महसूल विभागाच्या पुढाकारातून ETS मोजणी करण्यात आली; मात्र या अहवालाने उलट अतिरिक्त उत्खननाच्या आरोपांमध्ये अडकलेल्या कथित खाण माफियांनाच दिलासा दिल्याची चर्चा आहे.

---

# अधिकारी असल्याचे सांगत सवा लाखांची खंडणी

## वॉटर प्लांट मालकाची फसवणूक; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील खंडेलवाल नगर परिसरातील एका आरओ वॉटर प्लांटमध्ये जाऊन स्वतःला सरकारी बालमजूर पथकाचे अधिकारी असल्याचे भासवून प्लांट मालकाकडून तब्बल १ लाख १५ हजार रुपयांची खंडणी उकळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी चार अज्ञात बनावट अधिकाऱ्यांविरोधात फसवणूक व खंडणीचा गुन्हा दाखल केला आहे. कठोरा रोड येथील रहिवासी अभिजीत राजाभाऊ आबदेव (वय ४२) यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अभिजीत आबदेव यांचा खंडेलवाल नगर येथे वॉटर बॉटल प्लांट आहे. २३ मे रोजी दुपारच्या सुमारास एमएच ३७/बीव्ही ०१८२ क्रमांकाच्या कारमधून चार जण प्लांटमध्ये आले. यामध्ये अंदाजे ५०, ४० आणि ३५ ते ३८ वयोगटातील तीन पुरुष तसेच सुमारे ४५ वर्षीय एका महिलेचा समावेश होता. प्लांटमध्ये प्रवेश करताच त्यांनी स्वतःला सरकारी बालमजूर पथकाचे अधिकारी असल्याचे सांगितले. 'तुमच्या कारखान्यात बालमजूर काम करत असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे,' असे सांगत त्यांनी तेथे काम करणाऱ्या अमित जोधले यांना ताब्यात घेतल्याचे नाटक केले. तसेच कारखाना तत्काळ सील करण्यात येईल आणि कठोर कारवाई केली जाईल, अशी धमकी देऊन मालकाला घाबरविले. प्रकरण मिटवून टाकण्यासाठी आरोपींनी पैशांची मागणी केली. घाबरलेल्या प्लांट मालकाने आरोपींनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावरून गुगल पेच्या माध्यमातून १५ हजार रुपये ऑनलाइन पाठविले. मात्र त्यानंतरही आरोपी थांबले नाहीत. त्यांनी प्लांटमधील कॅश काउंटरची झडती घेत तेथे ठेवलेले १ लाख रुपये रोख जबरदस्तीने काढून घेतले आणि घटनास्थळावरून पसार झाले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात ☞(पान २ वर)

---

# पुलावरून उडी घेणाऱ्या जखमी तरुणाचा मृत्यू




**अमरावती/प्रतिनिधीः-**बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोला बायपास पॉईंट पुलावरून पडून गंभीर जखमी झालेल्या ३५ वर्षीय युवकाचा नागपूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. नाशिर शाह कदीर शाह (रा. धोबीपुरा, अचलपूर, जि. अमरावती) असे मृत युवकाचे नाव आहे. मृताच्या पत्नीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, नाशिर शाह यांची मानसिक स्थिती काही काळापासून ठीक नव्हती. ते २० एप्रिल २०२६ रोजी घरातून बाहेर पडले होते. त्यानंतर ते जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल असल्याची माहिती कुटुंबीयांना मिळाली. त्यावेळी त्यांच्या डोक्याला, छातीला तसेच दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली होती. चौकशीदरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, २० एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास नाशिर शाह हे अकोला बायपास पॉईंट पुलावरून जात असताना समोरून येणारे वाहन पाहून घाबरले. ते वाहन आपल्यावर येणार असल्याची भीती वाटल्याने त्यांनी पुलावरून उडी घेतली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते.

प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

---

# एसटी प्रवासात महिलेचे साडेपाच लाखांचे दागिने चोरी

## राजापेठ पोलिसांत गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** अकोला ते अमरावती दरम्यान एसटी बसने प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या हँडबॅगमधून अज्ञात चोरट्याने तब्बल ५ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना २२ मे रोजी घडली. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तक्रारदार महिला अकोला येथील मलकापूर रोड परिसरातील कोठारी वाटिका भागातील रहिवासी आहेत. त्यांच्या मुलाचे लग्न ठरल्याने पैशांची आवश्यकता होती. त्यामुळे घरातील जुने सोन्याचे दागिने विकण्यासाठी त्यांनी अमरावती येथे राहणाऱ्या जावयाची मदत घेण्याचे ठरविले. २२ मे रोजी सकाळी त्या अकोला बसस्थानकावरून अमरावतीकडे जाणाऱ्या☞(पान २ वर)

---

# डॉक्टरच्या निष्काळजीपणाने प्रसूत महिलेचा मृत्यू

## चौकशी समितीच्या अहवालानंतर गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात सिझेरियन शस्त्रक्रियेदरम्यान एका महिला डॉक्टरच्या गंभीर निष्काळजीपणामुळे प्रसूतेचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय चौकशी समितीच्या अहवालात डॉक्टरांची हलगर्जी स्पष्ट झाल्यानंतर, घटनेच्या जवळपास वर्षभरानंतर राजापेठ पोलिसांनी संबंधित महिला डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मार्कंडा, ता. चांदूर बाजार येथील मोहम्मद इरफान मोहम्मद उस्मान (वय ३२) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या बहिणीचा विवाह २०२१ मध्ये झाला होता व तिला तीन वर्षांची मुलगी आहे. दुसऱ्यांदा गर्भवती झाल्यानंतर प्रसूतीसाठी तिला अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता संबंधित महिला डॉक्टरांनी तिच्यावर सिझेरियन शस्त्रक्रिया केली. त्यानंतर तिने मुलाला जन्म दिला. मात्र त्याच रात्रीपासून तिला पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. याबाबत नातेवाईकांनी डॉक्टर व रुग्णालय कर्मचाऱ्यांना माहिती दिली असता, 'ऑपरेशननंतर असा त्रास होतोच,' असे सांगून दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप आहे. रात्री साडेअकराच्या सुमारास रक्त तपासणी करण्यात आली असता, महिलेच्या☞(पान २ वर)

---

# प्रेमसंबंधासाठी दबाव; तरुणीचा विनयभंग



**अमरावती/प्रतिनिधीः-** पूर्वीचे प्रेमसंबंध कायम ठेवण्यासाठी दबाव टाकत एका तरुणीचा विनयभंग केल्याची घटना शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रमोद अंबादास उमक (वय ४९) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३५ वर्षीय महिला आणि आरोपी हे एकाच गावातील रहिवासी असून त्यांच्यात पूर्वी प्रेमसंबंध होते. मात्र गावात बदनामी होण्याच्या भीतीने संबंधित महिलेने आरोपीसोबतचे संबंध तोडून त्याला भेटणे बंद केले होते. ☞(पान २ वर)

---

# ३१ मे पूर्वी वीज यंत्रणेतील दोष दुरुस्त करा

## सुशील थोरात यांनी दिला आंदोलनाचा इशारा

**नांदगाव खांडेश्वर/प्रतिनिधीः-** तालुक्यातील लोणी-धानोरा फसी ३३-व ११ केव्ही उपकेंद्रा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये खरीप पेरणी हंगाम पावसाळ्यापूर्वी ३१ मे पर्यंत वीज यंत्रणेची संपूर्ण देखभाल व दोष दुरुस्ती करून अखंडित वीज पुरवठा सुरळीत करावा, या प्रमुख मागणीसाठी धानोरा फसीचे माजी सरपंच सुशील थोरात यांनी महावितरणच्या उप कार्यकारी अभियंता, उपविभाग - बडनेरा तसेच सहायक अभियंता लोणी-धानोरा फसी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले.



निवेदनात म्हटले आहे की, जून महिन्यापासून खरीप पेरणीला सुरुवात होणार आहे. सद्यस्थितीत रात्रीच्या वेळी उपकेंद्राअंतर्गत वारंवार व दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित होत आहे. अनेक ठिकाणी विद्युत पोल जीर्ण झालेले, तारा लोंबकळलेल्या, रोहित्रांवर तेल गळती व इन्सुलेटर फुटलेले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना सिंचन, पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करताना प्रचंड अडचणींचा सामना करावा☞(पान २ वर)

---


# शहर पोलिसांचे 'कॉम्बिंग ऑपरेशन'

## तडीपार गुन्हेगारांसह वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

### ७४ हिस्ट्रीशीटरांची तपासणी, तडीपार आरोपी जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने शनिवारी २३ मे रोजी मध्यरात्री मोठ्या प्रमाणावर धडक 'कॉम्बिंग ऑपरेशन' राबविण्यात आले. या विशेष मोहिमेत तडीपार गुन्हेगार, वारंटी, हिस्ट्रीशीटर तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली.

शहरातील विविध भागांत रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या मोहिमेदरम्यान पोलिसांनी तब्बल ७४ हिस्ट्रीशीटरांच्या घरी जाऊन पडताळणी केली. शहरातून तडीपार करण्यात आल्यानंतरही अवैधरित्या शहरात वावर करणाऱ्या ६ तडीपार आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच



न्यायालयीन वॉरंटप्रकरणीही १ आरोपीवर कारवाई करण्यात आली. याशिवाय आर्म्स ॲक्टअंतर्गत ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, रात्रीच्या वेळी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या ४ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. कॉम्बिंग ऑपरेशनदरम्यान दारूबंदी कायद्यांतर्गत १५ प्रकरणे नोंदविण्यात आली. तसेच प्रतिबंधित अमली व नशिले पदार्थांचे सेवन करणाऱ्या ३ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. शहरातील राजकमल चौक, जयस्तंभ चौक, ☞(पान २ वर)

---

# महायुती-महाविकास आघाडीच्या गणितात अपक्षांची 'एन्ट्री' ठरणार निर्णायक?

### अमरावती विधान परिषद निवडणूक :

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील १७ विधान परिषद जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना रंगण्याची शक्यता असतानाच अपक्ष इच्छुकांच्या वाढत्या हालचालींमुळे दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विशेष म्हणजे ऐनवेळी होणाऱ्या राजकीय समीकरणांमुळे ही निवडणूक सरळ न राहता 'रणनीती विरुद्ध रणनीती' अशी होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

जिल्हा परिषद सदस्य वगळता तब्बल ४५३ मतदार असलेल्या या मतदारसंघात प्रत्येक मताचे महत्त्व मोठे मानले जाते. त्यामुळे पक्षनिष्ठेपेक्षा व्यक्तिगत संबंध, स्थानिक समीकरणे आणि निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यातील 'व्यवस्थापन' अधिक निर्णायक ठरत असल्याचा अनुभव यापूर्वीच्या निवडणुकांत आला आहे. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती होण्याची चर्चा सुरू झाली आहे.

विद्यमान आमदार प्रवीण पोटे यांनी मागील निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत भाजपा-महायुतीची ताकद दाखवून दिली होती. यंदाही महायुतीकडे संख्याबळ अनुकूल असल्याचे चित्र दिसत असले, तरी स्थानिक पातळीवरील नाराजी, मित्रपक्षांचे दावे आणि अपक्षांची संभाव्य बंडखोरी यामुळे ही निवडणूक एकतर्फी राहणार नसल्याचे संकेत मिळत आहेत. विशेषतः ऐनवेळी होणाऱ्या 'घोडाबाजार'च्या चर्चांमुळे राजकीय वातावरण अधिकच तापले आहे.



दुसरीकडे महाविकास आघाडीनेही या जागेसाठी आक्रमक भूमिका घेतली असून काँग्रेसकडून मातब्बर असलेल्या प्रवीण पोटेंना तोडीस तोड उमेदवार शोधण्याची चाचपणी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. त्यासाठी बाहेरील प्रभावी चेहऱ्याचा पर्यायही तपासला जात असून नागपूरमधील हर्षजीत देशमुख यांचे नाव चर्चेत आल्याने राजकीय उत्सुकता वाढली आहे. स्थानिक नेतृत्वापेक्षा 'जिंकू शकणारा उमेदवार' या निकषावर उमेदवारी दिली जाऊ शकते, अशीही चर्चा आहे.

महायुतीतही सर्वकाही सुरळीत नसल्याचे संकेत मिळत आहेत. शिवसेना शिंदे गटाने या मतदारसंघावर दावा सांगितल्याने भाजपसमोर मित्रपक्षाला समजावून सांगण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जाणारे प्रवीण पोटे यांच्या उमेदवारीसाठी भाजपा आग्रही असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे ही जागा अखेरीस भाजपकडेच राहण्याची शक्यता अधिक मानली जात आहे.

दरम्यान, या संपूर्ण राजकीय समीकरणात ☞(पान २ वर)

### ऐनवेळी 'सेठ' यांच्या नावाचीही चर्चा-

गेल्या दोन टर्मपासून अमरावती विधान परिषदेसाठी प्रयत्नशील असलेले अमरावतीतील एका प्रभावी 'सेठ' यांचे नाव पुन्हा चर्चेत आले आहे. सर्व पक्षांतील मतदारांशी असलेले सलोख्याचे संबंध, स्थानिक पातळीवरील प्रभाव आणि निवडणुकीतील व्यवस्थापन क्षमता यामुळे त्यांना संभाव्य 'डार्क हॉर्स' मानले जात आहे. कोणत्याही पक्षाशी उघड राजकीय वैर नसल्याने अंतिम टप्प्यात त्यांच्या नावाचा गंभीरपणे विचार होऊ शकतो, अशी चर्चा त्यांच्या निकटवर्तीयांत सुरू आहे. त्यामुळे ऐनवेळी या निवडणुकीत आणखी एका अनपेक्षित ट्विस्टची शक्यता नाकारता येत नाही.